**Guide**
**Prof. Urmila Gajpure**
**Head of Department**
**Home Econimics**
**M.G.A.S. & L.N.P.C.College**
**Armori**

HEAD
Dept. of Home Economics
M.G. Arts, Science & Late N.P. Commerce
College Armori, Dist. Gadchiroli

**Dr. Lalsing Khalsa**
**Principal**
**M.G.A.S. & L.N.P.C.College**
**Armori**

PRINCIPAL
Late N.P. Commerce College
Armori, Dist. Gadchiroli

| Sr. No. | Student Name | Photo | Signature |
|---|---|---|---|
| 1. | Bhagyashri Mohit Khalaha |  | |
| 2. | Toneshwari Madan Wadhai |  | |
| 3. | Manjusha Mangaldas Kove |  | |
| 4. | Diksha Anil Khobragade |  | |
| 5. | Pratiksha Jitendra Somankar |  | |

| | | | |
|---|---|---|---|
| 6. | **Sonali Diwakar Kawase** |  | Kawase |
| 7. | **Tejaswini Sanjay Channe** | | |
| 8. | **Payal Ravindra Dumane** |  | P.R. Dumne |
| 9. | **Asha Suresh Shedmake** | | |
| 10. | **Tejaswini Kiran Titirmare** | | |

**Prof. Urmila Gajpure**
**Head of Department**

HEAD
Dept.Of Home Economics
M.G.Arts,Science & Late N.P.Commerce
College Armori,Dist.Gadchiroli

PRINCIPAL
**Dr. Lalsingh Khalsa**
**Principal**

# INDEX


| Sr. No | Subject | Page No. |
|---|---|---|
| 1. | प्रस्तावना (Introduction) | |
| 2. | उपयोगिता | |
| 3. | व्याख्या (Definations) | |
| 4. | खेळाचे महत्त्व (Importance of Play): | |
| 5. | खेळाचे विकासात्मक मूल्ये (Developmental Values of Play) | |
| 6. | खेळाचे वर्गीकरण (Classification of Play) | |
| 7. | खेळाचे साधने (Play Materials): | |
| 8. | खेळावर परिणाम करणारे घटक (Factors affecting on Play): | |
| 9. | संदर्भ (Reference) | |


WWSOS
Latitude: 20.474555
Longitude: 79.97983
Elevation: 245.88±4 m
Accuracy: 14.7 m
Time: 02-23-2024 10:25
Note: 23-24 Home Eco Pre school Visit


Latitude: 20.474597
Longitude: 79.979324
Accuracy: 77.6 m
Time: 02-29-2024 11:11
Note: 23-24 Home Eco Flower Arrengement


Latitude: 20.474484
Longitude: 79.979506
Accuracy: 60.0 m
Time: 02-29-2024 11:12
Note: 23-24 Home Eco Flower Arrengement

# पुर्वबाल्यावस्थेतील खेळ [PLAYS :- Pre School Child.]

## प्रस्तावना

खेळ ही बालकाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. खेळापासून आनंद प्राप्त होतो. म्हणून बालक जागेपणीचा जवळ जवळ संपूर्ण वेळ खेळात घालविताना दिसतात. खेळ हा चैतन्य- निर्मितीचा स्रोत आहे. बालकाचे वय आणि खेळ यांचा सहसंबंध जोडता येतो. विशिष्ट वयोगटात विशिष्ट खेळ खेळले जातात. खेळाच्या साधनांची, खेळणींची त्या त्या वयोगटानुसार निवड केली जाते. बालकाच्या वाढीच्या अवस्थांबरोबर खेळांच्या स्वरूपात बदल स्वीकारलेला दिसतो. बालकाचा वयोगट कोणताही असला तरी त्याच्या जीवनातील खेळाचे महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. खेळाच्या माध्यमातून बालकाचा कल (Attitude) आणि अभिवृत्ती (Aptitude) ओळखता येते. बालकाच्या सर्वांगीण विकासाच्या मूळ प्रवृत्तीलाखेळांची मदत होते.)

## उपयोगिता

या पार्श्वभूमीच्या आधारे खेळाची उपयोगिता पुढीलप्रमाणे सांगता येते.

(१) आत्मविष्कार करण्याची संधी

(२) खेळ म्हणजे आनंदप्राप्ती

(३) खेळ म्हणजे चैतन्य स्रोत

(४) खेळ म्हणजे क्रियाशीलता

(५) उत्स्फूर्त प्रगटीकरण म्हणजे खेळ

(६) खेळाच्या माध्यमातून बालकाचा वयोगट ओळखता येतो.

(७) सृजनात्मक शक्तींचा विकास

(८) बालकाचा कल (Attitude) आणि अभिवृत्ती (Aptitude) ओळखण्यास मदत होते.

(९) वास्तविक आणि काल्पनिक जगात भेद करणे हे महत्त्वाचे मानसिक कौशल्य खेळाच्या माध्यमातून बालक शिकतात.

(१०) व्यक्ती-व्यक्तीमधील आंतरक्रिया दृढ करणे आणि समृद्ध करणे.



## ❋ आओ खेलें






**खेळ, खेळाचे प्रकार, खेळाच्या अवस्था, खेळावर परिणाम करणारी घटकदर्शक आकृती**



बंदूक संरक्षण



चेंडू मारणे



चेंडू झेल

## व्याख्या

बालकाच्या विकासात खेळाचे महत्त्व अबाधित आहे. बालकाची जडणघडण आणि सर्वांगीण विकासाला पोषक ठरतात. यासंबंधी अनेक लेखकांनी अभ्यास केला आहे. त्यांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे -

**E. B. Hurlock :** "अंतिम परिणामाचा विचार केल्याशिवाय आनंदप्राप्तीसाठी केलेली क्रिया म्हणजे खेळ होय." ("Play relates to any activity engaged in for the enjoyment its gives without consideration of the end results. ")

**T. P. Nann :** "खेळ रचनात्मक क्रियांची व्यापक अभिव्यक्ती आहे." ("Play is a profound manifestation of creative activities. ")

**Valentine :** "कामात एकप्रकारचा मनोरंजनाचा प्रकार म्हणजे खेळ होय." ("Play is a kind of amusement in the work.")

**ग्लुक (Gluck) :** "खेळ अशी क्रिया आहे की जी आपल्या इच्छेनुसार करण्यास व्यक्ती स्वतंत्र असतो."

**शरयूबाळ आणि मा. के. सोहनी:** "कोणताही हेतू मनात न ठेवता केलेला स्वयंस्फूर्त आनंददायक व्यवसाय म्हणजे खेळ."

**लेखिकेच्या मते :** "कोणताही व्यावहारिक उद्देश मनात न ठेवता आनंदप्राप्तीसाठी ज्या क्रिया केल्या जातात आणि या क्रिया वारंवार कराव्याशा वाटतात, अशा बाबींचा ज्या क्रियांमध्ये समावेश होतो त्याला खेळ म्हणता येईल."

थोडक्यात खेळ म्हणजे क्रियांच्या माध्यमातून मनपसंत मनोरंजनात संक्रमण करणे होय.



मुलांसोबत खेळतांना कु. टोनेश्वरी नाटई
(BA III Year)

## खेळाचे महत्त्व (Importance of Play):

**(१) शारीरिक दृष्टिकोनातून खेळाचे महत्त्व (Physical Value) :** बालकाचा आवडता छंद म्हणजे झोपेव्यतिरिक्त मिळालेल्या वेळात खेळणे होय. खेळाचे दोन भागात विभागणी करता येते - (१) शारीरिक मूल्यांना प्राधान्य असलेले खेळ, (२) मानसिक मूल्यांना प्राधान्य असलेले खेळ.

शारीरिक मूल्ये लाभलेले खेळ म्हणजे मैदानी खेळ होत. या खेळात बालकाचे स्नायू अधिक पिळदार आणि बळकट होतात. अशी मुले सशक्त, उंच आणि निरोगी असतात. खेळामुळे शरीराचा कारक विकास चांगला होतो. स्नायूंवर नियंत्रण येण्यास मदत होते.

शरीरांतर्गत पचनसंस्था, रुधिराभिसरण संस्था आणि उत्सर्जन संस्था यांचे कार्य सुरळीत चालण्यास खेळामुळे मदत होते.

रोगमुक्त राहील्यास रोगप्रतिकारक शक्ती वाढण्याची गरज असते. खेळामुळे शरीरसौष्ठवाबरोबरच मनही निरोगी राहण्यास मदत होते.

**(२) आत्मभाव विकसित होण्याच्या दृष्टिकोनातून खेळाचे महत्व :** खेळामुळे 'स्वत्वभाव' (Self-Concept) विकसित होण्यास मदत होते. खेळाच्या माध्यमाने मुलाला स्वतःबद्दलची कल्पना करता येते. उदा. आपण आपल्या मित्रांना सहकार्य देतो का ? आपण 'गटाचा नायक' आहोत काय ? बाकी मित्र आपण सांगितलेला विचार स्वीकारतात का? आपण आपल्या मनाविरुद्ध झाल्यास लवकर चिडतो का ? अशा अनेक बाबतीत बालक 'आत्मपरीक्षण' करण्यास खेळ मदत करतात.

मित्रांच्या दृष्टिकोनातून आपली प्रतिमा ते ओळखू शकतात. आपल्या मित्रांना आवडले पाहिजे म्हणून बालक आपल्या चुका सुधारण्याचा प्रयत्न करते. अपेक्षित वर्तनबदल स्वीकारले. या सर्व बाबी खेळाच्या माध्यमातून बालक सहजतेने, तर कधी जाणीवपूर्वक, तर कधी नाराजीने देखील स्वीकारण्याची तयारी दर्शवतात.

**(३) भावना विकासाच्या (Emotional Value) दृष्टीने खेळाचे महत्त्व :** खेळाच्या माध्यमातून भावना नियंत्रित करण्यास शिकतात. स्वतःच्या हट्टीपणाला मुरड घालून गटाला पोषक असलेले वर्तन करण्यास शिकतो. दोन वर्षांपर्यंतची मुले आत्मकेंद्री असतात. तीन-चार वर्षाची मुले मित्रांच्या सहवासात आल्यावर एकमेकांना खेळणी देतात. त्यांना आपल्या सवंगड्यांविषयी प्रेम वाटू लागते. मित्राला काही दुखापत झाली तर त्यांना वाईट वाटते. सहानुभाव वृद्धिंगत होतो.

**(४) खेळाच्या माध्यमातून नैतिक मूल्ये (Moral Value) विकसित होणे :** मुले खेळांच्या माध्यमातून नियम शिकतात. त्यांची नैतिकता समृद्ध होण्यास मदत होते. **पिआजे** यांच्या मते, शिशूच्या खेळण्यात आत्मकेंद्रितता अधिक असते. हट्टाने आपलेच बरोबर आहे असे म्हणण्याची प्रवृत्ती असते. परंतु मूल मोठे होताच त्याच्या ठिकाणी सहकार्य देण्याची प्रवृत्ती विकसित होते. पुष्कळदा आपले म्हणणे बाजूला ठेवून बालक दुसऱ्या बालकांबरोबर खेळू लागते. थोडे मोठे झाले की खेळामध्ये नियम लावले जातात. परस्पर आंतरक्रियेतून नियमांची उत्पत्ती होते हे बालकाला समजायला लागते.

थोडक्यात चांगले काय आहे किंवा वाईट काय आहे याविषयी सर्वसामान्य दृष्टिकोनातून विचार करावयास लागतात. खेळाच्या माध्यमातून नैतिक मूल्ये विकसित होतात.



मुलांसोबत खेळतांना कु. भाग्यश्री खवळे
(B.A. III Year)

**(५) व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टिकोनातून खेळाचे महत्त्व (Personality Development Point of View):** मूल खेळत असताना ज्या प्रतिक्रिया करते त्याद्वारा बालकाचे व्यक्तिमत्त्वाचे प्रगटीकरण होते. एकाच खेळात एखादा बालक आपल्या मित्राला सहकार्य करेल तर दुसरा नेतृत्व करेल.

खेळताना काही मुले प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढतात, काही खेळ बंद करतील, एखादे मूल आईकडे जावून मदतीची अपेक्षा करेल, एखादा मुलगा खेळ बंद करून माघार घेईल तर एखादा मुलगा रडत बसेल. या प्रतिक्रियांतून बालकाच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू अनुभवास मिळतात.

खेळात अपयश आल्यास काही मुले लवकर चिडतात, निराश होतात. काही मुले खिलाडू वृत्ती दाखवून जिंकण्याचा शेवटपर्यंत प्रयत्न करतात. आयुष्यात अशा दोन प्रवृत्तींचा वर्तनभाव बालकाच्या खेळातून प्रगट झालेला दिसतो.

निराश होवून खेळात माघार घेणारा मुलगा भावी आयुष्यात बिकट परिस्थितीत खचून जाणार तर दुसरा खिलाडू वृत्तीचे वर्तनभाव प्रगट करणारे मूल भावी जीवनात प्राप्त परिस्थितीला यशस्वीपणे तोंड देण्यास तयार राहील अशी भविष्योक्ती करता येते. कारण म्हणतात ना - 'बाळाचे पाय पाळण्यात दिसतात.'

**(६) शैक्षणिक मूल्ये (Educational Value):** 'हसत-खेळत शिक्षण' यावर शिक्षणतज्ज्ञांनी विशेष भर दिला आहे. कारण बालकावर निर्बंध लावल्यास शिकण्याची रुची कमी होते. लहान मुलांना वस्तूंचा आकार, रंग, पोत, वास यासंबंधीचे ज्ञान खेळाच्या माध्यमातून दिले जातात. बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार खेळाच्या माध्यमातून शिकविल्यास जलद ग्रहण करण्यास मदत होते. बालकाला प्राथमिक स्वरूपाची ओळख करून देत असताना दैनंदिन जीवनातील वस्तू घेवून शिकविल्यास मुले जलद गतीने शिकतात.

मॉंटेसरी पद्धती, बालोद्यान पद्धती, Play-way Method अशा अभ्यास पद्धतींचा उपयोग बालकाच्या शिक्षणात केल्या जातो. 'खेळाच्या माध्यमातून शिक्षण' ह्या शैक्षणिक प्रवाहातून बालकांची अभ्यासात प्रगती साधल्या जाते.

**(७) मानसोपचार दृष्टिकोनातून खेळाचे महत्त्व (Psychological Point of View):** खेळात मन उत्साही आणि चैतन्यशील होते. दैनंदिन व्यवहारात बालकाला शिस्त लावण्याच्या दृष्टीने धाक, भीती दाखविली जाते. मूल एकप्रकारच्या दडपणात वाढते, हे मनावरचे दडपण बालकाचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य बिघडविण्यास कारणीभूत होते. हे दडपण घालविण्यास खेळ हा उपचार ठरू ठरतो.

मानसशास्त्रज्ञ मुलांच्या खेळण्याच्या वर्तनाचे निरीक्षण करतात. संयुक्त कुटुंबात दोन चुलत भावंडे समवयस्क असतात. एकदुसऱ्याची खोडी काढणे, खेळणी घेणे असा वर्तनप्रकार घडून येणे सहाजिकच असते. परंतु खोडकर बालकाला याबाबत वारंवार शिक्षा होत असे. त्यामुळे तिच्याजवळ असलेली बाहुली ती खेळणीतील शेगडीवर ठेवून 'तू अशीच जळत रहा, आवाज काढायचा नाही' अशा शब्दात बाहुलीला बजावत असते. या अभ्यासावरून तिला देण्यात येणाऱ्या शिक्षेची प्रतिक्रिया तिच्या खेळण्याच्या वर्तनातून प्रगट होते. दडपलेल्या भावनांना मोकळी वाट करून देण्यात येते.

भीती, मत्सर, दोन बालकांमधील होणारे भांडण इ. 'अनेक' दडपलेल्या भावना खेळाद्वारे प्रगट होवू शकतात. मनोविकृतीचे कारण कुठे दडलेले आहे हे मानसोपचारतज्ज्ञाला शोधता येते आणि बालकांमधील वर्तनसमस्या दूर करण्यास मदत होते. अशाप्रकारे मानसोपचार दृष्टिकोनातून खेळाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे

## खेळाचे विकासात्मक मूल्ये

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शारीरिक मूल्य (Physical Value) | शरीराचा समतोल विकास शरीरसौष्ठव प्राप्त होणे | कारक विकास शरीराच्या स्नायूंना लवचिकता | स्नायूंवर नियंत्रण | शरीरांतर्गत पचन संस्था, उत्सर्जन संस्था, रुधिराभिसरण इ. च्या कार्याला गती |
| आत्मभाव विकसित होणे (Value of Self-Concept) | आत्मनिरीक्षण करण्याची संधी | सहकार्याने काम करण्याची प्रवृत्ती विकसित होते | दुसऱ्यांना समजून घेवून स्वतःचे स्थान निर्माण करणे | खेळातून इतर मुलांच्या प्रतिक्रिया कळून येवून त्यानुसार आत्मप्रतिमा तयार होते |
| भावनात्मक मूल्य (Emotional Value) | खेळाच्या माध्यमातून भावनांवर नियंत्रणे ठेवण्यास शिकतात | आपल्या मित्रांसाठी आपल्या भावनेत बदल करावयास शिकतात, रागावर नियंत्रण. | मित्रांविषयी प्रेम वाटते | सहानुभाव निर्माण होवून एकत्र खेळण्यात रुची |
| सामाजिक मूल्ये (Social- Value) | लहानपणी एक- एकटी खेळणारी मुले आत्मकेंद्री असतात | थोडी मोठी झाली की, आपली खेळणी दुसऱ्या मुलांना देवून परस्परांविषयी आपुलकी भाव दर्शवितात. | आपल्या मित्रांचा विचार खेळांच्या माध्यमातून करावयास शिकतात. नेतृत्व करण्याची क्षमता विकसित होते. | खेळातून समायोजन शिकतात. विविध स्तरावर निर्णय घेताना आपला 'स्वत्वभाव' जपण्याचा प्रयत्न करतात. मित्रांच्या दृष्टिकोनातून आपण चांगले असावे या भावनेतून मित्रांना सहकार्य देण्याची प्रवृत्ती विकसित होते |
| शैक्षणिक मूल्ये (Educational Value) | हसत-खेळत शिक्षणाचे महत्त्व. मॉंटेसरी शिक्षण पद्धती, बालोद्यान पद्धती, जीवन शिक्षण पद्धती यातून खेळांच्या माध्यमातून शिकविले जाते. त्यामुळे अभ्यासात रुची निर्माण होवून शिक्षणात गती वाढते | वस्तूचे आकार, पोत, रंग, वास या बाबींचे ज्ञान खेळाच्या माध्यमातून दिल्यास शिक्षणाबरोबर मनोरंजन घडून येते | Play-way-Method या शिक्षण पद्धतीमुळे आकलन क्षमता वाढते | ज्ञानसंवर्धन आणि ज्ञानसंपन्नता ही शैक्षणिक मूल्ये बालकाचे व्यक्तिमत्त्व साकारतात |


BLUE
GREEN
PINK



## खेळाचे वर्गीकरण (Classification of Play)

बालक आपल्या वयाच्या परिपक्वतेनुसार खेळ खेळताना दिसतात. अनेक अभ्यासकांनी खेळासंबंधी अभ्यास केला. खेळाचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे नमूद केले आहे.





लघु पट



रस्सी कूदो ।



रस्सी खेंच

**कार्ल ग्रूस यांच्या मताप्रमाणे खेळाचे प्रकार :**

- प्रयोगशील खेळ (Experimental Play)
- रचनात्मक किंवा सृजनशील खेळ (Consructive and Creative Play)
- हालचालींचे खेळ (Movement Play)
- बौद्धिक खेळ (Intellectual Play)
- लढाईचे खेळ (Fighting Play)

**E. B. Hurlock यांच्या मताप्रमाणे खेळाचे प्रकार :**

- स्वयंस्फूर्त खेळ (Free or Spontaneous Play)
- वैयक्तिक खेळ (Individual Play)
- नाट्यपूर्ण खेळ (Dramatic Play)
- अनुकरणात्मक खेळ (Imitative Play)
- संघटित खेळ

## खेळाचे साधने (Play Materials):

शैशावस्थेत खेळणींची मागणी फारच कमी असते. घरात असतील त्या वस्तू घेवून खेळले जाते. वाढत्या वयानुसार खेळणींची आवश्यकता वाढते. बालकासाठी खेळणी घेताना पुढील बाबी लक्षात घ्याव्यात -

(१) बालकाच्या खेळाच्या गरजा पूर्ण होईल अशी वयोगटाला अनुरूप अशी खेळणी घ्यावी.

(२) खेळणी तकलादू नसावीत. खेळणी फार लवकर तुटल्यास बालक नाराज होते.

(३) धारदार, हानिकारक रंग असणारी खेळणी टाळावीत.

(४) खेळणी फार महाग असू नये. बालक खेळणींची मोडतोड करतो. याशिवाय वाढत्या वयानुसार विशिष्ट खेळणीतील रुची कमी होते.

(५) बालकाच्या सर्वांगीण विकासाला पोषक ठरतील अशा खेळणींची निवड करावी.

बैठे खेळाला उपयुक्त ठरणारी खेळणी, उदा. सापसिडी, चायनीज चेकर, लुडो, व्यापार, कॅरमबोर्ड, पत्ते.







स्टिक पोलो



डमरू

## खेळावर परिणाम करणारे घटक (Factors affecting on Play):

प्रत्येक वयोगटात मुले खेळतात. काही मुलांना बैठे खेळ अधिक आवडतात तर काही बालकांना मैदानी खेळ आवडतात. या खेळण्याच्या प्रवृत्तीवर प्रभाव करणारे पुढील घटक आहेत.

**(१) आरोग्य (Health):** बालकाचे आरोग्य चांगले असेल तर अशी मुले सामान्य, किरकोळ अस्वास्थ्यामुळे मैदानी खेळात रुची दर्शवितात. ज्या मुलांचे आरोग्य चांगले नसते अशा मुलांना मैदानी खेळामुळे लवकर थकवा येतो. म्हणून बैठे खेळाला प्राधान्य देत असल्याचे दिसून येते. आरोग्य चांगले असेल तर आवडीच्या विशिष्ट खेळात प्रावीण्य प्राप्त करू शकतात.

**(२) कारक विकास (Motor Development):** ज्या मुलांचा कारक विकास चांगला झाला असतो अशी मुले क्रियात्मक खेळात सहभागी होताना दिसतात. शैशवावस्थेत मूल चालायला शिकते. त्यावेळी चालणे हाच त्याचा खेळ ठरतो. त्यानंतर धावण्याचे क्रियाकौशल्य साध्य केल्यानंतर लपंडाव खेळणे, विषामृत खेळणे, धावण्याची शर्यत लावणे असे खेळ खेळले जातात.

ज्या मुलाचा कारक विकास योग्य झाला नसेल अशी मुले झाडावर चढणे, उड्या मारणे, अरुंद जागेवरून चालणे, चित्र काढणे, मणी ओवणे अशा क्रिया कौशल्यात मागे पडतात. मणी ओवण्यामध्ये हात, डोळे आणि चित्त (लक्ष) या तीन गोष्टींचा समन्वय साधल्या जातो.

**(३) वय (Age) :** वयाच्या परिपक्वतेचा खेळावर विशेष प्रभाव होतो. उदा. शैशवावस्थेत स्वतंत्रपणे खेळले जाणारे खेळ पुढे नियमबद्ध खेळले जातात. वैयक्तिक खेळाची जागा सामूहिक खेळ घेते.

**(४) लिंगभेद (Sex Difference):** शैशवावस्थेत मुले आणि मुली यांच्या खेळामध्ये फरक नसतो. परंतु बालक मोठे झाल्यावर (उत्तरबाल्यावस्थेत) लिंगभेदाप्रमाणे गट दिसून येतात.

मुले ही मुलींपेक्षा अधिक श्रमाचे खेळ खेळताना दिसतात. मुली बाहुला-बाहुलीचे खेळ खेळताना दिसतात. आईच्या वर्तनाचा प्रभाव मुलींच्या खेळण्यावर दिसून येतो.





फुगडी खेलो ।

**महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली**

**मराठी विभाग**

**सत्र : २०२३ - २०२४**

# प्रकल्प

**-: प्रकल्पाचे शीर्षक :-**

# केशवसुतांच्या निवडक कवितांचा अभ्यास

**-: प्रकल्प सादरकर्ते विद्यार्थी :-**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे |
|---|---|
| १ | विशाल नानाजी दहिकर |
| २ | ललित हरीमन राऊत |
| ३ | आचल येनुनाथ कुकडकर |
| ४ | पायल दुरुगसींग कुमरे |
| ५ | पवन संजय ढोंगे |
| ६ | श्रीकांत मुरारी उईके |
| ७ | प्राची शरद बांबोळे |
| ८ | देव्यानी योगाजी बोरकुटे |
| ९ | अभिषेक अरुण चौधरी |
| १० | दिपक कालीदास चुधरी |

**मार्गदर्शक**

**प्रा. दिलीप घोनमोडे**

**मराठी विभागप्रमुख**

**महात्मा गांधी कला, विज्ञान व**

**स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, बी. ए. भाग ३ च्या खालील विद्यार्थ्यांनी **"केशवसुतांच्या निवडक कवितांचा अभ्यास"** या विषयावरील प्रकल्प गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील मराठी विषयाच्या पदवीकरिता मराठी विभाग व संशोधन केंद्राला सादर केला आहे.

प्रस्तुत प्रकल्प विभागप्रमुख प्रा. दिलीप घोनमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्ध केला आहे. त्यांनी या प्रकल्पासाठी आवश्यक सामग्री परिश्रमपूर्वक मिळविली आणि तिचा सर्वमान्य संशोधन पद्धतीप्रमाणे अभ्यास करून सदर प्रकल्पाच्या रूपाने सूत्रबद्ध मांडणी केलेली आहे.

## प्रकल्प सादरकर्ते विद्यार्थी

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | विशाल नानाजी दहिकर | Dahikar |
| २ | ललित हरीमन राऊत | Lrautal |
| ३ | आचल येनुनाथ कुकडकर | A. Y. Kukadkar |
| ४ | पायल दुरुगसींग कुमरे | PKumare |
| ५ | पवन संजय ढोंगे | Donge |
| ६ | श्रीकांत मुरारी उईके | SUikel |
| ७ | प्राची शरद बांबोळे | P Bambole |
| ८ | देव्यानी योगाजी बोरकुटे | D Borkute |
| ९ | अभिषेक अरुण चौधरी | A.A. Choudhari |
| १० | दिपक कालीदास चुधरी | दि. का. चुधरी |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | काव्यातील अंतरंग बदल | १ |
| २ | काव्यातील बहिरंग बदल | ४ |
| ३ | केशवसुतांचा कवी, काव्य व प्रतिभा विषयक दृष्टिकोन | ५ |
| ४ | केशसुतांची सामाजिक व राष्ट्रीय (राजकीय) कविता | १० |
| ५ | केशवसुतांच्या निसर्ग विषयक कविता | १५ |
| ६ | केशवसुतांच्या प्रेम विषयक कविता | १७ |
| ७ | केशवसुतांच्या गुढगुंजनात्मक (रहस्यमय) कविता | १९ |
| ७ | सारांश | २१ |

# केशवसुतांच्या निवडक कवितांचा अभ्यास

## ➢ प्रस्तावना :–

केशवसुत (कृष्णाजी केशव दामले) यांचा जन्म १५ मार्च १८६६ ला, तर मृत्यू ०७ नोव्हेंबर १९०५ ला झाला. त्यांना लाभलेल्या ३९ वर्षाच्या कारकिर्दीचा काळ म्हणजे इंग्रजी राजवटीच्या शांततेचा व स्थैर्याचा काळ होता. कावेबाज इंग्रजांनी सत्ता बळकटीच्या हेतूने भारतीयांच्या स्वाभिमान व सत्याभिमानाचे खच्चीकरण करण्यास पहिले पाऊल हे इंग्रजी शिक्षण देण्याचे उचलले. त्यांनी विद्यार्जन व द्रव्यार्जनाचा विचित्र संबंध जुळविल्याने त्यांच्या इंग्रजी विद्येसह इंग्रजी संस्कार व मूल्यांचाही प्रभाव तत्कालीन पिढीवर पडू लागला. अनुकरणाची ही लाट सर्वप्रथम सुशिक्षितांवर पडली. परंतु या इंग्रजीकरणाने वाङ्मय क्षेत्रावर अंमल गाजवितांना सुधारणावादाला जन्म दिला. समाज सुधारणेच्या नावाखाली पाश्चात्य मूल्यांचा प्रचार व पुरस्कार करतांना, सुशिक्षितांचे भारतीय जुन्या मूल्यांवर कठोर प्रहार सुरू झाले. समकालील म्हणून केशवसुतांवरही त्याचा परिणाम झाला. म्हणूनच त्यांनी आपल्या काव्यातून पुरस्कृत केलेली तत्वे पाश्चात्यरूप असून, त्यांचे नवे व वेगळ्या वळणाचे काव्य इंग्रजी काव्याच्या धर्तीवरचे आहे. हे सारे मान्य करूनही, त्यांची कविता पारंपारिक कवितेपेक्षा प्रकृती विशेष, आशय व वेषभूषेने भिन्न ठरली. तिचा थाट, तिचे वळण, तिची चाल वेगळी व नवी ठरली. कारण तिने काव्याची मळलेली वाट सोडून नवी वाट धरली होती. तिने आधुनिकता स्वीकारतांना नवाच साज शृंगार चढविला होता. त्यामुळेच केशवसुतांचा पहिला व आद्य कवी किंवा काव्यात नाविण्य व आधुनिकता ओतणारा कवी म्हणून उल्लेख करावा लागतो. मुळात केशवसुतांनी घडवून आणलेला हा बदल दुहेरी स्वरूपाचा होता.

## ➢ काव्यातील अंतरंग बदल :–

### १) आत्मलेखन/आत्माविष्कार/आत्मनिष्ठत्व :–

केशवसुतांच्या काव्याचे हे मुख्य लक्षण होय. केशवसुत पूर्वीची कविता ही बहुतांशी कथनपर, वर्णनपर व वस्तुनिष्ठ स्वरूपाची होती तयात कवीला व्यक्तिगत अनुभूतींना स्थान देता येत नसल्याने, त्याला स्वत:चे विचार वा भावना व्यक्त करतांना एखाद्या कथेतील वा रचनेतील पात्रांचा आधार घ्यावा लागत असे.

मात्र केशवसुतांनी या परंपरेला तडा देत काव्याद्वारा आपल्या अनुभूती व विचार स्पष्टपणे प्रकट वा नमूद करण्यास प्रारंभ केला. त्यांनी आपले अंतरंग भावविश्व शब्दांनी साकार करता येते, स्वत:च्या प्रेमानुभूती काव्याद्वारा व्यक्त करता येतात, स्वत:च्या काव्याचा गौरव करता येतो, सामाजिक–सांस्कृतिक–राजकीय जीवनावर भाष्य करतांना आपल्या आकांक्षा व्यक्त करता येतात, काव्यात व्यक्तिनिष्ठ भावना व विचार व्यक्त केल्याने उत्कटता व रसरम्यत्व निर्माण होतो. यासारख्या

बाबी सोदाहरण सिद्ध केले. त्यामुळे त्यांची कविता प्रत्यक्षतः मानवी व जीवंत वाटू लागली. जे तत्कालीनांना नाविण्य स्वरूप होती.

## २) व्यक्तिस्वातंत्र्य व समतेचा पुरस्कार :—

केशवसुतांनी नवकाव्याच्या वळणावरच्या काही सामाजिक व राष्ट्रीय कविता रचल्या. अशा कवितांतून त्यांनी रूढी, परंपरा विरोधी जे नव वा बंडखोर विचार मांडले. त्यामुळे त्यांना क्रांतिकारक कवी म्हटल्या गेले. 'तुतारी' सारख्या कवितेत त्यांनी रूढींना अक्षरशः जुलमी व राक्षसी संबोधून त्यांच्या विरूद्ध 'समतेचा ध्वज उंच धरा रे' असा संदेश दिला. तर 'स्फूर्ति' या कवितेत रूढीच्या दासा विरोधात 'उठा! उठा! बांधा कमरा' असे आव्हान करून बंडाची चेतावणी दिली. म्हणूनच त्यांचा 'नवा शिपाई' स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ह्या तत्वत्रयींना सोबत घेऊन 'नव्या युगाचा, नव्या दम३ाचा' शूर सैनिक होतो. पण त्याची आकांक्षा मात्र लढण्यापेक्षा 'शांतीचे साम्राज्य' स्थापन करण्याची अधिक आहे.

अशाप्रकारे त्यांनी आपल्या सामाजिक व राष्ट्रीय कवितांत व्यक्तिस्वातंत्र्य व समतेचा उत्कटतेने व जोमाने पुरस्कार केला.

## ३) काव्यविषयक आत्माविष्कार :—

केशवसुतांना आपल्या कवित्वशक्तीविषयी दुर्दम्य आत्मविश्वा होता. तो त्यांनी आपल्या अनेक कवितांतून व्यक्तही केला आहे. याचा साक्षात्कार त्यांच्या 'आम्ही कोण' या कवितेतून होतो. त्यात ते म्हणतात, आम्ही देवाचे लाडके असून आम्ही आमच्यातील प्रतिभाबलाने अखिल विश्वात संचार करण्याचे सामर्थ्य बाळगतो. 'स्फूर्ति' या कवितेत तर ते काव्यपंक्तीच्या तरफेच्या बळावर संपूर्ण जग उलथून टाकण्याची भाषा बोलतात. तर 'कवितेचे प्रयोजन' या कवितेत ते काव्याच्या ठिकाणी प्रेतांनाही जीवंत करण्याचे सामर्थ्य असल्याचे बोलून दाखवितात.

एकंदर, कवी हा क्रांतिकारक, युगप्रवर्तक असतो. तो समाजाला उत्स्फूर्त करणारा, प्रेरणा देणारा, जुन्यांचा विध्वंस करून नव्या मूल्यांचे दर्शन घडविणारा सुधारक असतो. असे आवेशपूर्ण उद्‌गार त्यांनी अतिशय भावोत्कटतेने आपल्या अनेक कवितांत नोंदविले आहेत. म्हणूनच त्यांच्या कवितांत रसत्वाची एक वेगळी प्रतिती यायला लागते.

## ४) प्रणयाचा आत्मनिष्ठ आविष्कार :—

प्राचीन काव्यात कोणत्याही कवीने आपल्या वैयक्तिक प्रेमाचे अनुभव काव्यातून व्यक्त करणे अशिष्ट मानले जात असे. मात्र केशवसुतांनी या परंपरेला खंडीत केले. त्यांनी इंग्रजी काव्याच्या धर्तीवर स्वतःचे प्रेमानुभव काव्यातून व्यक्त करण्यास प्रारंभ केला. मात्र यात त्यांचे प्रेमाचे स्वानुभव व्यक्त करण्यापेक्षा परनिष्ठ अनुभव व्यक्त करण्यावरच भर होता. त्यांच्या काही कविता तर वैयक्तिक अनुभवापेक्षा प्रेमाचे तत्वज्ञानच सांगणाऱ्या भासतात. उदा.— प्रीति, समृद्धी आणि प्रीति, कर्तव्य आणि प्रीति, प्रीतिची भाषा इत्यादी. त्याचप्रमाणे त्यांनी सर्वप्रथम वैयक्तिक प्रेम व्यक्ततेचा पायंडाच रचला. यात स्त्री—पुरूषातील शृंगारिक प्रेमासह कौटुंबिक प्रेमालाही स्थान दिले. त्यामुळेच त्यांना मानवी प्रणयाचा आत्माविष्कार करणारा पहिला कवी म्हणूनही मान दिला जातो.

### ५) निसर्गविषयक नव दृष्टी :—

केशवसुतांचा निसर्गविषयक दृष्टिकोन हा पारंपारिक स्वरूपाचा नव्हता. तो नवा होता. मुळात प्राचीन काव्यात निसर्गाला काव्यविषयक स्वतंत्र स्थान नसल्याने, त्या निसर्ग वर्णने प्रासंगिक व आनुषंगिक स्वरूपात येत. तो केवळ कोणत्या तरी विषयाची पार्श्वभूमी म्हणून येई. मात्र केशवसुतांना निसर्गात प्रेम, चारूता व आनंदाचा साक्षात्कार झाल्याने त्याच्या सानिध्यात त्यांना मन:शांती लाभण्याचा अनुभव आला. आणि त्यांना 'हरपले श्रेय' गवसू लागले. म्हणूनच त्यांनी निसर्गात मानवाला सुखी, समाधानी व आनंदी करण्याचे सामर्थ्य असल्याचा दृष्टिकोन काव्यातून मांडला. निसर्गातून मानवी जीवनाला उपकारक तत्वे वा संदेश शोधण्याची ही प्रवृत्ती काव्यात नवीनच होती.

यावरून निसर्गावर चेतना वस्तूचा आरोप करून निसर्गाचे आत्मनिष्ठ दृष्टिकोनातून वर्णन करण्याची प्रथा सुरू करण्याचा मानही केशवसुतांनाच द्यावा लागतो.

### ६) जीवननिष्ठ काव्यरचना :—

केशवसुतांच्या काव्यात वैयक्तिक भावभावनांच्या प्रतिबिंबासह तत्कालीन समाजाच्या विचारांचेही प्रतिबिंब उमटलेले दिसतात. ते पारंपरिक जुन्या मूल्यांवर कठोर आघात करून व्यक्तिस्वातंत्र्य, समता व बंधुता या सामाजिक ध्येयांचा उद्घोष आपल्या कवितांमधून करतात. यादृष्टीने त्यांच्या 'स्फूर्ति', 'तुतारी' सारख्या कविता उल्लेखनीय ठरतात. त्यांचा 'नवा शिपाई' तर 'जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत' असा उद्घोष करीत जगात शांतीचे साम्राज्य स्थापण्याची अभिलाषा बाळगतो. 'मजुरावर उपासमारीची पाळी' कवितेतून मजुरांची आर्थिक विषन्नता सर्वांपुढे मांडतो. 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' मध्ये अस्पृश्य समाजाची मनोव्यथा स्पष्ट करतो.

अशाप्रकारे केशवसुतांनी आपल्या काव्यातून काव्य व तत्कालिन समाज जीवन यांचा अनोखा संगम साधून काव्याला जिवननिष्ठ बनविले.

### ७) सुधारणावादी सामाजिक दृष्टी :—

केशवसुत हे सुधारणावादी होते. त्यांनी आपल्या काव्यातून स्वातंत्र्य, समता, बंधुता व ऐहिकतेच्या मूल्यांचा पुरस्कार केला. त्यांनी आपल्या काव्यातून प्राचीन मूल्यांवर आधारित जुन्या रूढी व परंपरांवर कठोर आघात केला. त्यांनी समाज सुधारणेची 'तुतारी' फुंकली. जुन्या पिढीतील लोकांना त्यांनी 'रूढी जुलुम यांची भेसूर राक्षसी संताने' म्हणून हिनविले. आणि ते 'जुने जाऊ द्या मरणा लागूनि' असा आदेश देत फिरले. ते समाजाला समाज सुधारणेची जाण करून देतांना म्हणतात—

'हल्ला करण्या तर दंभावर तर बंडावर
शुरांनो या त्वरा करा रे,
समतेचा ध्वज उंच धरा रे,
नीतिची द्वाही पसरा रे'

असे आवाहन केले. अशाप्रकारे त्यांच्या जुन्या मूल्यांवरील कठोर आघाताने, त्यांच्या काव्यात मूर्तिभंजकता व विध्वंसकता निर्माण झाली. मात्र सामाजिक समस्यांविषयी आवेशाने बोलणारे केशवसुत राजकीय समस्यांचा आपल्या कवितांमध्ये फार कमी उल्लेख करतात.

### ८) काव्यातील विचारप्रधानता व बोधपरता :—

केशवसुत स्वभावाने विचारी व चिंतनशील असल्याने त्यांच्या बहुतांश कवितांमध्ये भावनेच्या उत्कटतेपेक्षा विचारशिलता वा विचारप्रधानता अधिक दिसते. मात्र आपल्या अशा कवितांची वेधकता कायम टिकविण्यास त्यांनी त्यात अनेक रूपकांचा व प्रतिभांचा आधार घेतला आहे. उदा.— 'कल्पकता', 'चिन्हीकरण', 'दिव्य ठिणगी', 'स्वर्ग, पृथ्वी आणि मनुष्य', 'सृष्टी, तत्व आणि दिव्यदृष्टी', 'शब्दांनो मागुते या', 'दिवा आणि तारा' यासारख्या चमत्कृतीपूर्ण कवितांचा येथे उल्लेख करता येईल.

तसेच समाज हिताची कळकळ, तत्कालिन समाज रचनेविषयीचा तिटकारा, साध्या विषयातही मोठा आशय शोधण्याची वृत्ती व स्वमत प्रतिपादनाची हौस या विशेषांमुळे त्यांच्या कवितांत बोधात्मकता वा उपदेशात्मकता दिसून येते. त्यांच्या 'विद्यार्थ्याप्रत', 'उत्तेजनाचे शब्द' इत्यादी सारख्या कवितांमध्ये याचा प्रकर्षाने प्रत्यय येतो.

तात्पर्य, उपरोक्त घटकांचा विचार करता व्यक्तिगत भावभावनांचा आत्मनिष्ठ आविष्कार, व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रभावी पुरस्कार, मूर्तिभंजकता, रूढ मूल्यांविरूद्धची बंडखोर वृत्ती, मनातील गुढ अनुभूतींचे व्यक्तिगीकरण, अलौकिकाचा ध्यास, सृष्टीला चेतन मानून तिच्यातील सौदर्याचे दर्शन घडविण्याची वृत्ती, काव्याद्वारा समाज प्रबोधनाचे कार्य यासारखी अंतरंग लक्षणे नव्या संप्रदायाची मुहूर्तमेढ करणारी ठरली.

## ➢ काव्यातील बहिरंग बदल :—

### १) जुन्या ऐवजी नवी रचनाबंधे :—

केशवसुतांनी काव्यात जसा बदल घडविला, तसाच काव्याच्या रचना शैलीतही बदल घडविला. त्यांनी नव्या विषयांना अनुरूप अशी अभिव्यक्तीची नवी साधने शोधून काढली. म्हणूनच 'अशी असावी कविता फिरून, तशी नसावी कविता म्हणून' असे सांगणारे केशवसुत आम्हाला सांगणारे, विचारणारे तुम्ही कोण? असा सवालही करतात.

केशवसुतांना काव्याच्या बाह्यंगावरील रूढ बंधने मान्य नसल्याने, त्यांनी नेहमीच नव्या आशयाला पूरक असे नवे प्रयोग स्वीकारले. मात्र हे करतांना त्यांना रचनाशैलीची जुनी चौकट पुरेता झुगारता आली नाही. म्हणूनच त्यांच्या काव्यात जुन्या विविध जाती व वृत्तांसह बोजड संस्कृत शबद आढळतात. त्यांच्या काही कविता तर प्रत्यक्षत: संस्कृत कवितांची भाषांतरेच ठरतात. असे असले तरी काही बाबतीत मात्र त्यांनी रूढ चाकोरी सोडून नवीन चाकोरी रूढ करण्याचा परोपरीने प्रयत्न केल्याचे मान्य करावे लागते.

### २) यमक रचनेचे नवे प्रयोग :—

केशवसुतांनी यमकाच्या सांकेतिक पद्धतीत बदल करून नव्या यमक रचनेचे प्रयोग केले. या संदर्भात त्यांच्या 'तुतारी', 'झपूर्झा', 'श्यामाराणी', 'वातचक्र' इत्यादी काही कवितांचा आवर्जून उल्लेख करावा लागतो. विशेषत: केशवसुतांनी दोन किंवा चार ओळींचे खंड पाडण्या ऐवजी अधिक

पक्तींचे गट कल्पिता येतात. हे दाखवून देतांना 'तुतारी' सारख्या कवितेत पाच चरणी रचना केली. आणि त्या पहिल्या व अखेरच्या चरणाचे यमक साधतांना मधल्या तीन चरणांचेही यमक साधले. तर त्यांची 'झपूर्झा' सारखी कविता नव्या जातीची ठरून जाते. त्यात त्यांनी बालानंद ह्या नर्तनाकुल रचनेचा समर्पक व सुंदर वापर केला आहे. काही ठिकाणी तर त्यांनी चरणांच्या लांबी रूंदीत फरक करून यमक रचनेत वैविध्य व वैचित्र्य आणले आहे. 'फुलांची पखरण' व 'फुलपाखरू' या कवितेत तर ते वृत्तबंधन शिथिल करण्याचा प्रयत्न करतांना दिसतात.

केशवसुतांचे यमक विषयक हे नव प्रयोग तेवढेच लोकप्रिय ठरले. त्याचीच परिणती की अलिकडे काव्यात मुक्त रचना होतांना दिसते.

### ३) सुनीत रचनेचा पायंडा :—

सुनीत हा काव्यप्रकार इंग्रजी काव्यातील Sonnet चा मराठी अवतार असून त्याचेय आद्य पुरस्कर्ते केशवसुत आहेत. त्यांनी मराठी काव्याच्या बाह्यांगात जे विविध बदल घडविले, त्यातील सर्वात महत्वाचा व उल्लेखनीय विशेष म्हणजे सुनीत रचनेचा होय. त्यांनी एकूण ९ सुनीते रचली आहेत. केशवसुतांनी ५ सुनीते प्रेमविषयक, तर २ सुनीते काव्यविषयक रचलेली आहेत. बहुतेक सुनीतात त्यांनी शार्दुलविक्रीत वृत्त वापरतांना यमकाची बंधने पाळली आहेत. सुनीतात शेवटच्या द्विपदीला महत्व असते. त्यात त्यांनी वेगवेगळ्या वृत्तांचा वापर केला. त्यांनी रचलेल्या सुनीतांमध्ये 'आम्ही कोण?', ' मयुरासन व ताजमहाल', 'प्रतिभा' ही सुनीते रचनादृष्ट्या उल्लेखनीय ठरतात.

तात्पर्य, केशवसुतांच्या काव्याचा अंतरंग व बहिरंग दृष्ट्या विचार करता, त्यांनी मराठी कवितेला आशय व अभिव्यक्तीबाबत नवे वळण दिल्याचे दिसून येते. त्यांचे हे कार्य गौरवास्पद असल्यानेच त्यांचा 'युगप्रवर्तक व क्रातिकारक कवी' म्हणून उल्लेख करावा लागतो. तसेच त्यांना अर्वाचीन काव्याचे जनक, आधुनिक काव्याचे प्रणेता व काव्याच्या प्रांतातील कविकुलगुरू असेही संबोधावे लागते.

## केशवसुतांचा कवी, काव्य व प्रतिभा विषयक दृष्टिकोन

केशवसुतांच्या काव्याचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आपल्या कवितांतून व्यक्त केलेला कवी, काव्य व प्रतिभा विषयक दृष्टिकोन हा होय. कवी म्हणजे द्रष्टा, क्रांतीचा अग्रदूत, सुधारणेचा व प्रगतीचा प्रेषित अशी त्यांची धारणा असल्याने तो जनतेचा आदर विषय बनावा, तो समाजाचा समाजनेता बनावा असे त्यांना वाटत होते. म्हणूनच त्यांनी काव्यविषयक जुन्या कल्पना सोडून देऊन, त्याऐवजी नवीन कल्पना व नवीन मूल्ये प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. हे करतांना त्यांनी ज्ञानेश्वरांदीप्रमाणेच कवीच्या प्रतिभा सामर्थ्याबद्दल गौरवाद्गार काढले.

वास्तवत: केशवसुतांच्या काव्यविषयक दृष्टिकोन व्यक्त करणाऱ्या बऱ्याच कविता आहेत. तेव्हा चर्चेच्या सोयीस्तव त्यांच्या काव्यविषयक कवितांचे —

१) कवी विषयक कल्पना, २) काव्याचे प्रयोजन वा उद्दिष्ट, ३) प्रतिभा विषयक कल्पना व ४) काव्यास प्रेयसी कल्पून केलेला विचार असे एकूण चार वर्ग पाडले जातात.

## १) कवी विषयक कल्पना :—

केशवसुतांनी आपल्या बऱ्याच कवितांमध्ये काव्यरचना करण्याचे महत् कार्य करणाऱ्या कवी विषयीची कल्पना व्यक्त केली आहे. यादृष्टीने त्यांच्या 'कवि', 'आम्ही कोण?', 'दूर कोठे एकला जाउनीया', 'स्फूर्ति', 'सृष्टि, तत्त्व आणि दिव्य दृष्टि', 'धूमकेतु आणि महाकवि', 'फिर्याद' या कविता उल्लेखनीय ठरतात.

केशवसुत 'कवी' या कवितेत कवीचे महात्म्य वर्णितांना तो सामान्य दृश्यालाही अलौकिक रूप देतो. तो ज्या मार्गावरून चालतो, त्या मार्गावरील धुलीकणांचे सोने होते. एवढेच नव्हे तर

तो गंभीर वदे रवा, तर मुक्या पृथ्वीस या वाटते,
की ''माने श्रुति लक्षसंख्य फुटल्या,'' आणीक ती ऐकते!

तसेच तो आपली दृष्टी जेव्हा आकाशाकडे वळवितो, तेव्हा त्याला आकाशही खुजे भासते. त्याच आकाशातील तारका त्यांच्या महात्म्यतेचे गुणगान करायला लागतात. म्हणूनच ते आपल्या 'आम्ही कोण?' या कवितेत दिमाखाने सांगतात की —

आम्ही कोण म्हणूनि काय पुससी? आम्ही असू लाडके
देवाचे, दिधले असे जग तये आम्हांस खेळावया;
विश्वी या प्रतिभाबले विचरतो चोहीकडे लीलया;
दिक्कालातुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके!

प्रतिभा बलाने सकल विश्वात संचार करणारा, दिक्कालाच्याही पलीकडे पाहणारा, देवाचा लाडका या वर्णनातून ते त्याच्या श्रेष्ठत्वाचे वर्णन करतात.

आम्हांला वगळा — गतप्रभ झणी होतील तारांगणे;
आम्हांला वगळा — विकेल कवडीमोलावरी हे जिणं!

असे ते ठणकावून बजावतात. कारण कवीच्या हत्सस्पर्शात दिव्य सौदर्य निर्मितीची किमया आहे. तो शून्यात वसाहती करून पृथ्वीला सूरलोक साम्य प्रदान करतो. त्याच्या कृतीतून अमृत पाझरतो. ते शरण्य व मंगल स्वरूपी आहेत.

'दूर कोठे एकला जाउनीया' सारख्या कवितेत जेव्हा मन आत्म्याशी क्रीडा करतो, त्यास आळवतो; तेव्हाच कुठे खरे काव्य जन्माला येते असे केशवसुतांना वाटते. तर 'सृष्टि, तत्त्व आणि दिव्य दृष्टि' या कवितेत कलावंताला दिव्य दृष्टी प्राप्त झाल्यानंतर त्याला सृष्टीतील सुप्त सौंदर्याचा साक्षात्कार व्हायला लागतो. अशावेळी त्याला एखाद्या घोड्यातही चैतन्य दिसू लागण्याची कल्पकता व्यक्त व्हायला लागते.

केशवसुतांची 'स्फूर्ति' ही कविता तर अत्यंत ओजाची व बंडखोर वृत्तीची आहे. ती जशी आशापूर्ण आहे. तशीच ती डौलदार व काव्यपूर्णही आहे. येथे ते बंडाचा झेंडा उभारून जिकडे तिकडे धामधूम करताना काव्य सामर्थ्याच्या बळावर बंडखोर व दुर्दम्य आत्मविश्वासाचे उद्गार नोंदवितांना —

पद्यपंक्तिची तरफ आमुच्या करी विधीने दिली असे,
टेकुनि ती जनताशीर्षावरि जग उलथुनिया देउ कसे!

असे अतिशयोक्तीपूर्ण उद्गार काढत असले तरी ते कवितेत भावोत्कट व ओजोगुणयुक्त वाटतात. 'काव्य कोणाचे?' या कवितेत तर खरे कवित्व शब्दशिल्पात वा गणमात्रा जुळविण्यात नसून अंत:करणातील दिव्य प्रेरणेत असल्याचे सांगतांना –

शारदेने जो मंत्र दिला कानी,

तसे लिहिले मी; काव्य तिचे मानी

असे सांगून शारदेने दिलेल्या मंत्रात अंत:स्फूर्तीचे महत्व असल्याचे सूचित करतात. तर दुसरीकडे 'सृष्टि आणि कवि' सारख्या कवितेत सृष्टीत खरीखुरी काव्यशक्ती असून, मानवी कलाकृतीतून या सृष्टीतील दिव्यता, सामर्थ्य व स्वाभाविकता कदापी निर्माण करणे शक्य नसल्याचे ते मान्यही करतात.

त्यांच्या 'फिर्याद' आणि 'रूष्ट सुंदरीस' या कविता परस्पर प्रेम कविता वाटत असल्या, तरीह त्या काव्यदेवतेस उद्देशून लिहिल्या असल्याचा कित्येकांचा समज आहे. जगाच्या उद्धारासाठीच कवीचा जन्म होतो. कारण 'जे न देखे रवि, ते देखे कवी' अशा त्याच्या प्रतिभेला दिशा व काळाची बंधने नसतात.

सारांश, केशवसुतांच्या मते कवी हा विश्वात आनंद व सौदर्य निर्माण करणारा दिव्य व थोर पुरूष असल्याने, त्याचे कवी महात्म्य वर्णन करतांना ते म्हणतात –

राही तो; तर देव भूमिवरती येतात हिंडावया,

जाता, स्वर्ग सवे धरेस उतरे त्यालागि धुंडावया!

असे आत्यंतिक अभिमानाचे उद्गार काढतांना त्याला परमेश्वरी स्वरूप देऊन परमेश्वराचा लाडका करून सोडतात.

## २) काव्याचे प्रयोजन वा उद्दिष्ट :–

अनुभवाने मानवी मन व विचार घडतात. हे लक्षात घेता केशवसुतांचे प्रारंभीचे विचार व नंतरचे विचार यात फरक जाणवायला लागतो. म्हणूनच कदाचित त्यांनी काव्याची दोन प्रयोजने सांगितली असावीत, हे मान्य करून घ्यावे लागते. यातील त्यांचा पहिला विचार हा वैयक्तिक समाधानाचा आहे. तर दुसरा विचार हा कवितेच्या समष्टिरूप उपयोगित्वाचा आहे.

दगदगलेल्या समाज जीवनात ते वैयक्तिक समाधान कवितांमध्ये शोधायला लागतात. अशावेळी ते 'कविता आणि कवि' या कवितेत तया विषयीच्या भावना व्यक्त करतांना म्हणतात –

करूनिया काव्य जनात आणणे

न मुख्य हा हेतु तदीय मी म्हणे;

करूनि ते दंग मनात गुंगणे,

तदीय हा सुन्दर हेतु मी म्हणे.

समाजाकरिता कविता रचायची म्हणून रचने हा माझ्या कवितांचा हेतु नसून, मला माझ्या अंत:मनात उचंबळणाऱ्या, दंग करून जाणाऱ्या, सुंदर अशा भावभावनांची अनुभूती सकलांना द्यायची आहे. कारण हे करतांना 'गाण्याने श्रम वाटतात हलके' यासारखा अनुभव येतांना मनाची खिन्नता,

उदासिनता नाहीशी होते. दु:खीतांना अपार समाधान लाभतो. यासारखी गौण प्रयोजने काव्याद्वारा साध्य करता येतात.

मात्र केशवसुतांनी काव्याच्या प्रयोजनात वैयक्तिक समाधानाच्या उद्दिष्टांपेक्षा समष्टिरूप उपयोगित्वाच्या उद्दिष्टांवर अधिक भर दिला आहे. म्हणूनच त्यांच्या कवितांमध्ये वैयक्तिकतेचा उल्लेख करणाऱ्या कवितांपेक्षा सामाजिक व राष्ट्रीय प्रयोजनांचा उल्लेख करणाऱ्या कविताच जास्त दिसतात. अशाच कवितांत त्यांची खरी काव्यात्मकता प्रगट झाली आहे. याची प्रचिती ते 'स्फूर्ति' या काव्यात पद्यपंक्तिची तरफ करून ती जनताशीर्षावर टेकून जग उलथून देण्याची भाषा बोलतांना करून देतात.

तर 'कवितेचे प्रयोजन' या कवितेत ते हाती बंडाचे निशाण घेऊन आपल्या समाज बांधवांना चेतविण्याचा, उत्स्फूर्त करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना अन्याया विरूद्ध झगडावयास प्रवृत्त करतांना

प्रेतेही उठतील जी निजरवे, ती तो तुतारी करी
आता नादवती, निरर्थ तर ती त्याची कशी चाकरी!

असे ते आवर्जुन सांगायला लागतात. केशवसुतांच्या मते कवीच्या काव्यात युगप्रवर्तक व क्रातिकारक असे सामर्थ्य असते. म्हणूनच तो समाजात चेतना उत्पन्न करून, समाजाला उत्स्फूर्त करू शकतो. जुन्या मूल्यांवर कठोर प्रहार करून त्यांचा विध्वंस करू पाहतो. आणि त्याऐवजी नव्या मूल्यांचे दर्शन घडवितो. तो जगात आनंद, मांगल्य सौदर्य निर्माण करतो. ह्या साऱ्या बाबी काव्याची प्रयोजनेच ठरत असून, ती केशवसुतांनी आपल्या काव्यातून परोपरीने व्यक्त केलेली आहेत.

**३) प्रतिभा विषयक कल्पना :—**

केशवसुतांची कवी व काव्य विषयक कल्पनेसह प्रतिभा विषयक कल्पनाही अत्यंत भव्य, उदात्त व रम्य आहे. त्यामुळेच त्यांचे काव्य जेवढे रम्य, तेवढेच गुढ कल्पनांनी वेढलेले भासते. याची प्रत्यक्ष साक्ष त्यांच्या 'दिव्य ठिणगी', 'कल्पकता', 'प्रतिभा' यासारख्या कवितांमधून येते.

केशवसुतांची 'दिव्य ठिणगी' ही कविता रूपकात्मक असून, त्यातील प्रतिभा ही स्फूर्तिच्या स्थानातून ज्ञानाच्या तेजाकडे नेणारी दिव्य शक्तीची एक ठिणगी असल्याचे ते सांगतात. मात्र ही प्रतिभेची ठिणगी प्राप्त होण्यास कवीला लौकिक वा ऐहिक जगताकडे दुर्लक्ष करावे लागते. तेव्हाच त्याला बोधाच्या प्रकाशाची वाट सापडते. कवीला हे कार्य सहज साध्य करता येण्यासारखे आहे. मात्र जनता कवीच्या या त्यागाची किंमत करीत नाही. अशी परखड टिका ते येथे नोंदवित नाहीत.

केशवसुतांची 'कल्पकता' ही कविता सुद्धा रूपकात्मकच आहे. त्यांच्या मते, कल्पकता ही कवी प्रतिभेपेक्षा अधिक शक्तिमान आहे. कारण ती जीवनाच्या सर्वच क्षेत्रात नवनिर्मिती घडवून आणण्याचा प्रयत्न करीत असते. उत्तरोत्तर बदलणारी मानवी संस्कृती म्हणजे तर याच कल्पकतेने विणलेले नवे वस्त्र आहे. या कवितेत वर्णिलेली देवी ही कल्पकता असून, ती जीवनाच्या सर्वच क्षेत्रात नवनिर्मिती घडवून आणण्याचा प्रयत्न करणारी आहे. अशा शोधांनी मानवी जीवन अधिक सुखावह होऊन स्वर्ग पृथ्वीवर येऊ लागतो. असा तत्कालीन विज्ञानाच्या शोधाचा व सामर्थ्याचा उल्लेख त्यांनी काव्यबध्द केला. विशेषत: त्यांनी या कवितेत शोध, तत्वज्ञान व सौदर्य यांना एकत्रित गुंफण्याची कल्पकता दाखविली आहे.

तर केशवसुतांची 'प्रतिभा' ही कविता एक सुनीत असून त्यातून त्यांनी प्रतिभेच्या दिव्य सामर्थ्याचे अत्यंतउ ज्वल व रम्यौदात्त वर्णन केले आहे. त्यात ते म्हणतात –

ती अत्यद्‌भुत गूढ शक्ति सहसा संचारता अंतरी
मुक्तात्मा गगनी उडे, बिथरतो इंद्राश्व ते पाहुनी;
दैत्यांचे बल, देवसत्वही तसे अंगी चढे त्या क्षणी;
सायुज्यत्व विराट पुरूष अहा! देतो स्वये लौकरी

त्या अत्यद्‌भुत गूढ शक्तीचा जेव्हा अंतरात संचार होतो. तेव्हा कवीच्या सत्वगुण संपन अंतकरणात, पिंडात संपूर्ण ब्रम्हांड विलिन होतो. त्यामुळे शब्दब्रम्ह उचंबळून ते दाही दिशांना व्यापून टाकतात. याच शब्दब्रम्हाच्या सामर्थ्याने महाकवी नव्या कल्पना व नवे विचार व्यक्त करू शकतो. अशी ही प्रतिभा देवी ज्याच्यावर प्रसन्न होते. त्यांना जुन्याचा विट येऊन ते आपल्या प्रतिभा व कल्पकतेच्या बळावर नवनिर्मिती करायला लागतात.

तात्पर्य, केशवसुतांच्या काव्यातील प्रतिभा ही अशी रसरम्य व तितकीच भव्योदात्त असून तिचे दिव्य वर्णन व्यास, वाल्मिकी सारख्या महापुरूषांनी केले आहे. तेच केशवसुतांनाही अभिप्रेत आहे. मात्र आपण व्यास, वाल्मिकीच्या पंक्तीतले नाही हे आवर्जून सांगतांना त्यांनी स्वत: विषयी 'मी केवळ गणमात्रा जुळविणारा एक सामान्य कवी' अशी लिनता स्वीकारली आहे. हेच त्यांच्या उत्तुंग प्रतिभेचे द्योतक श्रेय होय.

### ४) काव्याला प्रेयसी मानून व्यक्त केलेले विचार :–

प्रेमानुभवा संदर्भात केशवसुतांचा विचार करता, केशवसुतांनी विवाहपूर्व प्रेमानुभव अनुभवले नसल्याचाच बहुतांश समीक्षकांचा कल आहे. यावरून याचा अर्थ असा नव्हे की, त्यांना विवाहपूर्व प्रेम संवेदना कळत नव्हती. निदान कल्पनेच्या पातळीवर तरी त्यांना त्या संवेदनेची जाणीव होती. मात्र या संदर्भात त्यांच्या काही कविता परस्पर प्रेम कविता वाटत असल्या तरी त्या कविता काव्य देवतेस उद्देशून लिहिल्या असल्याचा कित्येकांचा समज आहे. अशा कवितांमध्ये त्यांच्या 'फिर्याद' व 'रूष्ट सुंदरीस' व 'थकलेल्या भटकणाराचे गाणे' या कवितांचा उल्लेख करावा लागेल.

केशवसुतांची 'फिर्याद' ही कविता वरवर पाहता प्रेमगीत वाटले, तरी ती काव्यदेवतेस उद्देशून असलेली कविता आहे. येथे सुंदर रूपगुणखनी युवतीचा मुख्यार्थ बाद करून लक्ष्यार्थ घ्यावा लागतो. आपण केलेली काव्यरचना ही अत्यल्प असून ती सर्वस्वी मना सारखी उतरली नसल्याचे असमाधान त्यांना वाटते. याचाचा कबुली जबाब येथे त्यांनी दिला आहे.

'रूष्ट सुंदरीस' ही कविता एक भावोत्कट गीत असले, तरी ते प्रसन्न न झालेल्या काव्य सुंदरीस उद्देशून लिहिले आहे. असाच कित्येकांचा समज होतो. मात्र येथेही मुख्यार्थाला बाद करावे लागते. येथे कवीने दैवत आणि प्रेयसी या दोन भूमिकांची भेसळ केली आहे. दैवताबद्दल भक्ती व प्रेयसीबद्दल प्रेम या दोन्ही भावनांचा संकर यात झाला असल्याने प्रेम, काव्य व किर्ती अशा कोणत्याही आकांक्षेने तिचा अर्थ काढता येतो.

त्याचप्रमाणे ‘थकलेल्या भटकणाराचे गाणे’ ही कविता सुद्धा वरील दोन कवितांप्रमाणेच प्रेमगीत वाटत असले तरी लक्ष्यार्थाने काव्यदेवतेस उनुलक्षून असलेली कविता आहे.

तात्पर्य, केशसुतांच्या काव्याची वैशिष्ट्ये शोधतांना त्यांनी कवितेतून व्यक्त केलेल्या कवी, काव्य आणि प्रतिभा विषयक दृष्किकोनात नाविन्यरूप विविधता आढळून येते. या दृष्टीने विचार करता, त्यांनी काव्यातून काव्यविषयक दृष्टिकोन व्यक्त करण्याचा एक नवा पायंडाच मराठी काव्यात रूढ केल्याचे भासते. हे कार्य त्यांना क्रांतिकारकत्व बहाल करण्यास महत्वाचे ठरते.

## केशवसुतांची सामाजिक व राष्ट्रीय (राजकीय) कविता

केशवसुतांचा कालखंड हा इंग्रजी राजवअीचा काळ होता. त्यामुळे तत्कालीन सुशिक्षित पिढी गुलामगीरीच्या न्यूनगंडाच्या भावनेने पोखरून पाश्चात्य मूल्यांचा स्वीकार करू लागली होती. अशावेळी त्यांना भारतीय मूल्ये जुनाट, प्रतिगामी वाटावित व राज्यकर्त्या प्रस्थापितांची मूल्ये प्रगत, अनुकरणीय वाटावित यात नवल नव्हते. त्यातूनच जुन्या मूल्यांवर, समाजरचनेवर, धर्मावर कठोर प्रहार वा टीका करणारा एक सुधारक पंथ जन्मास आला. त्याचाच परिणाम केशवसुतांवरही होऊन त्यांनीही आपल्या काव्यामधून नव्या मूल्यांच्या दृष्टीने समाजसुधारणेचा हिरिरीने पुरस्कार केला.

विशेषत: त्याच काळी फ्रेंच राज्यक्रांतीमुळे स्वातंत्र्य, समता व बंधुत्व ही तत्वत्रयी उदयास आली. याही तत्वत्रयीचा केशवसुतांवर विशेष परिणाम झाल्याने त्यांनी आपल्या कवितांमधून या तत्वत्रयीचा उत्कट असा आविष्कार केला आहे. मुळात त्यांच्या सामाजिक व राष्ट्रीय काव्याचे अधिष्ठानच ही त्रितत्वे आहेत.

### अ) सामाजिक कविता :—

केशवसुतांच्या सामाजिक कविता ह्या अत्यंत प्रक्षोभक स्वरूपाच्या आहेत. त्याचे कारण म्हणजे त्यांचा एकांतप्रियख एकलकोड्या, अंतर्मुख व भावनाप्रधान स्वभाव होय. अशा या स्वभावातील उदासिनता, खिन्नपणा ते ओजस्वी व प्रखर स्वरूपाचे काव्य करून पुसून टाकण्याचा प्रयत्न करतात. म्हणूनच त्यांची सामाजिक कविता अत्यंत दाहक व तेजस्वी रूप धारण करते. मग अशावेळी ते जुन्या चालीरिती, रूढी परंपरांचा विध्वंस करून नव्याचा स्वीकार करण्याचे आवाहन आपल्या ‘स्फूर्ति’, ‘तुतारी’, ‘नवा शिपाई’, ‘गोफण’ इत्यादी सारख्या कवितांमधून करू लागतात.

केशवसुतांची ‘तुतारी’ ही कविता आधुनिक मराठी काव्यातील एक अमर क्रांतिगीत होय. कारण ती सुधारणा व मानवतावादाचा पुरस्कार करते. आपल्याला जे सांगायचे आहे, ते लोकांना जागे करणारे, धक्का देणारे असल्याची कल्पना केशवसुतांना होती. म्हणून त्यांना जागे करण्याकरिता आपणास एखादे कर्कश वाद्य हवे असल्याचे सांगतांना ते म्हणतात —

एक तुतारी द्या मज आणुनि,
फुंकिन मी जी स्वप्राणाने,
भेदुनि टाकिन सगळी गगने
दीर्घ जिच्या त्या किंकाळीने;

कारण रूढी म्हणजे समाजरूपी आम्रवृक्षाला लागलेली कीड असून, तिने प्रगतीचा प्रकाश रोखला जातो. तेव्हा जुने ते सोडून देऊन, नव्याचा स्वीकार करण्यास सांगतांना –

जुने जाऊ द्या मरणालागुनि;
जाळुनि किंवा पुरूनी टाका,

असा ते संदेश देतात. तसेच वर्तमान काळात काहीतरी कर्तृत्व करण्याचे आवाहन करतांना, ते

हल्ला करण्या तर दंभावर – तर बंडावर,
शूरांनो! या, त्वरा करा रे!
समतेचा ध्वज उंच धरा रे!
नीतीची द्वाही पसरा रे!

असा धार्मिक व नैतिक निर्बंधावर कठोर हल्ला चढवितात. तसेच शूरांना समतेचा ध्वज उंच फडकविण्याचा आग्रह करतात. मुळात समाजातील नियम जर त्रासदायक ठरत असतील तर ते झुगारून देण्यातच शहाणपणा असतो. म्हणूनच यासंदर्भात आपले विचार नोंदवितांना ते म्हणतात –

नियमन मनुजासाठी, मानव
नसे नियमनासाठी जाणा;
प्रगतिस जर ते हाणी टोणा,
झुगारूनि ते देउनि, बाणां

अशाप्रकारे केशवसुतांनी तुतारीच्या सहाय्याने संपूर्ण समाजाला जागरूक करतांना त्यांनी धर्म व नीतीमत्ता यांचे खरे स्वरूप स्पष्ट करण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे.

'स्फूर्ति' ही केशवसुतांची तुतारी वाङ्मयात बसणारी दुसरी कविता होय. मात्र ही स्फूर्ति काव्यरचनेची नसून नवविचार प्रवर्तनाची आहे. बंडाचा संदेश देणारी आहे. हे करतांना त्यांना मद्य प्राशन करून जगाचा रंग बदलवायचा आहे. म्हणूनच ते समाजाला जागे करतांना, जुलमाचे साम्राज्य नष्ट करण्यास प्रोत्साहन देतांना –

बंडाचा तो झेंडा उभवुनि धामधूम जिकडे तिकडे
उडवुनि देउनि जुलुमाचे या करू पहा तुकडे तुकडे!

अशी अत्यंत आवेशपूर्ण बंडखोर वृत्ती सिद्ध करतात. एवढेच नव्हे तर पद्यपंक्तीच्या तरफेच्या नावेवर ते जग उलथून देण्याची भाषाही बोलतात. अशावेळी देवांनी विरोध केला, तर ते त्यांच्याशीही दोन हात करण्याची तयारी दाखवितात. त्यांची ही रचना उपाम व झुंजारी आशयाला अनुरूप आहे.

केशवसुतांचा 'नवा शिपाई' तर मानवतावादी विश्वबंधुत्वाचा संदेश देणारा आहे. म्हणूनच तो

जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत,
सर्वत्र खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत;

अशी अखिल विश्व सामावून घेणारी विश्वव्यापक दृष्टी बाळगतो. समाजात सुधारणा करावयास निघालेला वा क्रांति करू पाहणारा हा नवा शिपाई सर्व जाती धर्माची बंधने झुगारून देतांना 'ब्राम्हण नाही, हिंदुही नाही; न मी एक पंथाचा' असे म्हणत धर्म, पंथांच्या पलीकडे जाऊन पोहोचतो.

सर्वांच्या वर एकच आकाश असून पाया खाली एकच पृथ्वी आहे. म्हणूनच 'सर्व माणसे माझी भावंडे आहेत, ती माझी मी त्यांचा आहे', असे म्हणतांना येथील 'मी' मध्ये तो विश्वाचा अंतर्भाव करतो. त्यामुळे सर्वच व्यक्ती सारख्या, समान होऊन जातात. मुळात विश्वात शांतीचे साम्राज्य स्थापन व्हावे अशी त्याची उत्कट इच्छा आहे. आणि म्हणूनच तो त्या दृष्टीने झटण्याचा प्रयत्न करतो.

'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' ही केशवसुतांची सामाजिक प्रश्नावर लिहिलेली पहिली कविता होय. समकालीन अस्पृश्यता विषयक परिस्थितीचे चित्रण करणारा एक प्रसंग यात रेखाटला आहे. त्या काळातील सर्व अस्पृश्यांची 'आम्ही नीच बा; आणि ते लोक थोर; अशी समजूत होती. मात्र तेव्हा एका अस्पृश्याच्या मुलाच्या मनात एक प्रश्न निर्माण झाली की,

जरी त्यावरी सावली माझि गेली,
तरी काय बाधा असे ठेविलेली?

जेव्हा अस्पृश्याच्या मुलाची सावली अंगावर पडू नये याची दक्षता घेतांना, त्या मुलांना रस्त्यातून दूर होण्यास सांगितले जाते. अशावेळी तो लहान अस्पृश्य मुलगा संभ्रमात पडतो. केशवसुतांनी या कवितेत अशाच एका मुग्ध बालकाच्या मनाचा गोंधळ मोठ्या सहजतेने उकलून दाखविला आहे. कारण ज्या समाजात मानवाच्या सावलीचा असा विरोध केला जात असेल, त्या समाजात माणुसकीचा घात झाल्याचे मोठे तत्वज्ञान त्या बालकास कोठून कळणार. म्हणूनच केशवसुतांनी या कवितेत वर्णमूलक व जातीमूलक विषमतेवर आघात करून समतेचे बीज पेरले.

'मजुरावर उपासमारीची पाळी' ही केशवसुतांनी आर्थिक विषमतेवर लिहिलेली कविता आहे. दिवसभर हाताला काम न मिळाल्याने काहीच प्राप्त न झाल्याचे दुःख करणाऱ्या, उपासमारीची पाळी आलेल्या मजुराचे मनोगत येथे व्यक्त केले आहे. अशावेळी तो परमेश्वराला प्रार्थना करतो की –

कष्टात देवा! मरण्यास तत्पर,
का मारिसी हाय! भुकेमुळे तर?

गरीब श्रीमंत या विषमतेमुळे समाज पुर्ता पोखरून गेला आहे. मात्र ज्याने ही सृष्टी निर्माण केली तोही या गरीबांना पारखा झाला की काय? ही शंका व्यक्त करतांना –

काहींस सुग्रास सदन्न तू दिले
साधी अम्हा भाकरही न का मिळे?

आ प्रश्न तो मजूर विचारून जातो. आपल्या कुटूंबाच्या उदरनिर्वाहाची आपणास काहीच सोय करता आली नाही. या विचाराने मजुराचे अंतःकरण निराशा व वैफल्याने ग्रासून जाते. तेव्हा तो त्या निराशेतून उदगारतो –

जन्मास मी काय म्हणोनि आलो?
येताच वा का न मरोनि गेलो?

मरणाप्रतचे विचार डोक्यात घुमावेत अशी आर्थिक विषमता केशवसुतांना समाजात नको होती. म्हणून कवी येथे या मजुराकरवी प्रातिनिधिक स्वरूपात हा प्रश्न आगतिडकीने मांडतो.

'पण लक्षात कोण घेतो?' ही हरिभाऊ आपटे यांची सामाजिक कादंबरी होय. यात लेखकाने स्त्रीवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराला वाचा फोडली आहे. याचेच अभिनंदन करण्यास केशवसुतांनी 'पण लक्षात कोण घेतो? च्या कर्त्यास' ही कविता रचून काढली. त्यात ते म्हणतात –

टाकाने अपुल्या दुराग्रह जुना मर्मी तसा विंधुनी,
स्त्रीजातीस असाच काढ वरती, घे कीर्ति संपादुनी!

स्त्रीला जुलमी रूढींच्या गर्तेतून वर काढण्याचे कार्य समाजसुधारकाने करावे. आणि साहित्यिकानेही साहित्याच्या माध्यमातून त्यास हातभार लावावा. कारण विचार मनात रूजल्याशिवाय तो कृतीमध्ये उतरू शकत नाही. आणि तो समाज मान्यही होऊ शकत नाही असे केशवसुतांना वाटते.

'गोफण केली छान!' या कवितेत केशवसुतांनी या जगातील आळशी, स्वार्थी, भ्रष्टाचारी, हाजीहाजी करणारे, कर्तव्यशून्य, अत्याचार सहन करणारे, गरिबीला आनंदाने स्वीकारणारे अशा लोकांशी वैरत्व स्वीकारले आहे. अशा लोकांचा सामना करण्यास केशवसुतांनी शब्दरूपी गोफण बनविली आहे. गोफणीचा उपयोग कसा करायचा हे सांगतांना ते म्हणतात –

गाठ मारूनी वैराची
गोफण केली छान;
कठिण शब्द या धोंड्यांनी
करितो हाणाहाण!

असे शब्दांचे महात्म्य सांगून जातात. केशवसुत हे पहिले मूर्तिभंजक कवी होत. त्यांच्या 'मूर्तिभंजन' या कवितेतील मुर्ती म्हणजे रूढी होय. मानव आपल्या सुखासाठी सामाजिक नीति नियम निर्माण करतो. वर्षानुवर्षे हे नीति नियम सुरू राहिल्यास त्यांना रूढीचे स्वरूप प्राप्त व्हायला लागते. मात्र या रूढी समाजाच्या प्रगतीला अडथळा ठरतात. तेव्हा त्या नष्ट करणेच योग्य असल्याचे सांगतांना केशवसुत म्हणतात –

मूर्ति फोडा, धावा!        धावा, फोडा मूर्ति!
आतील सम्पत्ति        फस्त करा.

म्हणजेच जुन्या रूढी, परंपरांना बळी न पडता त्यांचा विध्वंस करून नाविण्याचा स्वीकार करण्याचा कवी येथे संदेश देतो. केशवसुतांच्या सामाजिक कविता ह्या रूढ सामाजिक आचारा विरूद्ध बंडाची भाषा बोलणाऱ्या आहेत. अशा कवितांमधून त्यांनी सामाजिक अनिष्ट रूढीं विषयीचा धिक्कार अनेक वेळा नोंदविला आहे. त्यांच्या या कविता स्वातंत्र्य, समता व बंधुता या पश्चिमेकडून आलेल्या तत्वत्रयींच्या सामाजिक तत्वज्ञानावर आधारलेल्या आहेत.

**ब) राष्ट्रीय (राजकीय) कविता :–**

केशवसुतांनी ज्या उत्कट कळकळीने आणि प्रखरतेने समाजसुधारेचा पुरस्कार आपल्या कवितांमधून केला. त्यांची ती उत्कटता व प्रखरता राजकीय बाबतीत दिसून येत नाही. कदाचित याला त्यावेळची प्रक्षोभक राजकीय परिस्थिती असावी. किंवा राजकारणाला पोषक नसणारा त्यांचा

एकलकोंडा, एकांतप्रिय व चिंतनशील स्वभावगुण असावा. तरीही त्यांच्या काही कवितांमधून राजकीय वा राष्ट्रीय तळमळ हिरीहिरीने जोपासली गेल्याचे दिसते.

केशवसुतांची 'गोष्टी घराकडील' ही कविता ओघाओघाने आपल्या स्वातंत्र्या विषयीची तळमळ व्यक्त करणारी आहे. या कवितेत कवी आपल्या कुटूंबातील व्यक्तींविषयी ममता व प्रेम व्यक्त करतांना, आपल्या भावाकडून अपेक्षा बाळतो की,

बापू, गड्या! ध्वज उभा करशील काय?
तू देशकारण करू झटशील काय?
बापू, जनात दिवटी धरिशील काय?
स्वातंत्र्यदेव मनसा भजशील काय?

आपल्या भावाने हाती ध्वज धरून देशकार्य वा देशसेवा करावी. समाजाला मार्गदर्शन करावे. देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी झटावे. असे केशवसुतांना वाटते. हीच देशप्रेमाची भावना केशवसुतांच्या 'गावी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून' या कवितेतही दिसून येते. आज कवीचा मित्र त्यांना काहीच न सांगता कोठ तरी निघून गेला आहे. त्याची लागलेली खोली पाहून कवीला जुन्या आठवणी आठवायला लागतात.

तेव्हा आम्ही म्हटले, 'ही ऱ्हासाची
रजनी केव्हा जाइल विरूनी साची?
स्वतंत्रेची पहाट ती येईल,
उत्कर्षाचा दिन केव्हा सुचवील?

आपल्या मित्राशी देशाविषयी बोलतांना त्यांना झोपेचीही आठवण राहात नसे. पहाट झाल्याचे लक्षात आल्यावर आपल्या देशाची ही ऱ्हासाची रजनी जाऊन स्वतंत्रतेची पहाट केव्हा येईल. ती पहाट पाहण्याचे आपल्या नशिबी आहे काय? किंवा ती आणण्याचे काही प्रयत्न आपणास करता येतील काय? यासारखे प्रश्न त्यांना पडतात. हेच त्यांचे राजकीय विचार होत.

केशवसुतांची 'एका भारतीयाचे उद्‌गार' ही राजकीय विचार प्रकट करणारी कविता आहे. ज्याप्रमाणे सूर्य पूर्वेकडून आपला मार्ग आक्रमित पश्चिमेकडे जातो. आणि सूर्यास्त होतो. तो सूर्यास्त पाहून आपल्या देशाची अवस्थाही अशीच झाली आहे, असे कवीला वाटते. पारतंत्र्याकडे आपले डोळे असूनही ते बघता येत नाही. कान असूनही ते ऐकता येत नाही. अशी आपली स्थिती झाली आहे. तेव्हा हे परावलंबित्व जाऊन आपल्या देशात स्वातंत्र्य सूर्य केव्हा येईल हाच विचार कवीच्या मनाला वारंवार भेडसावत राहतो. हे विचार कवीने 'एका भारतीयाचे उद्‌गार' या स्वरूपात नोंदविले असले तरी ते स्वत: कवीचेच राजकीय विचार आहेत. हे विसरून चालता येत नाही. कारण सरते शेवटी कवी परमेश्वराला –

केव्हा आम्ही सुटुनि सहसा पंजरातूनि, देवा!
राष्ट्रत्वाला फिरूनी अमुचा देश येईल केव्हा

अशी परवशतेची विचारणा करायला लागतो.

वास्तवत: केशवसुतांच्या सामाजिक व राजकीय कवितांचा आढावा घेता, त्यांच्या अनेक अशा सामाजिक कविता प्रसिद्ध असल्याचे दिसते. मात्र त्या तुलनेत त्यांचे राजकीय विचार प्रकट करणाऱ्या कवितांची संख्या ही फारच थोडी आहे. असे असले तरी केशवसुतांच्या काव्याचे क्षितिज हे अशा सामाजिक व राजकीय कवितांच्या तेजाने व ओजाने तांबडे लाल झालेले आहे. हा रंग आहे सामाजिक व राजकीय क्रांतिचा. त्यांना समाजात क्रांति अपेक्षित असल्याने त्यांच्या कवितांची भाषा ही फारच प्रखर, तिव्र आणि क्लिष्ट बनलेली असल्याचे विसरून चालता येत नाही.

## केशवसुतांच्या निसर्ग विषयक कविता

केशवसुतांची निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी ही पूर्व परंपरेपेक्षा अगदी वेगळी होती. त्या तुलनेत प्राचीन मराठी काव्यात निसर्ग हा काव्याचा स्वतंत्र विषय झाल्याचे दिसत नाही. त्यात तो मानवी जीवनाच्या वा पौराणिक कथेच्या अनुषंगाने प्रसंगोपात वा आनुषंगिकरित्याच आला आहे. केवळ एक पार्श्वभूमी म्हणूनच त्याचा उपयोग झाला आहे. पण इंग्रजी काव्याच्या अभ्यासाने ही दृष्टी बदलली. म्हणूनच केशवसुतांची निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी ही पूर्व परंपरेपेक्षा वेगळ्या वळणाने समोर आली. त्यांच्या कवितेत निसर्गातील एक एक वस्तू वा घटना काव्याचा एक स्वतंत्र विषय बनू लागली. साध्या विषयातही मोठा आशय शोधण्याच्या वृत्तीमुळे मानवेत्तर गोष्टींनाही त्यांच्या काव्यात स्वतंत्र काव्याचा विषय होण्याचे भाग्य लाभले.

वास्तवत: निसर्गातील प्रत्येक गोष्टींना काही स्वतंत्र व्यक्तित्व असते. एवढेच नव्हे तर मानवापेक्षा निसर्गातील या गोष्टी अधिक  गुणसंपन्न, सुखी, सुंदर, निर्दोष स्पृहणीय व अनुकरणीय असतात. निसर्गाच्या तुलनेत मानव मात्र पापी, अपराधी, दोषयुक्त, स्वार्थी आहे. निसर्गात सर्वत्र स्वातंत्र्य, समता व चारूता असल्याने त्यात मानवाला सुखी, आनंदमय बनविण्याचे, मानवी जीवनात दिव्यत्व ओतण्याचे सामर्थ्य आहे. म्हणूनच या निसर्गाचा उपयोग उपदेशाकरिता व्हावा. असे केशवसुतांना वारंवार वाटते. हाच दृष्टिकोन त्यांनी आपल्या निसर्गपर  कवितांतूनही व्यक्त केला आहे.

केशवसुतांनी अढळ सौदर्य वा कवितेत मानवी सौदर्यापेक्षा निसर्ग सौदर्य श्रेष्ठ असल्याची कल्पना मांडली आहे. मानवी सौदर्य हे क्षणिक व विनाशी असून निसर्ग सौदर्य हे अविनाशी आहे. हे सांगतांना त्यांनी तरू, पक्षी, वेली, फुले यांचा उल्लेख केला आहे. याही गोष्टींना उत्पत्ती, स्थिती व लय या तिन्ही गोष्टी लागू आहेत. मात्र एकदा पाहिलेली सुंदर गोष्ट मानवी जीवनात अनुभवता येत नसली, तरी ती निसर्गात अनुभवता येऊ शकते. म्हणून त्यातील सौदर्य अढळ असल्याचे केशवसुतांना वाटते. यासोबतच ते हाच न्याय मानव जातीलाही लावता येणार नाही का? याची खंतही व्यक्त करतात.

केशवसुतांची ‘एक खेडं’ ही कविता मुळात निसर्ग कविता नाही. परंतु त्यात आलेल्या निसर्ग वर्णनामुळे ती विशेष वेधक झाली आहे. यात कवीने संह्यांद्रीच्या पायथ्याशी वसलेल्या एका खेड्याचे वर्णन केले आहे. हे वर्णन तेवढेच नैसर्गिक व सहज सुंदर असल्याचे —

सह्यगिरीच्या पायथ्याला सुपीक

रम्य खोरे कोकणामधी एक;
नदी त्यामधुनी एक वाहताहे,
एक खेडे तीवरी बसुनि राहे.

या ओळींवरून लक्षात येते. केशवसुतांना खेड्यातील कष्टाळू, अल्पसंतोषी, निरागस व निवांत जीवन आदर्श वाटत असल्याने, ते या कवितेतून आपल्या ग्राम जीवन विषयक कल्पना सहजतेने व्यक्त करून जातात. अशा जीवना पुढे त्यांना धन दौलत, किर्ती, शिक्षण इ. गोष्टी तुच्छ वाटतात.

केशवसुतांच्या 'भृंग' कवितेतील भृंग हा सृष्टी देवतेचा कवी होय. त्याचे गाणे म्हणजे सृष्टीचे कवन वा सृष्टी संगीत असून ते परमानंदाने परिपूर्ण आहे. हे सांगतांना कवी –

भृंगा! आणि तुझे गान
सृष्टीचे गमते कवन!
गा! तू गा! नादी भ्रमरा!
मी गणमात्रा जुळणारा!

असे म्हणतो. सृष्टी ही कवयित्री असून, फुललेल्या कळ्या या तिच्या कल्पना आहेत. त्यातून बाहेर पडणारा सुगंध हा तिच्या काव्यातील रस आहे. पहाटेची अर्धतिमिर, अर्धप्रकाशाची अवस्था म्हणजे कवीच्या मनाच्या अवस्थे सारखीच आहे. हे सांगतांना सृष्टी व काव्य यातील साम्याचा कवी कटाक्ष पाळतो. मात्र सृष्टीच्या तुलनेत मानवाचे कार्य म्हणजे निर्जिव शब्दांची व गणमात्रांची जुळवणी करणे एवढेच असल्याचेही सांगायला ते विसरत नाहीत.

केशवसुतांची 'फुलांची पखरण' ही कविता प्रथम दर्शनी निसर्गपर वाटत असली तरी ती निसर्गाच्या रूपाने जीवन विषयक आशय सांगणारी कविता आहे. यात सकाळच्या उल्हासदायी वातावरणाचे साधे, पण वैशिष्ट्य रहीत चित्र आल्यानंतर 'मग तापेल ते ऊन;' या शब्दांनी भविष्यातील कठोर अनुभवांची सूचना देते. 'फिरूनी ऐशी वेळ गडे ग! कधि तरि ती येईल का?' या प्रश्नाने तर या सकाळचे स्वरूपच बदलते. मग ही सकाळ एकदाच येणारी जीवनाची तर नसावी ना, असे वाटू लागते. म्हणूनच ही कविता निसर्गपर नसून त्याच्या आश्रयाने जीवन विषयक विचार प्रकट करणारी वाटते.

केशवसुतांची 'पर्जन्याप्रत' ही कविता अस्सल निसर्ग वर्णनात्मक कविता आहे. पावसाळ्याच्या प्रारंभा पूर्वीची परिस्थिती या कवितेत वर्णिली आहे. ग्रीष्म ऋतूची अखेर व वर्षा ऋतूच्या स्वागताची निसर्गातील पक्षी व कीटक इत्यादी प्राणिसृष्टीने चालविलेल्या तयारीचे तपशिल वर्णन यात आले आहे. मात्र हे वर्णन करूणामय व प्रार्थनादायी आहे.

केशवसुतांची 'पुष्पाप्रत' ही कविता निसर्ग पूजन करणारी कविता आहे. निसर्गातील एक अव्याज मनोहर अशी वस्तू म्हणून फुलाकडे बघतांना लहानपणी आपल्यातही अशीच मुग्ध मधुरता, अव्याज निष्पापता होती. पण आपले मन आता तसे राहिलेले नाही. या तीव्र जाणिवेवर ही कविता आधारलेली आहे. आपल्या नैराश्यपूर्ण जीवनाचा फुलाच्या तुलनेत विचार करतांना कवी उद्‌विग्न होतो. तेव्हा तो ते नैराश्य –

काळोखाच्या जगामध्ये या
मृत आशांच्या चितांवरूनिया
पिशाच माझे भटकत आहे — शांति नसेचि तया!

या शब्दांनी व्यक्त करतो. तर त्यांची याच धर्तीवरील 'फुलातले गुण' ही निसर्ग कविता बोधवादी आहे. ती निसर्ग हा मानवापेक्षा चांगला असल्याच्या भूमिकेवरून लिहिली आहे. यात ते फुलातील एक एका गुणाचा उल्लेख करतांना त्यातील सदैव दुसऱ्याला सुगंध देण्याचा, इतरांना स्मित देत राहण्याचा आहे. त्यात प्रिती व सद्‌गुणांसह दिव्यत्वही आहे. हे सांगतांना कवी त्या फुलाचे स्तोत्रच गातो.

केशवसुतांच्या 'संध्याकाळ' या कवितेचा बराच भाग निसर्ग वर्णनपर असला तरी निचे पर्यवसान मात्र विरह वर्णनात होते.

आहे मी घर सोडुनी पण दुरी; चित्ती म्हणूनी असे
मी संध्यासमयी उदास, — अथवा व्हावे तरी मी कसे?

येथे कवीला एकलेपणाने अगदी उदास वाटत आहे. त्याचा परिणाम संध्याकाळच्या दृश्यावर होतांना कवी सूर्य मावळतो म्हणण्या ऐवजी 'दिवस मृत्यूगत होतसे' असे म्हणतो. अशी त्या उदासिनतेची छाया या कवितेत निसर्ग वर्णनावर पडलेली दिसते.

केशवसुतांच्या 'फुलपाखरू' या कवितेतील फुलपाखराला म्हणजेच निसर्गाच्या या लाडक्या प्राण्याला कुठलीही चिंता माहित नाही. त्याला उद्याचा विचार जराही शिवत नाही. या तुलनेत मानवाला मात्र रोजची चिंता, रोजचा विचार अकालीच मृत्यूच्या मुखी घेऊन जातो. हे सांगतांना कवी

निमिरी आम्ही नित्य रखडणे
विवंचनातचि जिणे कंठणे
पुष्पपतंगस्थिती ही कोठुनि आम्हाला मिळणे!

अशी खंत व्यक्त करतो. मराठी काव्यप्रांतात केशवसुतांनी निसर्ग कवितांची प्रथा सुरू केली खरी, मात्र त्यांना टिळक व बालकवी सारखी निसर्ग पुजनाची वृत्ती व्यक्त करता आली नाही वा स्वीकारता आली नाही. बालकवींना निसर्गाशी तादात्म्य पावतांना त्यात त्यांना दिव्य आनंद लाभत असे. केशवसुतही निसर्गातील सौदर्याने वेडे बनत. मात्र त्यावेळी त्यांचे मुख्य लक्ष मानवतेकडे वा मानव आणि निसर्गाच्या अंतराच्या जाणिवेकडे राहात असे. म्हणूनच त्यांना दिलखुलासपणे निसर्ग सौदर्य ग्रहण करण्यापेक्षा निसर्गाचे श्रेष्ठतव गाण्यातच समाधान मानावे लागले. म्हणूनच म्हणावे लागते की काव्यातील निसर्ग पुजेच्या परंपरेची सुरूवात जरी केशवसुतांनी केली असली, तरी निचा सुंदर आविष्कार मात्र बालकवींच्या कवितांनीच केला.

## केशवसुतांच्या प्रेमविषयक कविता

प्राचीन काव्यात प्रेमाभिव्यक्ती करतांना काही संकेत पाळावे लागत. कारण त्या काळी ही गोष्ट शिष्टसंमत नव्हती. म्हणूनच प्रेम व्यक्त करायचे झाल्यास ते राधा—कृष्ण, शंकर—पार्वती,

राम–सीता, नल–दमयंती यांच्या प्रणय कथा रंगवून वा या पात्रांद्वारा परनिष्ट स्वरूपात प्रेम व्यक्त केले जात असे म्हणजे त्या काळी अप्रत्यक्ष, परगत वा तृतीय पुरूषी स्वरूपात प्रेम व्यक्त करण्याचे सामाजिक संकेत रूढ होते. मात्र इंग्रजी काव्यात हीच प्रणय वर्णने आत्मनिष्ठ स्वरूपात येत. इंग्लिश कवी कोणताही आडपडदा न ठेवता प्रथम पुरूषाचा उपयोग करून आपले प्रेम व्यक्त करीत. मराही काव्यातील नवकवींनी याचेच अनुकरण करतांना रूढ संकेत मोडून काढले त्याची सुरूवात केशवसुतांनीच केली.

केशवसुतांचा काळ हा इंग्रजी शिक्षणाचा प्रभाव व प्राबल्याचा काळ होता. यातूनच इंग्रजी काव्यापासून आदर्श घेत केशवसुतांनी इंग्रजी वाङ्मयातील निवडक कवितांचे भाषांतर व रूपांतरण केले. म्हणूनच ते त्यांचे काव्य परकीय कल्पनांतून प्रकट झाले असल्याचे स्वतःच सांगतात. कवीने आपल्या एकांतातील प्रेमानुभव लोकांतात वा लोकांसमोर व्यक्त करावे, त्यांना काव्याच्या माध्यमातून काव्यविषय बनवून जाहिरपणे व्यक्त करावे. यासारख्या कल्पना व प्रथा म्हणजे इंग्रजीनुकरणाचा भाग होता. या अनुकरणातूनच त्यांनी आत्मनिष्ठ व प्रणय वर्णनाची प्रथा सुरू केले. म्हणूनच त्यांना आत्मनिष्ठ प्रेमगीते लिहिणारा पहिला कवी म्हटल्या जाते.

केशवसुतांनी आपल्या प्रेमविषयक कवितांमध्ये प्रेमाच्या विविध छटा नोंदवितांना सर्व नाते संबंधांना आविष्कृत केले आहे. तसेच ते प्रेमाचे एक वेगळेच तत्वज्ञान मांडतांना प्रीतीने प्रीती संवादावी लागते, प्रीती ही हदयात सामावली असते, तिची खरी कसांटी संकटे व कठीण परिस्थिती यातच लागते, प्रेमाच्या अधीन होऊन केलेली छोटी मदतही श्रेष्ठ ठरू शकते, प्रीतीची भाषा मुक असून तिला शब्दांची गरज नसते अशा किती तरी प्रेम विषयक संकल्पना आपल्या प्रेम विषयक कवितांनून व्यक्त करतात.

वास्तवतः केशवसुतांचा इंग्रजी काव्यातील सुनित (Sonnet) हा आवडता प्रकार होय. म्हणूनच त्यांनी मराठी काव्यात हा रचना प्रकार आणतांना शेक्सपियर, जॉन लिली इत्यादी सारख्या कवींच्या सुनितांची भाषांतरे केली. त्यांनाच त्यांच्या अनुवादात्मक प्रेम कविता म्हटल्या जाते. मात्र यापेक्षा विशेष गाजल्या त्यांच्या प्रेमाचे तत्वज्ञान सांगणाऱ्या कविताच. त्यांची 'प्रीती' ही कविता असेच प्रेमाचे तत्वज्ञान व्यक्त करणारी आहे. यात ते प्रेमाविषयी विचारणा करतांना –

प्रीती मिळेल का हो बाजारी?<br>
प्रीती मिळेल का हो शेजारी?

असा प्रश्न विचारतात. मात्र या संदर्भात ते स्वतःच उत्तरही देतात. ती कुठे बारारात, शेजारी, बागेत, शेतात शोधण्याऐवजी प्रत्येकाने आपल्या शरीरातच शोधावी. कारण प्रीतीच्या वाटा प्रत्येकाच्या अंतःकरणात असतात. मात्र त्यांचा प्रतिसाद मिळविण्यासाठी प्रेमयुक्त कृतीची आवश्यकता असते. हाच या कवितेचा मुख्य आशय आहे.

प्रेमाचे तत्वज्ञान सांगतांना केशवसुतांनी आपल्या 'प्रणयगीत' या कवितेत निसर्गातील काही घटनांचा आपल्या दृष्टीने अर्थ लावून वियोगानंतर पुनः भेट होणे शक्य असल्याचेच सांगण्याचा प्रयत्न या कवितेत केला आहे. यात कवी आपली प्रेम भावना प्रकट करतांना म्हणतो की, –

तुजविण मजला काहि असेना प्रिय या गे जगती
तू मम जीवित, तू मम आत्मा, तू माझी शक्ती!
तुजला सोडूनि जाणे येई सखे! जिवावरती
परी ओढुनी दूर नेती या निर्दय दैवगती!

प्रिय व्यक्तीपासून दूर जातांना मनात उत्पन्न होणारी कालवा कालव कविने येथे मोठ्या मार्मिकतेने प्रकट केली आहे. जीवनात बरेचदा आपणास मनाविरूद्ध वागावे लागते. निसर्गात अशाच घटना घडत असतात. ज्याप्रमाणे मेघ विजेला सोडून धरतीवर येतो, सूर्य पूर्व दिशेला दु:खी करून आपला मार्ग आक्रमित राहतो, या धरतीला पर्वत सोडून उंच आकाशात पोहतो. त्याचप्रमाणे प्रेमाच्या व्यक्तीला प्रेमाच्या व्यक्तीपासून या व्यावहारिक जगात दूर जाऊन जगावे लागते. म्हणून 'प्रीतीचा पथ वर्तुळ आहे' असे कवी म्हणतो.

मात्र हेच केशवसुत 'फार दिवसांनी भेट' या कवितेत खूप दिवसांनी भेअ झालेल्या विरही स्त्री–पुरूषाचे स्वभावोक्तिपूर्ण चित्रही रेखाटतांना –

बहुत दिवशी भेट जाहली
प्रणय सिंधुला भरती आली
आलिंगन दृढ देता आला
उभयी हदयी त्वरित उमाळा

असा दोहोंच्या मनातील प्रेमभाव व्यक्त केला आहे. या विरहावस्थेत आलेले अनुभव वा मनाची झालेली घालमेल वा तळमळ पुन्हा अनुभवण्यापेक्षा मरणाने दोघांनाही एकत्र घेऊन जावे. अशी इच्छा कवी येथे व्यक्त करतो. कारण ज्याप्रमाणे जलाशयाला झारे मिळतात, नदी सागराला मिळते; त्याचप्रमाणे या दोघांनाही एकत्र जीवन जगायचे असल्याचे भाव कवीने आपल्या 'प्रणय कथन' या प्रेमविषयक कवितेतही व्यक्त केले आहेत.

केशवसुतांची 'मनोहारिणी' ही कविता स्त्री सौंदर्याचे वर्णन करणारी कविता आहे. वास्तवत: केशवसुत आपल्या प्रेम कवितेत बाह्य सौंदर्याचा फारसा उल्लेख करीत नसत. पण याच सौंदर्य दर्शनाचा परिणाम भान विसरण्यामध्ये होतांना प्रेमभाव व्यक्त व्हायला लागतो हे विशेष आहे.

## केशवसुतांच्या गुढगुंजनात्मक (रहस्यमय) कविता

आधुनिक काव्यात गुढगुंजनात्मक काव्याला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. वास्तवत: हा संप्रदाय केशवसुतांनीच सुरू केला. सृष्टीतील गुढ अनुभव जसे अध्यात्माच्या मार्गांनी प्राप्त होतात. तसेच ते कलेच्या मार्गांनीही प्राप्त करता येतात. याच आधारे वाङ्मय क्षेत्रातील बऱ्याचशा कलाकृती दृश्य सौंदर्याचे वर्णन करतांना, या दृश्य जगतामधून अदृश्य वातावरणात अंतकरणाला पोहचविण्याचा अनाकलनीय मार्ग आखायला लागतात. ज्या काव्यामध्ये ही शक्ती अंतर्भूत व्हायला लागते. त्याच काव्याला 'गुढ अनुभवाचे काव्य' म्हटले जाते.

वास्तवत: गुढगुंजन हा शब्दच मुळी संदीग्ध स्वरूपाचा आहे. त्याच्या अर्थाविषयी काव्य जगतात मतैक्य नसल्याचे काही टीकाकारांच्या मतांवरून लक्षात येते.

१) वा. ना. देशपांडे यांच्या मते, ''आत्मदर्शन व जिज्ञासा या दोन सहज प्रवृत्तीचे संमिश्र उन्नयन होऊन त्यातून गुढवादाचा संभव होतो. जीज्ञासेमुळे मानवाच्या मनात जीव, जगत व जगदीश ह्या त्रिपुटी विषयीचे विचार उत्पन्न होतात व आत्मदर्शनाच्या सहज प्रवृत्तीमुळे ते व्यक्त करण्याची इच्छा बळावते. असल्या दोन्ही सहज प्रवृत्तीचा परिणाम घडून जे काव्य जन्माला येते. ते गुढवादी काव्य होय.''

२) श्री. वि. चाफेकर यांच्या मते, ''कोणताही तात्विक विचार जेव्हा आत्पप्रत्ययाच्या भाषेत काव्याद्वारा मांडला जातो. तेव्हा अशाप्रकारच्या काव्याला गुढगुंजनात्मक काव्य म्हणतता.''

३) कवी अनिल यांच्या मते, ''ह्या सृष्टीच्या मुळाशी एक अंतिम सत्य वा तत्व असून त्याची अंत:स्फूर्त व अनुभवजन्य जाणीव कवीला होते. ही जाणीव काव्यातून व्यक्त होतांना कवी जे गुढ, असंबंद्ध प्रतीतीचे बोल बोलतो, ते बोल म्हणजेच गुढगुंजनात्मक काव्य होय.''

४) रा. श्री. जोग यांच्या मते, '' जीवनातील बुद्धिवादाच्या अतीत असणारे जे भावनात्मक अनुभव आहेत. ते व्यक्त करणाऱ्या प्रयत्नातून गुढगुंजनात्मक काव्य जन्माला येते.''

५) श्री. के. क्षीरसागर यांच्या मते, '' अनिवर्चनीय अनुभवाविषयी आनंदमय मन:स्थितीत लिहिलेले काव्य वा काव्यमय गद्य म्हणजे गुढवादी काव्य होय.''

एकंदर गुढवादी कवितेच्या स्वरूपाविषयी टीकाकारांत एकवाक्यता वा एकमत नसल्याचेच दिसते. मात्र अशा गुढवादी कवितांमध्ये त्यातील अनुभव शब्दातीत असतात. त्यामुळे त्यात बऱ्याचदा दुर्बोधता येते. त्यातील अनुभव कवीचे भावनात्मक अनुभव असल्याने, ते आर्त व रोमांचकारी असतात. यासारखे काही सामान्य गुणविशेष प्रतीत होतात. या दृष्टीने विचार करता केशवसुतांच्या 'झपूर्झा', 'हरपलेले श्रेय', 'म्हातारी' अशा काहीच कविता गुढगुंजनात्मक मानाव्या लागतात.

केशवसुतांची 'झपूर्झा' ही कविता जीवनविषयक तत्वज्ञानाशी संबंधीत नसली, तरी ती गुढगुंजनात्मक स्वरूपाची कविता आहे. मुळात तिचे शिर्षकच चमत्कृतीजनक आहे. त्यातील विचार गुढ आणि गहन असल्याने तिला गुढता व गहनतेचे दुहेरी स्वरूप प्राप्त झाले आहे. 'झपूर्झा' म्हणजे 'जा, पोरी जा'. ही झिम्म्याच्या खेळातील पुनरूक्त होणारी शब्द संहती होय. खेळाला वेग येताच गती वाढून 'झपूर्झा' असा नाद ऐकायला येतो. ती अवस्ता खेळणाऱ्यांच्या तन्मयतेची अवस्था होय. ती व्यक्त करण्यासच कवीने हा शब्द योजला. वास्तवत: ही तन्मयावस्था लाभली की त्यातून लोक कल्याणाच्या नवनव्या कल्पना सुचतात. हाच विचार कवीला येथे सांगावयाचा आहे.

येथील तन्मयतेची अवस्था व्यावहारीक सुखदु:खांच्या द्वंद्वांच्या पलीकडची असल्याने हास्य–अश्रृ, प्रकाश–तिमीर, कंटक–मखमल इत्यादी द्वंद्व तिला भासत नाहीत. याउलट सामान्य जीवनातील हर्ष–शोक हेच ज्यांना महत्वाचे वाटतात. ते त्यांच्या पलीकडे गेलेल्यांना वेडे समजतात

## ➢ सारांश :–

केशवसुतांनी काव्याला नवे वळण देतांना व नवी वाट मोकळी करून देतांना बदलत्या काळानुरूप, नव्या परिस्थितीला अनुसरून काव्यरचना केली. त्यांनी काव्याची जुनी चाकोरी सोडून देऊन नवी चाकोरी रूढ केली. मराठी काव्याला पाश्चात्य धाटणीचे वेगळे वळण दिले. त्यांनी मराठी काव्याला आत्मनिष्ठते सोबतच जीवननिष्ठही बनविले. लौकिक विषयांना काव्यात स्थान दिले. प्रणयाचा आत्मनिष्ठ आविष्कार केला. कवी व कवी प्रतिभेचा गौरव केला. निसर्गाला सुंदर, शिव व मंगल मानले. समता, बंधुत्व व स्वातंत्र्य या तत्वत्रयींचा पुरस्कार केला. म्हणूनच कवी, काव्य व प्रतिभेच्या दृष्टीने काव्य प्रांतात नवा पायंडा रूढ करणारा पहिला कवी म्हणून त्यांचा गौरव करावा लागतो.

**महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली**

**मराठी विभाग**

**सत्र : २०२३ - २०२४**

# प्रकल्प

**-: प्रकल्पाचे शीर्षक :-**

# महाराष्ट्रातील संत परंपरेचा परिचय

**-: प्रकल्प सादरकर्ते विद्यार्थी :-**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे |
|---|---|
| १ | भारती राजेंद्र मेश्राम |
| २ | प्रतिभा भजनराव दुगा |
| ३ | सौरभ राजेश्वर मातेरे |
| ४ | प्रनाली सुरेंद्र भानारकर |
| ५ | गायत्री योगीरातज पुराम |
| ६ | सुदर्शन गोकुलदास मेश्राम |
| ७ | सुष्माताई बाबुराव उसेंडी |
| ८ | भिमेश्वरी जागेश्वर बगमारे |
| ९ | साहिल महादेव लोनारे |
| १० | मुकेश गोहदी हुपुंडी |

**मार्गदर्शक**

**प्रा. दिलीप घोनमोडे**

**मराठी विभागप्रमुख**

**महात्मा गांधी कला, विज्ञान व**

**स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय**

# **प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, बी. ए. भाग ३ च्या खालील विद्यार्थ्यांनी **"महाराष्ट्रातील संत परंपरेचा परिचय"** या विषयावरील प्रकल्प गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी येथील मराठी विषयाच्या पदवीकरिता मराठी विभाग व संशोधन केंद्राला सादर केला आहे.

प्रस्तुत प्रकल्प विभागप्रमुख प्रा. दिलीप घोनमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्ध केला आहे. त्यांनी या प्रकल्पासाठी आवश्यक सामग्री परिश्रमपूर्वक मिळविली आणि तिचा सर्वमान्य संशोधन पद्धतीप्रमाणे अभ्यास करून सदर प्रकल्पाच्या रूपाने सूत्रबद्ध मांडणी केलेली आहे.

## **प्रकल्प सादरकर्ते विद्यार्थी**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | भारती राजेंद्र मेश्राम | B.R.Meshram |
| २ | प्रतिभा भजनराव दुगा | P.B.Duga |
| ३ | सौरभ राजेश्वर मातेरे | S.R.Matere |
| ४ | प्रनाली सुरेंद्र भानारकर | P.S.Bhanarkar |
| ५ | गायत्री योगीरातज पुराम | Y.puram |
| ६ | सुदर्शन गोकुलदास मेश्राम | Meshram |
| ७ | सुष्माताई बाबुराव उसेंडी | S.B. Usendi |
| ८ | भिमेश्वरी जागेश्वर बगमारे | [illegible] |
| ९ | साहिल महादेव लोनारे | S.M.Lonare |
| १० | मुकेश गोहदी हुपुंडी | M.G.Hupundi |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्षक | पृ. क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | महाराष्ट्रातील संत परंपरेचा ओझरता आढावा | १ |
| २ | संत ज्ञानेश्वर | १ |
| ३ | संत नामदेव | ५ |
| ४ | संत एकनाथ | ६ |
| ५ | संत तुकाराम | ८ |
| ६ | संत रामदास | १३ |
| ७ | सारांश | १५ |

# महाराष्ट्रातील संत परंपरेचा परिचय

## ❖ प्रस्तावना :-

मराठी विभागातर्फे आम्ही बी. ए. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना विभागप्रमुखांनी सुचविलेल्या प्रकल्पाची माहिती सादर करण्यासाठी आम्ही 'महाराष्ट्रातील संत परंपरेचा परिचय' हा विषय निवडलेला आहे. त्यानुसार आम्ही हे प्रकल्प कार्य पूणर् केलेले आहे.

आपला महाराष्ट्र ही संतांचे चरणस्पर्श व विचार लाभलेली पावन भूमी आहे. या भूमीत जन्म घेतलेल्या समाजातील प्रत्येक घटकाला संतांनी संस्कारक्षम, शाश्वत मूल्यांचा मौल्यवान खजिना दिला आहे. त्यांच्या रुपाने संस्कारांचा संपन्न असा वारसाच या भूमीने मराठी मनाला दिला आहे. त्यामुळेच आज जगभर मराठी मनाचा कणा अगदी ताठ झाला आहे. महाराष्ट्रात या संत परंपरेची मौक्तिकमाला आहे. संत म्हणजे साक्षात देव. खरे तर जगाच्या कल्याणासाठीच विधात्याने संतांना इहलोकी पाठविले असावे असे त्यांच्या जिवित कार्यावरुन वाटते. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती | देह झिजवीती ऊपकारे |' हे तर संतांचे मुख्य लक्षणच आहे.

संतांनी आपल्या आचरणाद्वारा मानवी मूल्यांचा केलेला विचार विश्वाकरिता आदर्शरुप आहे. या आदर्शामुळेच तर महाराष्ट्राच्या लोकजीवनावर उत्तम असे संस्कार झाले. मुळात संतांनी विश्वात सतत मानवतावादाची गुढी उभारण्याचा प्रयत्न केला. त्यांनी परोपरीने विश्वात व समाजात माणुसकीला प्रतिष्ठा मिळवून देण्याचाच प्रयत्न केला. 'जनी जनार्दन' हा त्यांचा सहज भाव होता. संत हे समाजापुढील आदर्श असल्यामुळे त्यांचे जीवन समजून घेण्याची ओढ प्रत्येक मनाला वाटते. अनासक्त माणूस लोकोद्धाराचं केवढं प्रचंड कार्य करू शकतो याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे आपली महाराष्ट्रातील संत परंपरा ठरते. खरंच महाराष्ट्रातील संतमंडळी म्हणजे आपल्या संस्कृतीचे कळस असल्याचे म्हणावे लागते.

## ❖ महाराष्ट्रातील संत परंपरेचा ओझरता आढावा :-

### ➢ संत ज्ञानेश्वर :-

संत ज्ञानदेवाची अमृतवाणी १३ व्या शतकापासून म्हणजेच सुमारे ७०० वर्षांपासून मराठी मनाला रिझवीत आली आहे. आजही इतके वर्षे लोटूनही तिच्या लौकिकाला कुठेही बाधा आलेली नाही. त्यांचा ज्ञानेश्वरी हा ग्रंथ तर महाराष्ट्रीय शारदेच्या गळ्यातील देशीकार लेणी

असल्याचे म्हटल्या जाते. म्हणूनच आजही महाराष्ट्रातील प्रत्येक वारकऱ्यांच्या घरी ज्ञानेश्वरीचे पारायण सतत होत असल्याचे दिसते. आजही ज्ञानदेवांचा 'माऊली' असा नामघोष करण्यापर्यंत व जन्मोजन्मी कृतज्ञ राहण्यापर्यंतचे अमोल विचारधन व भावधन ज्ञानदेवांनी महाराष्ट्राला दिल्या कारणाने त्यांना 'माऊली' असे संबोधन जाते.

ज्ञानदेवाचा जन्म इ.स. १२७५ (शके ११९७) ला झाला. तर त्यांनी इ.स. १२९६ (शके १२१८) समाधी घेतली. मात्र २१ वर्षाच्या आयुष्यात त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यविषयक जे कार्य केले ते अविस्मरणीय आहे. त्यांनी गीतेच्या १८ अध्यायातील ७०० श्लोकावर मूळ अध्यायांचा क्रम न बदलता ९००० ओव्याचे 'ज्ञानेश्वरी' हा परम सुंदर ग्रंथ रचला.

शके बाराशते बारोत्तरे । तै टीका केली ज्ञानेश्वरे ॥
सच्चिदानंदबाबा आदरे । लेखकू जाहला ॥

यावरून इ.स. १२९० (शके १२१२) ला त्यांचा 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ रचला गेल्याचे स्पष्ट होते. संत ज्ञानेश्वरांनी मध्ययुगीन महाराष्ट्रात भागवत धर्म संप्रदायास प्रारंभ करून एका नव्या युगाची सुरूवात केली. तसेच भारतीय संस्कृतीच्या इतिहासात भारतीय साधनेला वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळवून दिले. आपल्या विचारधनात त्यांच्याद्वारा दीनदलितांच्या आत्मिक उत्थान्याची कडकड, आत्मानुभूतीचे विवेकनिष्ठ प्रामाण्य, भक्तीने परमात्म्याची परिसीमा गाठणारी अद्वैत दृष्टी, जनसामान्यांत अनुबंध निर्माण करणाऱ्या लोकभाषेचा वापर या सर्व वैशिष्ट्यांचा प्रथमत: वापर केला गेला. म्हणूनच बहिणाबाईने वारकरी संप्रदायाच्या धर्म मंदिराचे वर्णन करताना 'ज्ञानदेवे रचिला पाया। तेणे उभारिले देवालया॥' असे मार्मिक मत नोंदविले आहे.

खरे तर ज्ञानेश्वरांनी आपल्या 'ज्ञानेश्वरी' ग्रंथात अनेक ठिकाणी तत्कालिक धार्मिक व सामाजिक परिस्थितीचे अतिशय मार्मिक वर्णन करून जाचक कर्मकांडांच्या मार्गाने जाणाऱ्या कर्मठ ब्राम्हणांच्या पांडित्याचे चित्रण केले आहे. अशा ह्या पार्श्वभूमीवर ज्ञानेश्वराचे अलौकिक व्यक्तिमत्व आकाराला आले. जणूही काही अधर्माचा नायनाट करून धर्माची घडी बसविण्यास परमेश्वराने ज्ञानेश्वराच्या रूपाने अवतार घेतल्याचे म्हणावे लागेल. म्हणूनच कदाचित संपूर्ण समाजाचा सर्वांगीण विकास करणे हे ज्ञानेश्वराचे ध्येय राहिले. ज्ञानेश्वरांनी समाजाशी विग्रह करून वैर वाढवण्यापेक्षा स्नेहाने सामाजिक समतेचे संगोपन करणाऱ्या भागवत धर्माचा मार्ग स्विकारला. ते नाथपंथीय असले तरी नाथपंथीय सांप्रदायिकतेचा स्वीकार न करता त्यांनी अद्वैत आणि भक्ती, वैराग्य आणि प्रापंचिकता यांचा पुरस्कार केला. त्यांनी ज्ञानयोग व कर्मयोगाचा संगम साधून महाराष्ट्रीयांच्या जीवनात एक अपूर्व क्रांती घडवून आणली.

इंद्रिये न कोंडी। भोग न तोडी।
अभिमान न सांडी। स्वजातीचा।।
कुळधर्म चाळी। विधिनिषुधु पाळि।
सखे तुज सरळी। दीन्हली असे।।

ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा अतिशय साध्या आणि सोप्या भाषेत प्रसार केला. त्यांनी एक अपूर्व असे सामाजिक परिवर्तन घडवून आणले. आपल्या तत्त्वज्ञानाचे निरूपण आणि स्पष्टीकरण करताना त्यांच्या प्रतिभेला पंख फुटू लागतात. तिचा स्वैरविवार सुरू होतो. तिच्या भरारी पुढे सामान्यज्ञाचे आणि ज्ञानीपंडितांचे डोळे दिपतात. ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्व हे प्रेम, प्रज्ञा आणि प्रतिमा यांचे प्रयागतीर्थच होय. यामुळेच त्यांना तत्त्वज्ञ कवी असे संबोधल्या जाते.

'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ रचताना ज्ञानेश्वरासमोर जसा पंडित वर्ग होता, तसेच स्त्रीशुद्र व अठरापगड जातीतील लोक होते. या जनसामान्यांना वेदातील तत्त्वज्ञान समजण्यास ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'ची रचना केली. त्यांत शब्दकोशात नसलेले लोकभाषेतील अनेक शब्द वापरले. ते देववानीपेक्षा माझी मराठी मायबोली कुठेच कमी नाही हे सांगताना ते म्हणतात,

माझा मराठीचा बोलू कौतुके।
परि अमृतातेही पैजासी जिंके।
ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।।

संस्कृत भाषेतून नुसते तत्त्वज्ञ किंवा कालिदासारखे नुसते काव्याची मांडणी करता येत असेल. परंतु माझ्या मायबोलीचे सामर्थ्य इतके आहे की, त्यात तत्त्वज्ञान आणि काव्य दोन्ही एकाच वेळी करता येते. त्यामुळेच त्यांना मराठी भाषेचा अभिमान आहे. मोजक्या शब्दात अर्थ वैपुल्य, प्रत्येक शब्दात प्रेमळपणा आणि नादमाधुर्यता, उपमा व दृष्टांतांची रेलचेल ज्ञानेश्वरीत येतात. म्हणूनच ज्ञानेश्वरी ही विद्वत्व, कवित्व आणि साधुत्व यांच्या त्रिवेणी संगम ठरते. हा ग्रंथ 'न भूतो न भविष्यती' असा ठरतो. संस्कार सामर्थ्य हे तर ज्ञानेश्वरीचे फार मोठे वैशिष्ट्य आहे. यात त्यांनी श्रोत्यांचा गौरवही केला आहे. खरे तर यापूर्वी श्रोत्यांचा गौरव करणारे काव्य मराठीत कोणीच निर्माण केलेले दिसत नाही.

ज्ञानेश्वरीनंतर त्यांनी आपल्या स्वतंत्र प्रज्ञेचा आविष्कार 'अमृतानुभव' या ग्रंथाच्या रूपाने मांडला. ज्ञानेश्वरीच्या लेखानंतर गुरु निवृत्तीनाथांच्या आदेशाने त्यांनी इ. स. १२९२ ला 'अमृतानुभ' या ग्रंथाची रचना केली. ज्ञानेश्वरीपेक्षा अमृतानुभवातील तत्त्वज्ञानाची उंची अधिक आहे. यात ५ संस्कृत श्लोक ८८४ ओव्या व १० प्रकरणांमध्ये मांडले आहेत. यात त्यांनी शिव आणि शक्ती हे भिन्न नसून एकच असल्याचे प्रतिपादन केले आहे. या ग्रंथात त्यांनी

स्वतःच्या अनुभूतीला प्रणाम मानून चिद्विलासाचा सिद्धांत सांगितला आहे. ज्ञानेश्वराचे शुद्ध आणि स्वतंत्र तत्वज्ञान या ग्रंथात प्रकटले आहे. परब्रम्ह हे एकमेव असे तत्व असून ते सर्व जगात सर्वत्र भरलेले आहे. या अनंत दृश्यरुप विश्वात परमेश्वराशिवाय दुसरे काहीच नाही. जीव हा परब्रह्म स्वरूप असल्याचा विचार त्यांनी या ग्रंथात मांडला आहे.

ज्ञानेश्वरांच्या 'चांगदेव पासष्टी' या ग्रंथाची रचना इ. स. १९९४ ला झाली. एक प्रासंगिक प्रकरण म्हणून 'चांगदेव पासष्टी'चा उल्लेख केला जातो. चांगदेव नावाच्या हट्टयोग्याने ज्ञानेश्वराची कीर्ती ऐकून त्यांना एक पत्र पाठवले. परंतु ज्ञानेश्वर अनुभव व अधिकाराने मोठे, पण वयाने लहान होते. अशा ज्ञानेश्वरांना नमस्कार लिहावा की आशीर्वाद या पेचात चांगदेव पडले. म्हणून त्यांनी कोरेच पत्र ज्ञानेश्वराकडे पाठवले. या पत्राला उत्तर म्हणून ज्ञानेश्वरांनी जे पत्र लिहिले ते पत्र म्हणजेच 'चांगदेव पासष्टी' होय. या पत्राद्वारा त्यांनी चांगदेवाला उपदेश केला. ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान अमृतानुभवात सार रूपाने आले आहे, तर अमृतानुभावातील तत्त्वज्ञान चांगदेव पासष्टीत सार रूपाने आले आहे. एका हट्टयोग्याला एका ज्ञानयोग्याने पाठवले हे अध्यात्म बोधपर पत्र होय. योगविद्येपेक्षा आत्मविद्येचे श्रेष्ठत्व ज्ञानेश्वरांनी यात मांडले आहे.

यासोबतच ज्ञानेश्वराची अभंग रचना सुद्धा अतिशय मधुर आहे. त्यांच्या उपलब्ध अभंगाची एकूण संख्या ७६५ आहे. यातील बहुतेक अभंग लेखनामागील हेतू हा जीवनदृष्टी आणि तत्वज्ञान सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा आहे. विठ्ठल आणि पंढरपूर वर्णन हे सर्व संतांच्या साहित्याचे वैशिष्ट्य राहिले आहे. हरीच्या सगुण रूपाचे वर्णन करताना -

रूप पाहता लोचनी। सुख झाले हो साजणी।
तो हा विठ्ठल बरवा। तो हा माधवा बरवा।।

ज्ञानेश्वरांनी विठ्ठल व पंढरपूरचे महात्म्य आपल्या अनेक अभंगातून गायले आहे. टिपरी, पाळणा, हमामा, फुगणे अशा अनेक रूपकांद्वारे त्यांनी भक्तीची तत्वे सामान्यांना समजावून सांगितली आहेत. 'चंदनाची चोडी माझे अंग अंग जाडी' या विराणीद्वारे त्यांनी प्रपंच आणि परमार्थ यांचा सुंदर समन्वय घडविला आहे. हरीपाठाच्या अभंगात तर ते अतिशय साध्या आणि सोप्या भाषेत परमार्थ सांगतात. या अभंगांची रचना अत्यंत साध्या, सोप्या व सहज शब्दात केली असल्याने आजही ते वारकरी संप्रदायाला वेड लावतात. वारकरी संप्रदायाचे सारे रहस्य या अभंगातच सांगितले आहे.

ज्ञानेश्वरीची वाङ्मयीन कामगिरी ही अशी बहुविध स्वरूपाची आहे. त्यांनी आपले तत्त्वविचार सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यास वाङ्मय निर्मिती केली. ज्ञानेश्वरांमुळे महाराष्ट्रात फार मोठी वैचारिक क्रांती घडून आली. त्यांनी सर्वांसाठी भक्तीचे व्यासपीठ निर्माण केले.

ज्ञानेश्वराचे प्रसायदान म्हणजे तर मानवतेचे प्रतीक होय. ज्ञानेश्वर हे महाराष्ट्रातील संत चळवळीचे, धार्मिक प्रबोधनाचे आद्य प्रणेते होत. त्यांनी समाजाला वैदिक धर्माची शिकवण देऊन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाला गतिमान केले.

## ➢ संत नामदेव :-

संत नामदेव यांचा जन्म पंढरपूर येथे इ. स. १२७० मध्ये झाला. त्यांचे घराणे शिंपी व्यवसाय करीत असे. त्यांचे वडील दामाशेठ हे मूळचे कराड जवळ कृष्णा नदीच्या काठी वसले नरसीबामणी गावचे राहणारे. नामदेवाच्या जन्मापूर्वी वडील दामाशेठ पंढरपूर येथेच राहत. तेथे असताना आई गोणाईने पुत्रप्राप्तीसाठी विठ्ठलाला नवस केला. त्यानुसार तिला मुलगा झाला. तचे हे संतश्रेष्ठ नामदेव महाराज होत. बालपणापासूनच नामदेव विठ्ठल भक्तीत लीन असल्याने पुढे ते पंढरीच्या विठोबाचे एकनिष्ठ भक्त बनले. वयाबरोबर त्यांची भक्ती देखील वाढत गेली. मनात विठ्ठलनामाचा जप, हाती टाळवीणा घेऊन, तहानभूक विसरून देवाच्या दारी अविरत नाचण्यात त्यांना विलक्षण आनंद वाटे. आपल्या वडिलोपार्जित शिवन्या टिपण्याच्या व्यवसायावर त्यांनी पाणी सोडले. त्यांनी ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहिल्या कारणाने त्यांना मराठीतील आद्य चरित्रकार म्हणून ओळखले जाते. आधी, तीर्थवडी व समाधी अशा तीन प्रकरणातून ज्ञानदेवांचे चरित्र नामदेवांनी लिहिले आहे. समाधी चरित्राच्या पद्धतीने त्यांनी निवृत्तीनाथ, सोपानदेव, चांगदेव, मुक्ताबाई यांचीही चरित्रे लिहिली. नामदेवांच्या भावप्रदान वृत्तीमुळे या प्रकरणांना एक वेगळेच रूप दिले गेले आहे. अभंग हे माध्यम त्यांनी चरित्र कथनाचे माध्यम बनविले. मात्र यात अभंग रचनेचे श्रम जाणवत नाही. याउलट ते प्रसंगी उत्कृष्ट भावनेबरोबर भाषा, प्रतिमा व रूपकाचा येतोचित वापर करतात. चरित्रातील प्रसंगाचे वास्तव चित्र आणि स्वतःच्या मनाचे भावनात्मक कल्लोळ हे दोन्हीही एकमेकांशी मिसळून जातात. भावनांची तीव्रता अभंग पेलू शकतात तसेच समर्थ असे कथन व प्रतिपादनही अभंगातून करता येते. हेच कथन व प्रतिपादनही अभंगातून करता येते हेच नामदेवाच्या चरित्रात्मक लेखनाचे विशेष ठळकपणे नजरेत भरतात. प्राचीन चरित्रात्मक लेखनात नामदेवांनी एक प्रकारे स्वप्न वास्तव्याचे अनोखे परिणाम दिले आहे.

संत नामदेव हे भागवत धर्माचे पहिले प्रसारक होते. संत महात्म्य आणि संत समागम यांना भागवत धर्मात महत्त्वाचे स्थान आहे. संत नामदेवांना जनसामान्यांपर्यंत भक्तीचे महत्व पोहोचवायचे होते. नाम हा तर त्यांचा आत्माच होता. नाम महात्म्य सांगणे व भक्ती महतीविषद करणे हा नामदेवाच्या आख्यान काव्यरचनेचा हेतू होता. आपल्या उत्कट भक्तीने ईश्वरास प्रिय झालेल्या संतांचे आदर्श नामदेवांनी आपल्या अभंगवाणीत उभे केले आहे.

विसोबा खेचर हे नामदेवाचे गुरु असले तरी ज्ञानेश्वर हेच त्यांचे खरे गुरु होत. ज्ञानेश्वरीतून त्यांना खरी भक्तीची शिकवण मिळाली. मात्र ज्ञानेश्वर ज्ञानयुक्त भक्तीचा गौरव करतात व नामदेव विठ्ठलभक्तीचे सुखवर्णन करतात. प्रत्यक्ष विठ्ठलाची मूर्ती नामदेवांशी बोलते. नामदेव गहिवरुन विठ्ठलाजवळ स्वतःचे मन, भावना उलगडून दाखवतात. ते विठ्ठलाच्या मनाची प्रतिक्रिया अनुभवल्याप्रमाणे वर्णनही करतात. भक्ताच्या व परमेश्वराच्या मनात होणारे भक्ती सुखाचे भाव नामदेवांनी तीर्थावलीत वर्णन केले आहे.

संत नामदेव ब्राम्हणांच्या कर्मट बुद्धीवर व भेदाभेद विचारांवर टीका करतात. नामदेवांनी तीर्थावली हे प्रकरण भक्तीभोगाचा अनुभव सर्व संवेदनांनीशी वर्णन करता यावा या हेतूने लिहिले आहे. ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहिताना त्यांनी ज्ञानेश्वरीत प्रतिपादन केलेल्या तत्त्वज्ञानाचे वर्णन केले आहे. ज्ञानेश्वराची शिकवण त्यांना स्वतःच्या अनुभवाने अन्य भक्तांच्या मनावर बिंबवायची होती.

## ➢ संत एकनाथ :-

संत एकनाथ यांचा जन्म इ. स. १५३३ मध्ये पैठण येथे झाला. भानुदास - चक्रपाणी - सूर्यनारायण - एकनाथ अशी त्यांची वंशपरंपारा आहे. एकूणच नाथांचे घराणे पैठणच्या ऋग्वेदी देशस्थाचे. संत एकनाथ हे सुप्रसिद्ध संत भानुदास यांचे पणतू होत. एकनाथांचे आई वडील लहानपणीच वारले. त्यांचे संगोपन त्यांचे आजोबा चक्रपाणी यांनी केले. पैठणच्या संस्कृत विद्येच्या माहेरघरात एकनाथांचे वास्तव्य असल्याने त्यांच्या मनावर पैठणच्या संस्कृतीचे संस्कार झाले. त्यातही एकनाथ मोठे बुद्धिमान आणि श्रद्धावान होते. भगवत् भक्तीही त्यांच्या घराण्यात अनेक पिढ्याची होती. तीच पुढे एकनाथांच्याह ठिकाणी सुद्धा अवतरली.

इ. स. १५६३ ला रचलेला 'चतु:श्लोकी भागवत' संत एकनाथांचा पहिला ग्रंथ होय. चतु:श्लोकी भागवत भागवताच्या दुसऱ्या स्कंधाच्या ९ व्या अध्यायात आहे. त्यात मुळात ४५ श्लोक आहेत. एकनाथांनी त्यांच्या स्पष्टीकरणार्थ १०३६ ओव्या लिहिल्या. श्री गुरु जनार्दनस्वामींच्या आज्ञेने गोदावरीच्या उत्तर तीरावर चंद्रावती नगरीत चंद्रनामक ब्राम्हणाच्या घरी एकनाथांनी मूळ संस्कृतातील ४ श्लोकांचा भावार्थ मराठीत सांगितला. या चतु:श्लोकी भागवतात विश्वोत्पत्तीसारखा कठीण विषय अत्यंत सोपा करून सांगितला. मूळ संस्कृत ग्रंथ शालजोडी असून आपण ही मराठी घोंगडी केली असल्याचे ते आपल्या या पहिल्या ग्रंथाविषयी उपसंहाराने म्हणतात. अध्यात्मक विवरणाच्या या पहिल्या प्रयत्नातच एकनाथांचे लौकिक जीवनाचे अवलोकन, अवघड विषयी सुलभ करण्याची हातोटी आणि मराठीविषयीचा अभिमान दिसून येतो.

एकनाथांचा दुसरा ग्रंथ म्हणजे 'एकनाथी भागवत' हा होय. भागवताच्या एकादश स्कंधावरील त्यांची ही मराठी ओवीबद्ध टीका होय. यात एकूण १८,८००० ओव्या समावेश आहे. या ग्रंथाने भागवत धर्माची पूर्ण ओळख लोकांना करुन दिली.

'देवो देवपणे दाटला। भक्तु भक्तपणे आटला।
दोहाचाही अंतू आला। अभेदू जाता अनंतु॥

अशा अद्वैत भक्तीच्या बैठकीवर हा ग्रंथ रचला आहे. एकनाथांनी या ग्रंथाच्या रचनेचा प्रारंभ पैठणपासून करून तेथेच त्यांनी पहिली पंचाध्यायी पूर्ण केली. मात्र पुढील संपूर्ण ग्रंथ काशी येथे रचून काढला. संस्कृत भाषेच्या आद्यपिठात संस्कृत पंडितांकडून या ग्रंथाचा गौरव करण्यात आला. भागवत धर्माचे विश्वव्यापक स्थापन, ईश्वराची भक्ती, समता, सहजता, शांती, क्षमा यांचे सखोल विवरण रसाळ प्रासादिक वाणीने, समर्पक दृष्टांतांनी एकनाथांनी विस्ताराने यात विशद केले आहे. त्यांच्या भागवतात कर्मकांड, उपासनाकांड आणि ज्ञानकांड या सर्वांचा सांगोपांग विचार केला आहे. त्यांनी अध्यात्मशास्त्रातील असंख्य विषयाची उकल सुलभतेणे केली आहे. जनहितासह मायबोलीचा गौरवही केला आहे. त्यांनी भागवतात 'माझी मराठी भाषा चोखडी परब्रम्हे फळली मोठी' असे असे म्हटले आहे.

'रुक्मिणी स्वयंवर' हा इ. स. १५७१ मध्ये रचलेले आख्यानकाव्य होय. हे सर्वाधिक लोकप्रिय असे आख्यानकाव्य होय. यात एकनाथांनी मूळ १४४ श्लोकांवर १७१ ओव्यांचे काव्य रचले आहे. यात श्रीकृष्ण रुक्मिणीच्या विवाहाचे सुंदर वर्णन केले आहे. लौकिकदृष्ट्या जे जसे दिसते ते तसे नसून ते अवलवितेचे म्हणजे प्रत्यक्षात जीव आणि शिव यांचे मिलन होय. या ग्रंथात अठरा प्रसंगाचे वर्णन असून ते हृदयसंगम आहेत. त्यांच्या केंद्रस्थानी अध्यात्म असून यात एकनाथांनी विशुद्ध भक्तिभाव आणि नववधूच्या प्रेमाची आंदोलने कुशलतेने दाखविली आहेत. जोपर्यंत आत्मरुपाची ओळख होत नाही, तोपर्यंत जीव आणि शिवात अद्वैत प्रस्थापित करता येत नाही. जेथे जीव आणि जगत् या गोष्टी पृथक रूपाने असतात, तेथे पुनश्च एकत्वाचा प्रत्यय येऊ शकतो हे चित्र एकनाथांनी आपल्या या ग्रंथातील श्रीकृष्ण रुक्मिणीच्या मिलन प्रसंगाने दाखवले आहे.

यासोबतच त्यांनी ४४७ ओव्यांचा 'शुकाष्टक' ग्रंथ रचला. यात त्यांनी आत्म्यांचे सर्वव्यापकत्व, एकविधित्व आणि सामरस्व एकदा जाणले की स्वात्मपदाचे स्वरूप ध्यानी येते. त्यातूनच आत्मानंदाची प्राप्ती होते, असे विशद केले आहे.

'अमृतानुभव' हा त्यांचा ३० ओव्यांचा ग्रंथ होय. ही संत ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवावरील टीका होय.

‘हस्तामलक’ हा ग्रंथ म्हणजे आद्य शंकराचार्यांच्या १४ श्लोकांच्या स्तोत्रावरील एकनाथांचे ६७४ ओव्याचे भाष्य आहे.

संत एकनाथांचा ‘चिरंजीवपद’ हा ४८ ओव्यांचा एक छोटासा ग्रंथ आहे. चिरंजीवपद म्हणजे अविनाशी ब्रम्हपद. साधकाला थोरवीचा मोह कसा होतो आणि तो उपाधीमध्ये कसा गुरफडलेला जातो, त्याने हे कसे टाळावे हे एकनाथांनी या ग्रंथात सांगितले आहे.

‘आनंदलहरी’ हा ग्रंथ १५४ ओव्यांचा असून तो अतिशय लोकप्रिय आहे. या ग्रंथात परमेश्वर, त्यांची माया, तिच्या योगाने येणारे जीवाचे बंध, गुरुकृपेने जीवाची होणारी सुटका इत्यादी विषयाची चर्चा केली आहे. खरे तर एकनाथांनी गायलेली ही स्वतंत्र गुरुगीताच आहे.

‘आनंदानुभव’ या ग्रंथाचा मुख्या विषय तत्त्वज्ञानातील ब्रम्हात्मैक्य आहे. यात परब्रम्हाची ओळख करून घ्यावी हे आवर्जून सांगितले आहे. याकरिता जो स्वत: ब्रम्हरुप झाला आहे अशा गुरूला शरण जावे. यात एकनाथांनी ज्ञानोत्तर कर्माचा पुरस्कार करून आपल्या समाजाभिमुखते दर्शन घडविले आहे.

‘भावार्थ रामायण’ हा एकनाथाचा राम कथा असलेला ४० हजार ओव्यांचा एक मोठा ग्रंथ आहे. मात्र हा ग्रंथ ते पूर्ण करु शकल नाही. यात त्यांच्या २५ हजार ओव्या असून उर्वरित १५ हजार ओव्या त्यांचा शिष्य गावबा याने रचल्या आहेत. यात एकूण सात कांडे असून त्यात रामचरित्राचे वर्णन केले आहे. यात त्यांनी लौकिकाचे आध्यात्मिकरण अतिशय कुशलतेने केले आहे. यात तत्कालीन परिस्थितीचाही विचार मांडलेले आहेत. पोटभरू अहंकारी ब्राम्हणांची, नामधारी संन्याशांची, हिंसक याज्ञिकांची निर्भत्सना या नाथकालाही सुसंगत वाटते. आदर्श जीवन जगण्याची कला आणि सर्वाभूती समभाव प्रभू रामचंद्राच्या चित्रणातून एकनाथांनी दाखवून दिलेला आहे.

याव्यतिरिक्त एकनाथांनी ‘एका कृपणाचा पश्चाताप’, ‘दशावतार’, ‘एकादशी माहात्म्य’, ‘रुक्मांदाची कथा’, ‘तुळशी माहात्म्य’, ‘श्रीदत्त जन्माख्यान’, ‘बालक्रीडा’, ‘गीतासार’, ‘मुद्राप्रकाश’, ‘हलदुली’, ‘कृष्णदान’ यासारखी विनोदी आख्यानेही लिहिलेली आहेत.

## ➢ संत तुकाराम :-

संत तुकाराम महाराजांचे पूर्ण नाव तुकाराम बोल्होबा आंबिले. त्यांचा जन्म देहू येथे इ.स. १५९८ (शके १५२०) मध्ये झाला. वाढवडील देहूचे महाजन, तसेच घरात पूर्वापार विठ्ठलभक्ती चालत आलेली. म्हणूनच विठ्ठलभक्ती ही आपल्या घराण्याची मिरास असल्याचे तुकाराम महाराज अभिमानाने सांगतात. बालपणी ते बरेच खेळकर असले तरी त्यांनी व्यवहारबुद्धी आणि विचारपूर्वकतेमुळे ‘उत्तम वेव्हारे धन जोडून’ चांगला संसार केला. काही वर्षे

संसाराचे ठीक चालले असतानाच वयाच्या सतराव्या वर्षापासून तुकारामांच्या जीवनात आपत्तीचा काळोख दाटून आला. आईबाप वारले, भावजय वारली आणि थोरला भाऊ सवाजी विरक्त झाला. दुकानाचे दिवाळे निघाले. दुष्काळात गुरढोरे गेली. पहिली बायको रखमाबाई व मुलगा संतू डोळ्यादेखल मेली. संसाराची अशी वाताहत तुकोबांना उघड्या डोळ्यांनी पहावी लागेली. दुसऱ्या पत्नीच्या (जिजाई) कर्कशपणाने त्यांच्या उद्विग्नतेत भर घातली. जीवनातील या दारूण प्रसंगाचे दुःख तुकोबांच्या कवितेतून अनावरपणे वाहत राहिले. आपल्या भावनांना तुकोबांनी येथे मुक्तपणे वाट करून दिली आहे. तुकोबाच्या संसाराचा सारीपाट उधळला गेला हेही एकपरीस बरेच झाले. कारण त्यातूनच जीवनाला सामोरे जाण्यासाठी लागणारा मनाचा नि:संगपणा त्यांच्या व्यक्तिमत्वात उतरला असावा.

आपत्ती, दुःख, चिंता आणि अपमान यांनी निराश झाल्यामुळे तुकाराम गावाबाहेरील भंडारा डोंगराचा आश्रय घेऊ लागले. त्यांनी लोकांचा सहवास सोडून एकांत शोधला. ते हळूहळू ईश्वर चिंतनात रमले. दि. २३ जानेवारी १६४० रोजी त्यांना गुरुपदेश झाला. केशवचैतन्याकडून 'रामकृष्णहरी' हा मंत्र मिळाला. यापूर्वीच नामदेवे स्वप्नामाजी जागे केले आणि कवित्वाची स्फूर्ती होऊन तुकोबांची अभंगरचना सुरू झाली. त्यानंतरही तुकोबांच्या जीवनात संघर्षाचे अनेक प्रसंग आले. त्यांचे प्रतिबिंब तुकोबांच्या अभंगवाणीत दिसून येते. सालोमालोने तुकोबांचे काव्य स्वतःच्या नावावर विकले. तेव्हा - त्यामुळे तुकोबांनी सात्विक संताप व्यक्त केला आहे.

विकेल तेथे विका । माती नाव ठेऊनी बुका ।
हातो निवाड्याचा ठाव । खरा खोटा निवडे भाग ।

अशा शब्दात त्यांनी आपला सात्विक संताप व्यक्त केला. तुकारामांच्या लौकिक आणि पारलौकिक जीवनाचे प्रतिध्वनी त्यांच्या कवितेत उमटले आहेत.

ज्ञानदेवांनी रचलेल्या भागवत संप्रदायाच्या इमारतीवर कळस होण्याचे भाग्य तुकोबांना लाभले. खरे तर तुकोबांची अभंगवाणी आजही लोकांच्या अंत:करणात घर करून आहे. त्यांचे लौकिक आणि पारलौकिक भावजीवन त्यांच्या अभंगवाणीतून उत्कृष्टपणे आविष्कृत झाले आहे. सामान्यांसारखा संसार करून, त्यातील दु:खे भोगून, रात्रंदिन युद्धाचा प्रसंग करून 'अनंता'ची प्राप्ती करून घेणारा संत म्हणजे तुकाराम महाराज. म्हणूनच इतर संतापेक्षा तुकोबांबद्दल आणि त्यांच्या जीवनातून उन्मळून आलेल्या कवितेबद्दल बहुजनांना नेहमी जिव्हाळा वाटतो. कारण ते वाचताना त्यांचे अनुभव व जीवनविषयक विचार आपलेच असल्याची जाणीव सर्वांना व्हावी असे आहेत. 'अधिकार पैसा उपदेश' करून, बुडत्या जनांना व स्त्री शूद्रांना भक्तीपंथात सामावून, त्यांना उद्धाराचा मार्ग दाखविणारे, 'यातिहीन नये एको त्या वेद । तया दिले पद वैकुंठीचे' असे स्वत:च्या उदाहरणाने सिद्ध करणारे महापुरुष म्हणजे संत

तुकाराम महाराज. व्यापक सहानुभूती आणि स्वानुभव यांच्या बळावरच देहूला त्यांनी पारमार्थिक विद्यापीठाची स्थापना केली.

संत तुकाराम हे प्राचीन मराठी साहित्यातील अखेरचे प्रमुख वारकरी संत. त्यांची कविता म्हणजे संत साहित्याचा कळसाध्यायच म्हणावे लागेल. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ यांच्या सांस्कृतिक कार्याची वीणा त्यांनी खांद्यावर घेतली. वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने तर तुकारामांचे कार्य फारच मोलाचे आहे. वंशपरंपरेने चालत आलेली विठ्ठलभक्तीची मिरास त्यांनी वाढविली. स्त्री शूद्रापर्यंत पोहोचविली. नाममहिम्याने मोक्षाची पायवाट सोपी केली. केवळ वारकऱ्यांनाच नव्हे, तर साऱ्या समाजाला त्यांनी नीतिमूल्यांची आठवण करून दिली. सामाजिक जीवनात त्यांनी नीती हीच भक्ती मानली.

संत तुकारामांनी असंख्य अभंगातून संसाराची क्षणभंगुरता स्वानुभवाच्या बळावर रोकड्या बोलांनी मांडली आहे. संसार आणि त्यातला लौकिक राखता येणे कठीण असते. सांसारिक जन म्हणजे दुतोंडी सावज. धरले तर चावते आणि सोडले तर पडते अशी लौकिकाची स्थिती आहे. आपला हा विचार तुकोबांनी अत्यंत मार्मिकपणे आपल्या अभंगातून मांडताना :


Art०3 :- Everyone has the right to life, liberty and security of person.

Art०४ :- Noone shall be held in slavery.

Art०५ :- Noone shall be subjected to torture or to cruel in human.

Art०६ :- Everyone has be right to recognition every ever as a before the law.

Art०७ :- All are equal before the law.

Art०८:- Everyone is entitled in full equality.

Art १६(१):- Man and women of full ege right to marry & to found a family.

Art १७(2):- Everyone has be right to own property.

Art१८ :- Everyone has right to freedom of thought.

Art२० :- Everyone has the right to freedom and peaceful Assembly & Association.

Art २६ :- Everyone has the right to education.

अशाप्रकारे युनोने आपल्या तीस कलमी मानवी हक्काच्या जाहिरनाम्यात संपुर्ण जगाला एकतेचा आणि समतेचा संदेशच दिला नाही तर त्याच्या रक्षणासाठी तसेच सामाजिक व आर्थीक अधिकाराच्या रक्षणासाठीही वेगवेगळे करार करण्यात आले. त्याचा जगभर सातत्याने प्रचार आणि प्रसार करण्यात आल्यामुळे जगभरातील राष्ट्रांनी आपापल्या स्वातंत्र्याच्या चळवळी केल्या. तसेच वर्णव्यवस्था, गुलामगिरीचा त्याग, अस्पृश्यता, वर्गव्यवस्था याव्दारे मानवा मानवात केले जाणारे भेद नष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याचे दिसून येते. परिणामी याच कालखंडामध्ये भारतामध्ये सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठीची प्रक्रिया सुरु झाली. तिलाच आपण भारतीय संविधानाची निर्मीती प्रक्रिया असे म्हणतो.

## भारतीय संविधानाची निर्मीती व स्विकार

दुसऱ्या महायुध्दामध्ये इंग्लडच्या आवाहनानुसार भारतीयांनी व सैनिकांनी बिटीश सरकारला युध्दात विजय मिळवण्यासाठी सहकार्य केले. कारण इंग्लड विजयी झाला तर भारताला पुर्ण स्वातंत्र्य मिळणार होते. म्हणून युध्द समाप्तीनंतर इंग्लंडने पाठविलेल्या कॅबिनेट मिशनच्या सुचनेप्रमाणे संविधान निर्माण करण्यासाठी संविधान सभा स्थापन्याची प्रक्रिया सुरु झाली. हे संबिधान लोकाभिमुख असावे म्हणून निवडणुका घेण्यात आल्या. संविधान सभेवर सदस्यांचे निर्वाचन हे प्रांतीय विधीमंडळाच्या निर्बाचित सदस्याव्दारे करण्यात आले. संविधान सभेने ०९ डिसेंबर १९४६ रोजी स्वतंत्र भारताच्या संविधान निर्मीतीच्या कार्याला आरंभ केला. या वेळी एकूण २९६ संदस्यांपैकी पहिल्याच बैठकिला २०७ सदस्य उपस्थित राहिले. मुस्लिम लीगने बहिष्कार टाकल्यामुळे त्यांचे सर्व संदस्य गैरहजर राहिले." तरीहि बहुमत असल्यामुळे संविधान सभेचे कामकाज सुरळीत सुर झाले. १० डिसेंबर १९४६ रोजी अध्यक्षाच्या निर्वाचनासंबंधी नियम पारित केले. या नियमानुसार संविधान सभेने ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ राजेंद्र प[प्रसाद यांना संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून निर्वाचित करण्यात आले.' त्यासाठी पुढे वेगवेगळया समित्या निर्माण करणायत आल्या.त्याचा एक भाग म्हणून २९ ऑगस्ट १९४७ रोजी महत्वपूर्ण अशी मसुदा समिती गठीत करणायत आली.या समितीमध्ये *१) अल्लादि कृष्णस्वामी अय्यर, २) एन. गोपालस्वामी अय्यंगार, ३ ) डॉ. बी.आर. आंबेडकर, ४) के.एम. मुन्सी, ५) सय्यद मोहम्मद सादुल्ला, ६) बी.एल. मितर, ७) डी.पी. खेतान*

या सदस्यांची एकमताने निवडकरणायत आली.या समितीची पहिली बैठक ३० ऑगस्ट १९४७ रोजी घेण्यात आली आणि त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मसुदा समितीच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. या मसुदा समितीकडे घटना निमीतीची पुर्ण जवाबदारी सोपविण्यात आली आणि ती या समितीने अत्यंत यशस्वीपणे पार पाडली. या मसुदा समितीचे एकूण १४१ दिवस कामकाज झाले. घटना सल्लागार समितीने तयार केलेल्या घटनेच्या कच्या मसुदयात २४३ कलमे व १३ परिशिष्टे होती. तर मसुदा तयार केलेल्या पहिल्या मसुदयात ३१५ कलमे व ८ परिशिष्टे होती. हा मसुदा मसुदा समितीने घटना समितीपुढे मांडण्यात आला व त्यावर सखोल चर्चेअंती ३९५ कलमे व ८ परिशिष्टे स्विकारण्यात आली. परंतु घटनेसंबंधी जनमत जाणून घेण्यासाठी लोकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आली. तेंव्हा या मसुदयावर ७६३५ दुरुस्त्या सुचविण्यात आल्या. त्यापैकी २४७३ सुचना सभागृहामध्ये मांडण्यात आल्या.आणि हा संविधानाचा मसुदा सखोल चर्चा ब दुरुस्त्या करुन २५ नोव्हेंबर १९४९ ला स्विकारुन एक स्वतंत्र संविधान म्हणून २६ जानेबारी १९५० पासून तिची अंमलबजावणी सुरु झाली.

## भारतीय संविधानात मानवी हक्कांची तरतुद

युनोने १९४८ साली जाहिर केलेल्या मानवी हक्काचा जाहिरनाम्याचा प्रभाव भारतीय संविधानावरही पडलेला दिसून येतो. इतकेच नाही तर हे मानबी अधिकार प्रत्यक्षात प्रत्येक व्यक्तीला कसे उपभोगता येतील या संबंधीची हमीही संविधानाने नागरीकांना दिली आहे. कारण भारतात पुर्वापार चालत आलेली गुलामगिरी (डच, पोर्तुगिज, मोगल आणि ब्रिटीश) यांच्या वर्चस्वाखाली अनेक वर्षे घालविल्यामुळे भारतीयांना गुलामगिरीच्या मानसिक अवस्थेतून बाहेर काढणे जसे महत्वाचे होते तसे या देशात अनेक जाती, धर्म, भाषा, पराकोटीची वर्ण व्यवथेबर आधारलेली विषमता तितकिच कठीण होती. सर्व व्यक्तींना राजकिय न्यायाबरोबरच सामाजिक आणि आर्थीक न्याय देण्यारे संविधान हवे होते. यामुळे मानवी मुल्याची प्रतिष्ठा राखली जाईल. म्हणूनच घटनाकारांनी ०२ वर्षे ११ महिने आणि १८ दिवस अहोरात्रं राबून मानवी प्रतिष्ठा राखण्यासाठी हे संविधान निर्माण केले आणि २६ जानेवारी १९५० पासून एक व्यक्ती एक मत एक मुल्य या आधारावर कुठलाही भेदाभेद न करता राजकिय समता प्रस्थापित केली. तसेच राजकिय समतेच्या आधारावर सामाजिक आणि आर्थीक समता निर्माण करण्याची जवाबदारी भारतीय नागरीक आणि राज्यकर्त्यावर सोपविली. नागरीकांना दिलेले अधिकार हा मुलभूत कायदा असून लिंगाच्या आधारावर कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करता प्रत्येकाला प्रतिष्ठेने जिवन जगण्याची हमी दिली आहे. याचाच अर्थ असा की, जगातील कोणत्याही देशाच्या राज्य घटनेत मुलभूत अधिकारचे एवढे व्यापक विवेचन

क्वचितच दिसेल. घटनेच्या तिसऱ्या प्रकरणात मुलभूत अधिकाराचे स्पष्ट व विस्तारीत विवेचन करण्यात आले आहे. त्यासाठी एकूण २३ कलमामध्ये तरतुद करण्यात आली. कलम १२ ते ३० आणि कलम ३२ ते ३५ मध्ये मुलभूत अधिकाराची स्पष्टपणे नोंद केलेली आहे."

मानवी अधिकाराची लिखीत स्वरुपात तरतुद करुन त्याची नागरीकांना पुर्ण हमी देणारे संविधान म्हणून त्याचा जगभर गौरव केल्या जातो. मानवी हक्काच्या सनदेमध्ये ३० कलमे समाविष्ट करुन त्या आधारावर इतर देशांनी मानवी अधिकाराचा स्वीकार करुन अंमलबजावणी करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. त्यापेक्षा भारतीय संविधान कर्त्यांनी कमीत कमी अधिकार व जास्तीत जास्त आशय व शाश्वती देऊन हे संविधान लोकाभिमुख करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. भारतीय संविधानातील ही मानवी हक्क (मुलभूत अधिकार) पुढील प्रमाणे आहेत.

१) समानतेचा अधिकार - कलम १४ ते १८.
२) स्वातंत्र्याचा अधिकार - कलम १९ तेa २२.
३) शोषणाविरुध्दचा अधिकार - कलम २३ ते २४.
४) धार्मीक स्वातंत्र्याचा अधिकार - कलम २५ ते २८.
५) सांस्कृतिक आणि शिक्षण विषयक अधिकार - कलम २९ ते ३०.
६) संविधानिक उपाय योजनेचाअधिकार - कलम ३२.

अशाप्रकारे वरील अधिकारांतर्गत मानवी हक्काची संविधानात जोपासना केली आहे." या व्यतिरिक्त संविधानामध्ये कलम ३११ मध्ये संपत्तीचा अधिकार समाविष्ट करण्यात आला होता. परंतु या मुलभूत अधिकारामुळे देशाच्या विकासामध्ये अनेक अडथळे निर्माण करीत असल्यामुळे विकासाला खिळ बसत होती ती टाळण्यासाठी १९७९ साली ४४ वी घटना दुरुस्ती करुन संपत्तीचाअधिकार मुलभूत आधिकार म्हणून संपुष्टात आला. परंतु कांही मर्यादेपर्यंत संपत्ती धारण करण्याचा अधिकार नागरीकांना देण्यात आला. भारतीय संविधनाने भारतीय नागरीकांना मुलभूत अधिकार देऊन राजकिय समता प्रस्तापित केली आहे. तसेच व्यक्ती स्वातंत्र्य हे आबाधित ठेवण्यासाठी तशी तरतुदही केली आहे. मुलभूत अधिकारावर जर व्यक्तीचे किंवा शासनाचे निबंध आले तर आपणाला न्यायालयात जाऊन दाद मागण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. तसेच कमल १६(१) नुसार राज्याच्या नियंत्रणाखाली कोणत्याही पदावरील सेवा योजना किंवा नियुक्ती या संबंधीच्या बाबीमध्ये सर्व नागरीकांना समान संधी दिलेली आहे. तसेच कलम २९(२) मध्ये स्पष्ट केले आहे को, राज्यांकडून चालविल्या जाणाऱ्या किंवा राज्यनिधीतून सहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही संस्थेत कोणत्याही नागरीकास केवळ जात, धर्म, लिंग, वंश, भाषा, प्रदेश किंवा यापैकी कोणत्याही कारणावरुन प्रवेश नाकारला जाणार

नाही.'[५] अशी शाश्वती दिली आहे. यावरुन स्पष्ट होते की, युनोने १९४८ साली मानवी हक्काच्या जाहिरनाम्यापेक्षा भारतीय संविधानाने नागरीकांना दिलेले मुलभूत अधिकार व त्याची सुरक्षितता यासाठीचे दिलेले अभिवचन हे अधिक वास्तववादी असल्याचे दिसून येते.

## राष्ट्रीय मानवी हक्क आयोग

भारतीयसंविधानाने नागरीकांना दिलेल्या अधिकाराची पायमल्ली होऊ नये इतकेड नाही तर ते अधिक सुरक्षित राहण्यासाठी स्वतंत्रपणे राष्टीय मानवी हक्क आयोग स्थापन्याचे प्रयत्नही सुरु केले. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे २१ बे सर न्यायाधिश रंगनाथ मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील पहिला राष्ट्रीय मानय अधिकार आयोग १२ ऑक्टोबर १९९३ ला स्थापन करण्यात आला.[६] त्या आधारावरच राज्य मानवी हक्क आयोगही राज्यांमध्ये स्थापन करण्यात आलेले आहेत. स्वतंत्र न्याय व्यवस्था असूनही नागरीकांच्या अधिकाराचे संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठीच हे मानवी हक्क आयोग कार्यरत असल्याचे दिसून येते त्यामुळे जगभर भारतीय संविधानाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

## भारतीय संविधानाचे महत्व

२६ जानेवारी १९५० पासून भारत हे सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य म्हणून जगभर नावारुपाला आले आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही आपण संविधानाव्दारे यशस्वी करीत आलो आहेत. या देशात विविध जाती, पंथ,धर्म, भाषा, संस्कृती असतांनाही गेल्या ६३ वर्षामध्ये संविधानाने सर्व जनतेमध्ये देशाभिमान राष्ट्रीय ऐक्य निर्माण केल्यामुळेच एक शक्तीशाली महासत्ता म्हणून हा देश जगा समोर येऊ पाहात आहे. ते संविधानाने केलेले कार्य नागरीकांचे मानबी हक्क ते सुरक्षित ठेवण्याची हमी यामुळेच शक्य झाले आहे. म्हणूनच भारतीय राज्य घटनेतील मानवी अधिकारासबंधी न्यायमुती एम.व्ही. तारकूंडे म्हणाले की, मानवी हक्क हे मानवतावादी तत्वज्ञान आहे. तर पंडीत नेहरु म्हणाले होते को, कठोर नियंत्रणातून संपादिलेल्या प्रगतीपेक्षा व्यक्ती स्वातंत्र्य हे मी अधिक मोलाचे मानतो. डॉ. राधाकृष्णनही या संबंधी म्हणतात की, राज्य सत्तेच्या अतिक्रमणापासून मानवी चैतन्याची स्वतंत्रता आपण अधिक सुरक्षित ठेवली पाहिजे. आपण काढीत असलेला हा हक्काचा जाहिरनामा म्हणजे जनतेला दिलेले वचन आहे. सुसंस्कृत जगाशी आपण केलेला तो करार आहे. भारतीय संविधानाचा भारतातील विद्वानांनीच गौरव केला नाही तर पाश्चिमात्यांनीही तोंड भरून कौतुक केले आहे. याची साक्ष आपणाला अनेष्ट बार्कर यांनी लिहिलेला Principle of Social & Political Theory या ग्रंथामध्ये आपल्या प्रस्तावनेच्या आधि भारतीय संविधानाचा सरनामा (Preamble) जशाचा तसा छापला आहे. तो या सरनाम्यासंबंधी लिहितो की,

I ought to explain as I end, why the preamble to the constitution of India is printed after the table of contents. It seemed to me, when I read it, to state in a brief and pithy from the argument of much of the book, and it may accordingly serve as a key-note. I am the more moved to quote it because I am proud that the people of India should begin their independent life by subscribing to the principles of political tradition which we in the west call western, but which is now something more than western."

वरील विधानावरुन स्पष्ट होते की, युनोने प्रसारित केलेल्या मानवी हक्काच्या जाहिरनाम्यापेक्षा भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेले अधिकार हे बदलत्या परिस्थितीतही आपले स्थान टिकवून आहे. म्हणूनच तर अर्नेष्ट बारकर सारख्या विद्द्वानाने भारतीय संविधानाच्या सरनाम्यातून संविधानाचे महत्व मान्य केले आहे. परंतु भारतीयांसमोर जे खरे आव्हान आहे.ते अजून संपलेले नाही. ते आव्हान डॉ. आंबेडकरांनी २५ नोव्हेंबर १९४९ रोजीच जाहिर केले होते. कारण २६ जानेवारी १९५० पासून आपण राजकिय समता प्रस्तापित करु. परंतु राजकिय समतेच्या सहाय्याने जोपर्यंत आपण सामाजिक आणि आर्थीक समता करणार नाहीत तोपर्यंत आपण स्विकारलेल्या लोकशाहीला किंमत राहणार नाही. ही डॉ. आंबेडकरांची भविष्यवाणी आजही खरी ठरत आहे. ज्या दिवशी आपण राजकिय समतेच्या सहाय्याने सामाजिक व आर्थीक समता प्रस्तापित करु तो दिवस भारतीय नागरीकांच्या जिवनातील महत्वाचा दिवस म्हणून साजरा केला जाईल यात शंका नाही.

**Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College**
**Armori Dist. Gadchiroli.**

# Department of Political Science

# Project Report

**2023-24**

Mahatma Gandhi Art, Science & Late N.P. Commerce College
Armori Dist.: Gadchiroli
Department of Political Science

Session :2023-24

B.A. Sem – VI
Project Work

# TOPIC

## "HUMAN RIGHTS AND TERRORISM"

Student Name

1) Shravani Devanand Gedam

2) Rohit Devidas Kumoti

3) Manjusha Tikaram Wakade

4) Achal Prakash Gedam

5) Shashikala Gangaram Aaha

HEAD
Department of Political Science
Mahatma Gandhi Arts,Science &
Late N.P.Commerce College,Armori

Guide By
Prof.Gajanan W.Borkar

Mahatma Gandhi Art, Science & Late N.P. Commerce College
Armori Dist-Gadchiroli

Mahatma Gandhi Arts Science & Late N P Commerce College Armori
Department of Political Science

# CERTIFICATE

This is to certify that following students of **B.A. III** year have successfully completed the Research project entitled HUMAN RIGHTS & TERRORISM the subject of **Political Science** for the session 2023-24.

1) Shravani Devanand Gedam
2) Rohit Devidas Kumoti
3) Manjusha Tikaram Wakade
4) Achal Prakash Gedam
5) Shashikala Gangaram Aaha

Head
**HEAD**
Department of Political Science
Department of Political Science
Mahatma Gandhi Arts,Science &
Late N.P.Commerce College,Armori

# मानवी हक्क आणि दहशतवाद

## प्रस्तावना

'मानवी हक्क आणि दहशतवाद' हया दोन्ही संकल्पना परस्पर विरोधी आणि पराकोटीच्या एकमेकांशी विषम आहेत. एक संकल्पना समग्र हक्क देते तर दुसरी संकल्पना त्या हक्कांची पायमल्लीच नव्हे तर नष्ट करण्याचा हिंसात्मक प्रयत्न करते. यामुळे आज आंतरराष्ट्रीय राजकारणाला प्रभावित करणारा व मानवी हक्कांचे स्पष्टपणे उल्लंघन करणारा घटक म्हणजे दहषतवाद होय. मानवी हक्क जसे आज जगातील प्रत्येक राष्ट्राने स्विकारले आहे. त्याचप्रमाणे दहशतवादासारखा यक्ष प्रश्नही आंतरराष्ट्रीय समुदायासमोर आव्हान देत उभा आहे. म्हणून जगातील सर्व राष्ट्रांनी मानवी हक्कांचे संरक्षण करण्यावर कटाक्ष टाकला आहे. कारण मनुष्य जन्मतः स्वतंत्र आहे. काही हक्क त्याला जन्मल्यापासूनच मिळतात. प्रत्येकाचं जीवन सुजलाम् सुफलाम् व्हावे, प्रत्येकाला हक्काची प्रतिष्ठा प्राप्त व्हावी. या विचारधारेतून मानवी हक्काची संकल्पना उदयाला आली व आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्वाचा टप्पा बनली. 20 व्या शतकामध्ये पहिल्या· महायुध्दानंतर जागतिक शांतता, सुरक्षितता निर्माण होण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुडो विल्सन यांनी 14 कलमी योजना मांडली. परंतु भविष्यामध्ये याच महासत्तांनी प्रतिस्पर्ध्यांना नामोहरण करण्यासाठी व जागतिक एककेंद्री वर्चस्व निर्माण करण्यासाठी दहशतवादासारखे बीज पेरले. परिणामत: त्याचेच कडू फळ म्हणून 11 सप्टेंबर 2001 रोजी अमेरिकेवरील झालेल्या दहशतवादी हल्ल्याने मानवी हक्कांना पायदळी तुडविले. त्याचा परिणाम मानवी हक्कांना आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा धोका दहशतवादी कारवायांनी निर्माण केला. या निबंधामध्ये मानवी हक्कांची संकल्पना स्पष्ट करून मानवी हक्कांची पायमल्ली दहशतवादामुळे कशी झाली व होउन जागतिक शांततेसमोर आव्हान कसे निर्माण झाले याचे विवेचन केले आहे.

## मानवी हक्काचा अर्थ

मानवी हक्कांची संकल्पना 'मानव मात्रातील मूलभूत समतेच्या' गृहितकावर आधारित आहे. यामागे अशी भूमिका आहे की, मानव हा जन्मतः मुक्त आणि समान आहे. म्हणून त्याला कोणत्याही भेदभावरहित समान वर्तणुकीची हमी दिली पाहिजे. त्यामुळे 'समान वागणुक' आणि 'भेदभावाचा अभाव' या मानवी हक्क विचारातील मूलभूत संकल्पना आहेत.

**१.मॅरिस क्रॅटसन :-** "मानव अधिकार हे स्वातंत्र्याचे सर्वोच्च आणि पवित्र अधिकार असून त्यांचे उल्लंघन राज्याला करता येणार नाही.'

२."दुसऱ्या महायुध्दापूर्वी राज्यप्रणीत हक्कांची संकल्पना रूढ होती.राज्य संस्थेद्वारा मान्य केले जाणारे व राज्यसंस्थेच्या कार्यक्षेत्रातच उपलब्ध असणारे व्यक्तीचे दावे म्हणजे हक्क अषी धारणा होती.'"

**३.रॅन्डमहाउस विश्वकोष :-** "मानव हक्क म्हणजे व्यक्तीला जन्माने प्राप्त झालेले असे अधिकार जे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी अत्यावश्यक आहेत."

## मानवी हक्क आणि दहशतवाद

आंतरराष्ट्रीय शांततेसमोरील आणि मानवी हक्कासमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे दहशतवाद ठरत आहे. गेल्या तीन दशकापासून आंतरराष्ट्रीय पातळीवर जवळपास 3 लाखाहून अधिक निष्पाप लोक दहशतवादी हल्ल्यामुळे ठार झाले आणि एकटया भारतासंदर्भात बोलायचे तर जम्मु काश्मिर मधील दहशतवादी कारवायामुळे ९० ते ९५ हजार लोक ठार झाले.

## दहशतवाद म्हणजे काय?

दहशतवाद ही एक गुंतागुंतीची आणि वादग्रस्त संकल्पना आहे. दहशतवादाच्या व्याख्येविषयी केवळ विद्वानामध्येच नाही तर राष्ट्राराष्ट्रामध्ये देखील मतभेद आहेत. ढोबळपणे, "दहशतवाद" म्हणजे राजकीय उद्दिष्टांसाठी हिंसेच्या साधनांचा वापर, होय.

पेग्विन राज्यशास्त्र शब्दकोशानुसार, "आमुलाग्र राजकीय आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने शासनावर दबाव आणण्यासाठी हिंसाचाराच्या मार्गाचा अवलंब करणे

दहशतवादी भीती, दरारा आणि अनिश्चित वातावरण निर्माण करून काही राजकीय उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी शासनावर, लोकमतावर दबाव आणून हत्या, बॉम्ब स्फोट, अपहरण, मानवी बॉम्ब इ. साधनांचा अवलंब करतात.

एकुण दहशतवादी म्हणजे समाजातील असा लहानसा गट जो हिंसेचा वापर करून शत्रुपक्षात आणि त्यांच्या समर्थकांत दहशत निर्माण करून त्यांच्याकरवी आपणास हवे तसे निर्णय घ्यावयास लावू पाहतो.

## दहशतवाद : मानवी हक्कासमोरील आव्हान

आज जागतिक शांतता व मानवी हक्कांसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणून दहशतवादाचा उल्लेख केला जातो. आंतरराष्ट्रीय समुदायासमोरील सर्वात मोठा चिंतेचा विषय म्हणजे दहशतवाद भारत, रषिया, चीन, अमेरिका, जपान, मध्य आशियाई राष्ट्रे, स्पेन इत्यादी राष्ट्रांच्या शांतता आणि सुरक्षिततेला दहशतवादाने आव्हान दिले आहे. आतापर्यंत दहशतवादी हिंसाचारांतून जवळपास 3 लाखापर्यंत लोक मारले गेले. राजकीय उद्दिष्टपूर्तीसाठी हिंसाचाराचा वापर पूर्वीपासून होत आला आहे. अनेक राज्यक्रांत्यांना हिंसाचाराची पार्श्वभूमी

आहे. हे विसरून चालणार नाही. तेथे ही दहशतवादाचा पध्दतशीर वापर झालेला दिसतो. विसाव्या शतकात खऱ्या अर्थाने दहशतवाद संघटित शक्ती म्हणून उदयाला आला. त्यास वैश्विक रूप प्राप्त झाले. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबर दहशतवादी संघटनेच्या कार्यपध्दती साधनात आमुलाग्र बदल झाले. त्यांच्या हिंसाचारी क्षमतेत वाढ झाली. युरोप, आशिया, आफ्रिका, अमेरिका खंडामध्ये अनेक राष्ट्र दहशतवादाचा शिकार झाले, दहशतवाद जागतिकशांततेसमोरील आव्हान कसा हे पुढीलप्रमाणे

## १.दुसऱ्या महायुध्दापूर्वीचा दहशतवाद

साम्राज्यवादी राष्ट्रांनी साम्राज्य विस्तारण्यासाठी खुप प्रयत्न केले. त्याचे पर्यावसन पहिल्या महायुध्दात झाले आणि प्रथमतः जागतिक शांतता आणि सुव्यवस्थेला तडे गेले. म्हणून अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी जागतिक शांतता आणि सुरक्षेसाठी चौदा कमी योजना मांडली परंतु इटलीमधील मुसोलिनी व जर्मनीतील हिटलर यांनी आपल्या देशाची पहिल्या महायुध्दात गेलेली पत परत आणण्यासाठी हुकुमशाही तंत्राचा वापर केला. जनसामान्यात आपली वचक व दहशत निर्माण केली. राष्ट्रसंघाच्या धोरणाला तिलांजली देत आपल्या दहशतवादी प्रवृत्तीतून राष्टाचा विकास करण्यावर जोर दिला. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात नवे कायापालट घडून आले. राष्ट्रसंघ हा दोन हुकूमशाहीची दहशत थोपवू शकला नाही. राष्ट्रसंघ अपयशी ठरले त्यातूनच जगामध्ये दुसऱ्या महायुध्दाची चाहूल लागली. यास हुकुमशहांची दहशतवादी प्रवृत्ती कारणीभूत ठरली आणि पुनश्च एकदा जगासमोर शांततेचा यक्ष प्रश्न उभा राहिला.

## ३.पश्चिम आशियातील दहशतवाद

सन १९५० व्या शतकात पश्चिम आशियामध्ये स्वतंत्र पॅलिस्टाईन राष्ट्राच्या निर्मितीसाठी दहशतवादी कारवयांना प्रारंभ झाला. सन 1949 साली पॅलिस्टाईनच्या भूमीचे विभाजन करून स्वतंत्र इस्त्रायल राष्ट्र निर्माण करण्यात आले. या पॅलिस्टाईनच्या विभाजनाला पष्चिम आशियातील मुस्लिम राष्ट्राचा विरोध होता. इस्त्रालयचे अस्तित्व नष्ट करण्यासाठी आणि उभारणीसाठी अनेक दहशतवादी संघटना उदयाला आल्या या संघटना अरब राष्ट्राकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आर्थिक, लष्करी समर्थन मिळाले. एकूण जागतिक राजकारण अशांततामय बनले. या दोन देशातील कारवायांनी मानवी हक्काची कुचंबना केली

## ३. युरोपमधील दहशतवाद

दुसऱ्या महायुध्दानंतर युरोपियन राष्ट्रांमध्ये झालेल्या राजकीय आणि आर्थिक व्यवस्थांना विरोध करण्यासाठी काही दहशतवादी संघटना उदयास आल्या. युरोपातील खालावलेली आर्थिक परिस्थिती, जागतिक मंदी, राजकीय अस्थिरता यामुळे लोकांमध्ये असंतोष

वाढला. या असंतोषाचे भांडवल दहशतवादी संघटनांनी केले. त्यात प्रामुख्याने इटलीमध्ये *Red Brigade* जर्मनीमध्ये *Red Army* या संघटना आघाडीवर होत्या. याच काळात उत्तर आयर्लंडमधील रोमन कॅथेलिक व प्राटेस्टंट पंथियांच्या संघर्षातून दहशतवादी संघटना आकाराला आल्या. त्यामध्ये *Irish Republican Army* ही दहशतवादी संघटना महत्वाची आहे. यांच्या कृत्यामुळेही युरोपातील शांतता, सुव्यवस्था व मानवी हक्क धोक्यात आले.

## ४.शितयुध्दाचे राजकारण आणि दहशतवाद

दुसऱ्या महायुध्दोत्तर काळातील आशिया आणि युरोपमधील दहशतवादा शीतयुध्दाच्या राजकारणाने खतपाणी घातले. जागतिक राजकारणाचे व सत्तेचे नेतृत्व कोणी करायचे यासाठी अमेरिका आणि रशिया यांच्यात चाललेल्या स्पर्धेतून गट-प्रतिगटाची निर्मिती झाली. (NATO,CEATO, CENTRO, WAARSA) सेविएट रशियाला नामोहरम करण्यासाठी अमेरिकेने पाकिस्तानच्या मदतीने अफगाणिस्थानमध्ये तालिबांनी दहशतवाद्यांना लष्करी मदत करून रशियाची शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला. शितयुध्दाच्या राजकारणाचाच एक भाग म्हणून दोन्ही महासत्ताकडून आधुनिक शस्त्रास्त्रांचा, अण्वस्त्रांचा जाणीवपूर्वक प्रसार केला गेला. दहशतवादी संघटनांना लष्करी, आर्थिक मदत देऊ केली. राजकीय अस्थिरता, सत्तापालट करण्यासाठी अनेक राष्ट्रांचा गैर वापर दोन्ही महासत्ताकडून झाला. शितयुध्दामधून दोन्ही महासत्तांनी जणू जगच दोन भागात वाटण्याचा निश्चय केला होता. त्यांच्या या कृत्यास थांबविण्यासाठी UNO सारखी आंतरराष्ट्रीय संघटना देखील अपयशी ठरली. शितयुध्दाने निर्माण केलेली असुरक्षितता आणि संशयाच्या वातावरणामुळे दहशतवादी संघटनांच्या चळवळी फोफावल्या, परिणामी समुच्यय मानवी समाज धोक्यात आला.

## ५. मुलतत्ववादातून दहशतवाद

सन १९८० च्या दशकात मुलतत्ववादी चळवळीतून अनेक संघटना उदयाला आल्या. त्यातील वहुतांश संघटना या इस्लामिक) संघटना होत्या आणि त्यांचे केंद्र पश्चिम आशियामध्ये होते. जेहादी संघटनांच्या प्रसाराची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी सन १९७९ मध्ये इराणमधील धार्मिक क्रांती आयातुल्ला खोमेनीच्या नेतृत्वाखाली झाली. वाढत्या पाश्चिमांत्यीकरणाच्या आणि ख्रिश्चन धर्म प्रसार विरोधात होती. जेहादी संघटनांचा प्रसार अफगाणिस्तान,सुदान, इजिप्त, पाक, मध्य आशियातील राष्ट्रात झाला. सन १९७९ साली सेविएट रशियाने आफगाणिस्तानमध्ये आपले सैन्य घुसविले. त्याच्या या लष्करी हस्तक्षेपाला विरोध करण्यासाठी अमेरिकेने जेहादी संघटनाचा वापर करून घेतला. आफगाणिस्तान मधील सैन्याला हुसकावून लावण्यासाठी तालिबान्यांना आर्थिक व लष्करी मदत पुरवली. याच पार्श्वभूमीवर ओसामा बीन-लादेन च्या नेतृत्वाखाली 'अल-कायदा' ही दहशतवादी संघटना

निर्माण झाली. याच संघटनेने पुढे अमेरिकेचा शस्त्रास्त्रांचा तंत्रज्ञानाचा वापर करून११ सप्टेंबर २००१ साली अमेरिकेच्या जागतिक व्यापार केंद्रावर हल्ला केला, की ज्यामुळे जागतिक शांततेचे अस्तित्व धोक्यात आले. 'इस्लामिक मुलतत्ववादी चळवळीतून अलकायदा, अबु निदाल, हिजबुल मुजाहिद्दीन, इस्लामी संघ' इ. दहशतवादी संघटना निर्माण झाल्या.» या दहशतवादी संघटनेच्या कारवायांनी जागतिक शांततेला आव्हान निर्माण केले.

## ६. शीतयुध्दोत्तर दहशतवाद

१. दुसऱ्या महायुध्दानंतर शीतयुध्दाला प्रारंभ झाला. सन १९४५-१९९०पर्यंत शीतयुध्दाचा कालावधी मानला जातो. १९९० साली सेहिएत रशियाचे विघटन झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर व्दिधृवी करणाची विश्व रचना संपुष्टात आली आणि एक विश्वरचना निर्माण झाली. एक ध्रुवी विश्वरचना म्हणजे अशी विश्व रचना की ज्यामध्ये एकाच राष्ट्राचे प्रावल्य असते. यात अमेरिका ही एकच एकधृवी महासत्ता ठरली. आंतरराष्ट्रीय राजकारणात 'स्वयं घोषित विश्व रक्षणकर्त्याची" (Self Proclaimed Global Policeman) भुमिका आहे. त्यासाठी अनेक शस्त्रास्त्रांची निर्मिती करून स्वतःजवळ बाळगली. याच शस्त्रास्त्रांची व लष्करी साधनांची मदत अमेरिकेने अलकायदा सारख्या, तालिबानी सारख्या दहशतवादी संघटनांनी केली. त्यामुळे जगातील असंख्य निष्पाप लोक मारले गेले.

२. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यामधील मुख्य संशयित ओसामा-बीन _लादेन याला आफगाणिस्तानमधील तालिवान शासनाने आश्रय दिल्याच्या संशयावरून आफगाणिस्तान विरूध्द लष्करी कारवाई केली यात ही शेकडो निष्पाप लोक मारल्या गेले.

३. सन 1999 साली काश्मीर मधील दहशतवादी संघटनांनी इंडियन एअर लाईन्स विमानाचे अपहरण केले त्यातून काश्मीरच्या प्रश्नाच्या आंतरराष्ट्रीयकरणाला चालना मिळाली.

४. पश्चिम आशियामध्ये अल-जजीरा या वृत्त वाहिनीवरून ओसामा-बीन-लादेनच्या धमक्या प्रसारित केल्या जातात. हा देखील दहशतवादी संघटनेचा शांततेला आव्हान देण्याचा प्रयत्न ठरतो.

५. दहशतवादी कृत्यामुळे अनेक राष्ट्रे युध्दासाठी जसे,इस्त्रालयणे पालेस्टाईमध्ये लष्करी हस्तक्षेप केला याच आधारावर २००४ साली अमेरिकेने इराण युद्धामध्ये लष्करी कारवाई केली.सद्दाम हुसेनचा अल कायदासारख्या दहशतवादी संघटनेशी संबध आहे भासावून इराक विरुद्ध लष्करी कारवाई करण्यात आली.त्यामुळे आखाती राष्ट्रात अशांतता ओअसरून त्याचे व्यक्ती स्वातंत्र्य धोक्यात आले.

६. दहशतवादी कारवायाच्या माध्यमातून स्वातंत्र्य आणि सार्वभौम राज्याच्या निर्मितीसाठी आज अनेक दहशतवादी संघटना प्रयत्नात आहे.श्रीलंकेत लिट्टे,पालेस्टीनमधील हमास ,इंग्लंड मधील आयरिश रिपब्लिक आर्मी भारतातील जम्मू काश्मीर मधील हिजबुल मुजाहिद्दीन,जैश-ए- मोहम्मद,लष्कर- ए- तोयबा या यासारख्या कडव्या दहशतवादी संघटना जागतिक शांतता भंग करून मानवी हक्काचे उल्लघन करीत आहेत.त्याचे अतिशय गंभीर उदाहरण म्हणजे भारताचे माझी युवा पंतप्रधान राजीव गांधी यांची लिट्टेने केलेली अमानुष हत्या होय.त्याचबरोबर दहशतवाद्यांनी केलेला २३/११ चा मुंबईवरील हल्ला हाही भारतातीलच नव्हे तर जागतिक शांततेला आव्हान ठरतो.

## सारांश, निष्कर्श

वरील अभ्यासावरून एकच गोष्ट प्रकर्षाने जाणवते की दहशतवादी कारवायांनी मानवी हक्काचे उल्लंघन केले आहे. दहशतवादी कृत्ये ही आता देशाच्या सिमेपुरतीचं मर्यादित न राहता ती थेट आता देशांतर्गत महत्वाच्या शहरात घुसली आहेत आणि त्याचे सर्वात मोठे उदाहरण म्हणजे ११ सप्टेंबर २००१ चा जागतिक व्यापार केंद्रावरचा व भारतातील ताज हॉटेल वरील दहशतवादी हल्ला होय. अलकायदाच्या रूपात ओसामा-वीन-लादेनच्या इशाऱ्याने हा हल्ला चढविला. सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर 'स्वयंघोषित विश्व रक्षण कर्ता म्हणून अमेरिका समोर आली. War Againse Terrorism ची संकल्पना स्विकारली तरी देखील दहशतवादी कारवाया थंड पडल्या नाही, किंवा मानवी हक्कांचे उल्लंघन थांबले नाही.

थोडक्यात दहशतवादी कारवायामुळे मानवी हक्क धोक्यात येत आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेचे शांततेसाठीचे प्रयत्न निष्फळ ठरत आहेत. दहशतवाद हा केवळ एका राष्ट्रापुरताच मर्यादित न राहता संपूर्ण जगास त्याने गिळंकृत केलेले आहे. अशा भयावह समस्येला सामोरे जाण्यासाठी लोकांमध्ये जाणीव जागृती निर्माण व्हावी. राष्ट्रप्रेमाची भावना वाढीस लागली पाहिजे. भ्रष्टाचाराला आळा बसला पाहिजे. राजकारणातील लोकसहभाग वाढून मानवी हक्कांची जोपासन केली पाहिजे. प्रत्येक मनुष्य हा जागरूक झाला तर दहशतवादासारखा मानवी हक्काला आव्हान ठरणाऱ्या समस्येला सहज उत्तर सापडू शकते. जर स्वतःपासून आपण सदरील गोष्टी आचरणात आणल्या तरच हे शक्य आहे अन्यथा अनर्थ अटळ आहे.

# महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी

## गडचिरोली जिल्हयातील आदिवासी लोककला संस्कृती – समाजशास्त्रीय अध्ययन
## विशेष संदर्भ : आरमोरी तालुका

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

समाजविज्ञान विद्याशाखेतील समाजशास्त्र या विषयातील

प्रकल्प(Project)

**Class : B. A. III**

मार्गदर्शक
**डॉ. गजेंद्र कढव**
समाजशास्त्र विभागप्रमुख
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

2023-2024

# प्रतिज्ञापत्र

आम्ही B. A. भाग III या प्रतिज्ञापत्राद्वारे निवेदन करतो की, गोंडवाना विद्यापिठ गडचिरोली, जि. गडचिरोली येतील बी.ए. भाग III च्या अभ्यासक्रमानुसार मी महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय आरमोरी येथे समाजविज्ञान शाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयात प्रकल्प सादर करीत आहे. मी घोषित करतो की, प्रस्तुत शोधप्रबंध मी स्वतः लिहिलेला असून यातील माहिती सत्य व प्रामाणिक असून ती आजवर कुठेही प्रकाशित केलेली नाही अथवा सादर केलेली नाही.

**दिनांक** **संशोधनकर्ता**

| Sr. No. | Name of Students | Sign |
|---|---|---|
| 1 | Sakshi Vinayak Chudhari | [illegible] |
| 2 | Pranjal Tarachand Watgure | P. Watgure |
| 3 | Bharti Dhananjay Kadam | B.Kadam |
| 4 | Mehavish Baburao Jangi | [illegible] |
| 5 | Amisha Arun Gavande | A.A. Gavande |
| 6 | Megha Dharmaj Donadkar | Donadkar |
| 7 | Shilpa Kawadu Dhote | S. Dhote |
| 8 | Isha Sudhir Surankar | — AB — |
| 9 | Shital Narendra Wazade | — AB — |
| 10 | Bhagyashri Antaram Chaudhari | B.Chaudhari |

# गडचिरोली जिल्हयातील आदिवासी लोककला संस्कृती – समाजशास्त्रीय अध्ययन
## विशेष संदर्भ : आरमोरी तालुका

**प्रस्तावना: -** गडचिरोली जिल्हा महाराष्ट्राच्या पूर्व दिशेला असून वनव्याप्त व आदिवासी बहुल क्षेत्र म्हणून ओळखला जातो. या जिल्हयात 2011 च्या जनगणनेनुसार आदिवासींची एकूण लोकसंख्या 4,15,306 इतकी असून टक्केवारी 38.17 % आहे. गडचिरोली जिल्हयात एकूण 12 तालुके आहेत. त्यातील आरमोरी तालुका अतिमागास व नक्षल प्रभावित क्षेत्र आहे. या तालुक्यात 2011 च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या 31,3,33 इतकी असून टक्केवारी 73.19 % आहे. त्यामुळे आरमोरी तालुका हा आदिवासी बहुल क्षेत्र म्हणून ओळखले जाते. हा तालुका गडचिरोली मुख्यालयापासून 120 कि.मी. अंतरावर आहे. या तालुक्याला छत्तीसगढ राज्याचे व गोंदिया जिल्हयाचे सीमारेषा लागून असून त्यांच्याशी रोटी - बेटी व्यवहार चालू आहे. येथिल लोककला संस्कृतीवर छत्तीसगढ राज्याच्या संस्कृतीचा प्रभाव पडलेला दिसून येतो. या तालुक्यात राहणाऱ्या गोंड, हलबी, कवर, इत्यादी आदिवासी जमातींच्या लोककला संस्कृतीचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे.

आदिवासींना अनेक अभ्यासकांनी वेगवेगळया नावांनी संबोधले आहेत. रिसले, लॅस्ली, एल्विन, गॅमसन, शुबर्ट मार्टिन, ए.व्ही.ठक्कर यांनी आदिवासी लोकांना " अगदी प्राचिन " (Aboriginal) किंवा "अगदी मुळचे रहिवासी " (Aborigines) म्हटले आहे. प्रसिध्द समाजशास्त्रज्ञ डॉ. घुर्ये यांनी त्यांना " तथाकथीत मुळचे रहिवासी " (So Called Aborigines) व " मागासलेले हिन्दू " (Backword Hindus) असे म्हटले आहे. अशा या विशिष्ट आदिवासींची लोककला संस्कृतीसुध्दा वैशिष्टयपूर्ण आहे. संस्कृती शब्द अतिशय व्यापक अर्थाने वापरले जाते परंतु समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला तर संस्कृती ही मानव निर्मित आहे. ती निसर्ग निर्मित नाही, मानव स्वत: च्या बौध्दिक, आकलन, ग्रहण,काल्पनिक, स्मरण इत्यादी क्षमता तसेच विशिष्ट प्रकारची शारीरिक ठेवण इत्यादी वैशिष्टयांमुळे संस्कृती निर्माण करू शकला त्याचे जतन, संवर्धन व तिचा विकास करू शकला. लोककला संस्कृतीचाच अंग आहे. लोककला आदिवासी आणि ग्रामीण समुदायाच्या निसर्गाशी संबधित दैनंदिन जीवनातुन विकसित होत असते. ' लोककला म्हणजे लोकांनी अविष्कार केलेली कला आहे

**उद्दिष्टये: -**

१. आदिवासी लोककला संस्कृतीचे अध्ययन करणे.

२. आदिवासी लोककला जाणून घेणे.

३. आदिवासी प्रथा, परंपरा जाणून घेणे.

**गृहितकृत्य: -**

१. आरमोरी तालुक्यातील आदिवासी लोककला संस्कृती वैशिष्टयपूर्ण आहे.

२. आरमोरी तालुक्यातील आदिवासी लोककला संस्कृती निसर्गाशी संबधित आहे.

**माहिती संकलन व संशोधन पध्दती: -**

प्रस्तुत संशोधनात्मक लेख तयार करण्यासाठी दुय्यम व प्राथमिक सामग्रीचा वापर करण्यात आला आहे.त्यामध्ये संदर्भ ग्रंथ,अहवाल, विविध शोध निबंध, इंटरनेट, प्रत्यक्ष मुलाखत यामधून माहितीचे संकलन करण्यात आलेले आहे.

**आरमोरी तालुक्यातील लोककला संस्कृती: -**

**करसाळ:** - करसाळ हे गोंड आदिवासी जमातीमध्ये एक वंश पूजा आहे त्यालाच पूर्वज पूजा सुध्दा म्हटले जाते एकाच वेळी कुटूंबातील एकापेक्षा अधिक व्यक्तिंचा करसाळ करता येतो. मृत्यू पावलेल्या व्यक्तीला आपल्या देवामध्ये विलीन करण्यासाठी ही एक पूजा पध्दती आहे. तसेच या पूजा पध्दतीव्दारे गुड्डी (समाधी) बांधली जाते. करसाळ तीन दिवसांचा असतो ही पूजा अक्कोमामा (आजोबा,मामा) च्या हातून केली जाते. या तीन दिवसात प्रत्येक दिवशी रात्रंदिवस वेगवेगळी विधी पार पाडली जाते. यामध्ये पारंपारिक वाद्य, नृत्य, गाणे यांचा वापर करून अतिशय आकर्षक पध्दतीने करसाळचे तीन दिवस पार पाडले जाते. येथे पारंपारिक पध्दतीने नृत्य सादर करणारे तीन समूह असतात. एक इंगळे नृत्य सादर करणारा समूह असतो, यामध्ये अस्वल, वाघ, सिंह इत्यादी अनेक प्राण्यांची वेशभूषा करून नृत्य सादर करतात. दुसरा समूह नगोरे वाजवणारे व पारंपारिक गोंडी गीत गाणारे व तिसरा समूह सेरेकांग नृत्य करणारे व गाणे गाणारे असतात या नृत्य प्रकारामध्ये एक व्यक्ति गाणे म्हणतो त्या गाण्यामध्ये एक प्रश्न दडलेला असतो तो प्रश्न दुसरी व्यक्ति ओळखून त्याचे उत्तर गाणे गाऊन देत असतो अशा प्रकारे हे कार्यक्रम सकाळपासून रात्रभर सकाळ होईपर्यत चालत असतो.

**परांग मांदरी:** - मांदरी नृत्य प्रकार हे गोंड आदिवासी जमातीचा एक पारंपारिक नृत्य प्रकार आहे. त्यामध्ये पारंपारिक वाद्य, वेशभूषा व नृत्याचा समावेश असतो. मांदरी नृत्य बारसा, विवाह, अंतिम संस्काराच्या वेळी एका ठराविक कालावधीत मांदरी नृत्य केला जातो. विवाहाच्या वेगवेगळया प्रसंगी पाच वेळा मांदरी नृत्य सादर केला जातो. मंडाच्या दिवशी कुवार मुडांग (मोहाचा उगवलेला नविन रोप) आणतांना, वरातीच्या स्वागताच्या वेळी, नव वधू-वराला नवरदेवाच्या घरासमोर पारंपारिक पध्दतीने पवित्र करतांना,लग्न लागतो तेव्हा व शेवटी लग्नाच्या शेवटच्या दिवशी मांदरी नृत्य सादर करतात.

**भिमांग मडमिंग (चैत्र पोर्णिमा):** - आरमोरी तालुक्यात आदिवासी समुदाय भिमांग मडमिंग एक उत्सवासारखा साजरा केला जातो. मडमिंग म्हणजे मराठी मध्ये लग्न होते.सकाळी सर्व गावकरी व गाव पुजारी मोहाच्या पानापासून दोना तयार करून त्यामध्ये तेल, हळद घेवून ठाकूर देव आणि शितला माता मंदिरात चढवतात. व सामूहिक रित्या पारंपारिक पध्दतीने पूजा केली जाते. या दिवशी गाव पुजारी पळसा पानाच्या दोनामध्ये धान्य बिज भरून प्रत्येक शेतकरीच्या हातात देतो आणि तेच बिज पेरून प्रत्येक शेतकरी पेरणीला सुरुवात करत असतो.ज्या दिवशी भिमांग मडमिंग असतो त्या दिवशी 'भिमसेन मरा' (गावाच्या मधोमध असलेला झाड) या झाडाखाली सडा सारवन करून रांगोळी टाकली जाते. सायंकाळी या झाडाखाली गावातील अविवाहीत तरुण - तरुणी, लहान मुले, गावातील पंच वाजागाजा घेवून जमा होतात. म्हातारे महिला पारंपारिक गीत म्हणतात. तेथे एका काल्पनिक जोडप्यांचा लग्न लावतात, त्यानंतर वाळलेले मोहफुल भाजून व गुळ मिसळवून लाटा तयार करून प्रसादाच्या स्वरूपात उपस्थितांना वाढले जाते. त्यानंतर सर्व गावकरी गाणे गात पारंपारिक वाद्य वाजवत आपापल्या घराच्या दिशेने जातात या उत्सवामुळे गावामध्ये आनंदित वातावरण व एक्याची भावना निर्माण होते.

**रेला/ लंबा नाच:** - हा आदिवासी जमातीचा एक पारंपारिक नृत्य प्रकार आहे. या नृत्यात तरुण - तरुणी व इतर सदस्य सहभाग घेतात. रात्री जेवण झाल्यानंतर गावाच्या चौकात किंवा गोटूलच्या समोर किंवा गल्लीत नाचतात. या नृत्य प्रकारामध्ये एका लांब बांबूची काठीचा उपयोग केला जातो. या काठीला ध्वनी निर्माण करण्यासाठी घुंगरू

बांधले जाते, ती काठी जमिनीला आपटून एक विशिष्ट प्रकारची ध्वनी निर्माण केली जाते. नृत्य करणारे सर्व एकमेकांच्या कमरेला धरून, एका रांगेतच नाचतात.

**घेरा पार्टी:** - हा नृत्य प्रकार आदिवासी जमातीमध्ये खास करुन विवाहाच्या प्रंसगी केला जातो. वधू पक्षातील मंडळी नवरी मुलीला नवर देवाच्या घरी लग्नासाठी सोडायला जातात तेव्हा नवर देवाच्या गावाच्या प्रवेशव्दारात त्यांचे स्वागत पारंपारिक पध्दतीने केला जातो. त्यानंतर त्या प्रवेशव्दारापासून ते नवरदेवाच्या घरापर्यंत नृत्य केला जातो.यामध्ये वधू पक्षातील सदस्य व वर पक्षातील सदस्य यांच्यामध्ये स्पर्धा होत असते. या नृत्यामध्ये तुडुम, डफला, मंजिरा, तुतारी इत्यादी पारंपारिक वाद्य तालासुरात वाजविले जाते. अनेक प्राण्यांची वेशभूषा करुन, एका हाताने टिचकुल्या वाजवत, दुसऱ्या हातात रूमाल घेवून व पायाची विशिष्ट हालचाली करुन पारंपारिक गीत म्हणत तालासुरात नृत्य सादर केला जातो.यामध्ये " घोडा नाच " विशेष पाहण्यासारखा असतो. बांबूच्या कमची पासून मोरा तयार करुन त्या मोराच्या वरच्या भागाला प्लास्टिकचा घोडयाचा सजवलेला डोका बसवलेला असतो व तो एक व्यक्ती घालून तेथे नाचत असतो त्यामुळे नृत्याचे आकर्षक अधिकच वाढत असतो.

**छेरछेरा:** - या तालुक्यातील आदिवासी पुषपुन्नी (पौष पोर्णिमा) च्या निमित्ताने सण साजरा करतात. या पोर्णिमेच्या सात दिवसा अगोदरच सणाला सुरुवात केली जाते. " छेरीक छेरा छेर बरतनीन छेर छेरा. माई कोठी के धानला हेर हेरा " आणि " धनी रे पुनी रे छपक नाकी दुवा नाकी पोहे पोहे------" अशा प्रकारच्या मधुर गीताने छेर छेरा लोककला सादर केला जातो. तरुण तरुणी प्रत्येक घरी जावून नृत्य करतात यामध्ये पारंपारिक वाद्याच्या सहाय्याने छत्तीसगढ गीत गायिले जाते. त्या मोबदल्यात त्यांना धान्य, तांदुळ, पैसे इत्यादी स्वरूपात सेरशिधा दिले जाते. शेवटी पोर्णिमेच्या दिवशी संपूर्ण गावकरी सामुहिक जेवण करतात.

**विट्टे:** - या तालुक्यातील आदिवासी गोंड जमाती एकमेकांना मदत करतात त्यालाच विट्टे म्हणतात. गावातील एखादया व्यक्तीस मदतीची गरज भासल्यास त्या व्यक्तीला कोणतेही रोजी, मोबदला न मागता त्याचे काम पूर्ण होईपर्यंत त्याला सामूहिक मदत करतात त्या मोबदल्यात घर मालक त्यांना जेवण देतात.

**डोहला पोलो:** - आदिवासी जमातीचा मुख्य व्यवसाय शेती आहे. धान्य पेरणीनंतर, रोप वाढल्यानंतर रोवण्याची (धान्याची रोपे लावने) सुरुवात करण्या अगोदर जुलै महिन्याच्या पहिल्या आठवडयात डोहला पोलो करण्यासाठी एक दिवस ठरवला जातो. व त्या दिवसी सामूहिकरित्या काम बंद ठेवून मोहाच्या पानापासून दोना बनवून एका दोनात तांदुळ व दुसऱ्या दोनात तेल, हळद प्रत्येक घरातून आणून ग्राम देवतेची पूजा गाव पुजारी करतो. तेव्हापासून रोवण्याची सुरुवात करतात.

**बाल पोलो:** - नविन धान्याला बाल म्हटले जाते. नविन धान्य शेतात आल्याच्या निमित्ताने सप्टेंबर महिन्यात बाल पोलो साजरा केला जातो.यालाच नवा खाने असे म्हणतात. बाल पोलोच्या दिवसी गाव पुजारी मोहाच्या पानाच्या दोनामध्ये तेल, हळद व धान्याचा लोंब शितला माता मंदिरात चढवितो त्यानंतर गावातील प्रत्येकाच्या घराच्या मुख्य दरवाजाला धान्याचे लोंब बांधतो. त्यावरुन लोकांना माहिती होते की, आपण नविन धान्य देवाला अर्पण केले आता नविन धान्य (भात) खाऊ शकतो. या दिवसी प्रत्येक कुटंब आपापल्या कुलदेवतेला नविन धान्याचे लोंब चढवितात व याच दिवसापासून नविन तांदळाचा भात बनविण्यासाठी सुरुवात करतात.

**मंडई:** - मंडई म्हणजे जत्रा होय. या तालुक्यातील 'कुमकोट' या ठिकाणी 60 गावांचा आराध्य देवता आहे. कुमकोट येथिल स्थानिक पुजारी व इतर गावातील गाव पुजारी यांच्या हस्ते देवी देवतांचे आदिवासी पांरपारिक पध्दतीने पूजा

अर्चा करून दुपारला पारंपारिक वाद्य वाजवत मंडईची मिरवणूक काढली जाते. त्यामध्ये वेगवेगळया रंगाचे पताके असतात. काळा रंगाचा पताका काली कंकाली मातेचे, लाल रंगाचा पताका डिवारीन देवतेचे व पांढरा रंगाचा पताका शितला माताचे प्रतिक मानले जाते. यालाच मंडई म्हटले जाते या ठिकाणी काही लोकांच्या अंगात देव येतो.

**सुरोती (दिवाळी):** - या तालुक्यातील काही गाव टेमली, मोहगाव इत्यादी गावातील आदिवासी दिनदर्शिकाच्या तारखेनुसार दिवाळी सण साजरा करीत नाही. तर त्यांच्या गावात त्यांनी ठरवलेल्या तारखेनुसार वेगवेगळया तारखेला कार्तिक महिन्याच्या अमावस्येला दिवाळी सण साजरा करतात. दिवाळीचा पहिला दिवस सुरोतीच्या चार दिवसा अगोदर सार्वजनिक गौरा - गौरी चौकात पारंपारिक पध्दतीने गाव पुजारी पूजा करून पूरुष मंडळी डमऊ, डफरा, मंजिरा, तुळूम, मोहरी, इत्यादी वाद्य वाजवत महिला पूजेच्या ठिकाणी तादुळ शिंपत गौरा - गौरी गीत तालासुरात गाऊन गौरा - गौरी जागवतात. गौरा म्हणजे शिव व गौरी म्हणजे पार्वती पाचव्या दिवसी सुरोतीला सुरुवात होते या दिवसी सकाळी गावातील लोक समूहाने वाजागाजाने गावाच्या बाहेर जातात व एका ठिकाणी पूजा करून तेथिल माती गौरा - गौरी बनविण्यासाठी आणतात व ज्यांच्या घरातून गौरा - गौरीचे स्वागत केले जाते त्यांच्या घरी गौरा - गौरीची मूर्ती बनविले जाते.

**निष्कर्ष: -**

1) आरमोरी तालुका अतिमागास असुनही आदिवासी आपल्या संस्कृती विषयी जागृत आहेत.
2) आदिवासींची लोककला संस्कृती निसर्गाशी जवळीक साधणारी आहे.
3) आदिवासी लोककला संस्कृती शेतीशी संबधित आहे. कारण त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन शेती व जंगल आहे.
4) आधुनिक समाजाच्या संपर्कामुळे काही आदिवासींचे लोककला संस्कृती लुप्त होण्याच्या मार्गावर आहे. म्हणुन त्यांचे जतन करण्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करून जनजागृती करण्यात येत आहे.
5) आदिवासी लोककलेमधून सामूहिक जिव्हाळा, एकतेची निर्मिती होते.
6) नविन पिढी आधुनिकीकरण, पाश्चात्य संस्कृतीच्या संपर्कात आल्यामुळे पारंपारिक नृत्य न करता डी.जे.च्या तालावर नाचतांना दिसून येत आहे.
7) आदिवासी प्रगत समाजाच्या संपर्कात आल्यामुळे नविन पिढी पारंपारिक वाद्य पेक्षा आधुनिक वाद्य वाजविण्याकडे आकर्षित होतांना दिसुन येत आहे.

**शिफारशी व सूचना: -**

1) आदिवासींची वैशिष्टपूर्ण लोककला संस्कृतीचे जतन करण्यासाठी शालेय तसेच शासन पातळीवर आदिवासी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.
2) आधुनिकीकरण व पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावामुळे काही आदिवासी लोककला संस्कृती लूप्त होण्याच्या मार्गावर आहे. म्हणून जनजागृती करण्यासाठी शासनाने व सेवाभावी सामाजिक संस्थांनी योगदान द्यावे.
3) आदिवासी लोककला संस्कृती, मुल्य, परंपरा, यांचे संवर्धन करण्यासाठी शासनाने विविध योजना आखुन अनुदान द्यावे.

4) भ्रमणध्वनी, इंटरनेट, दुरदर्शन, इत्यादी साधनांच्या आहारी न जाता लोककलेमध्ये सहभागी झाल्यास सामूहिक भावना व एकतेची भावना निर्माण होण्यास मदत होईल.
5) आदिवासी जमातीमधील व्यसनधिनतेचे प्रमाण कमी करण्यासाठी शासनाने व्यसनमुक्ती केंद्राची निर्मिती करावी.तसेच शालेय व गाव पातळीवर मार्गदर्शन व समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करावी.
6) आदिवासी शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी अत्याधुनिक अवजारे,जलसिंचन सुविधा,सुधारीत बि-बियाणे, रासायनिक खते, किटक नाशक, औषधांचा पुरवठा शासनाकडून करण्यात यावे.
7) आदिवासी भागातील कुटीर उद्योग, लघु उद्योगांना प्रोत्साहन दिल्यास शहराकडे होणारे स्थलांतर थांबवून स्थैर्य जीवनमान निर्माण करण्यास मदत होईल.

संदर्भ सूची: -

1) ऋचा, शुभदा,सोमा, चंद्रकांता, कुमारीबाई, (2023), वनाश्रित समुदायो के सांस्कृतिक अधिकार और व्यवहार: सामाजिक लिंग आधारीत नजरीया.
2) कपुरडेरिया मेघराज, (2012), कवर आदिवासींचे समाजिक आणि सांस्कृतीक जीवन, श्री साईनाथ प्रकाशन, भगवाघर काम्प्लेक्स, धरमपेठ, नागपूर
3) कऱ्हाडे बी.एम., (2012), समाजशास्त्र परिचय, पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स, नागपूर.
4) ताराम आत्राम उषाकिरण, (2021), गोंडवाना की जमापूंजी, हिंदी मराठी प्रकाशन, धनवटे चेम्बर्स, सिंताबर्डी.
5) विखार र.वि., (2021), आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, हर्षवर्धन प्रकाशन बिड.
6) https:// gadchiroli.gov.in
7) https:// marathivishwakosh.org